
# मला काय त्याचे अर्थात मोपल्याचे बंड

लेखक -

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



# मला काय त्याचे
# अर्थात
# मोपल्यांचे बंड

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**
**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# मला काय त्याचे?
# अर्थात
# मोपल्यांचे बंड

१. ज्ञानी कम्बू

भारत वर्षातील सुरम्य नि पवित्र प्रदेशात मलबारची गणना केली जाते. हिरवीगार नि दाट अरण्ये, नाना फुलांनी नि फळांनी डवडवलेले टुमदार पर्वत, पाण्याचे मंजुळ झरे, गोड नि शांत स्वभावी नद्या, विपुल धान्यांनी डुलणारी शेते, उंच नि छत्राप्रमाणे हारोहारीने लागलेल्या नारळी, पोफळी नि ताड इत्यादी वृक्षांच्या पंक्ती- ह्या प्रवाशांच्या नेत्रांस नि मनांस पदोपदी आल्हादवीत असतात.

अशा ह्या रम्य नाना फुलांनी नि फळांनी डवडवलेल्या, अशा या वरील टुमदार पर्वतांपैकी एका पर्वताच्या माथ्यावर एक कुट्टम् नावाची लहानशी वाडी वसत होती. तीत एका नारळी-पोफळीच्या दाट वनामध्ये पाच-सहा नंबुद्री ब्राह्मणांची घरे होती. त्यांपासून बऱ्याच अंतरावर पंचवीसएक नायरांची घरे नि त्यांना लागून इतर ‘स्पृश्य’ जातीची थोडीशी वस्ती होती. त्या वस्तीपासून अर्ध्या मैलावर दहा-बारा ‘थिय्या’ जातीच्या झोपड्या उभ्या असून, त्या मुख्य वाडीपासून अर्ध्या मैलावर जरी उभ्या होत्या तरी त्या वाडीच्याच सीमेत समजल्या जात. वाडीचा भाग असूनही त्या इतक्या दूर वसण्याचे कारण हे की, थिय्या लोक हे तिकडच्या अस्पृश्यात गणलेले आहेत.

प्रत्यही सकाळी नंबुद्री ब्राह्मणांच्या गृही त्यांची मुले उठून वेदपठण करीत असताना तो मंजुळ घोष ऐकून पशुपक्षीदेखील आनंदाने डुलत असत. तेथील ब्रह्मवृंद वेदांचे रक्षण इतके उत्कृष्ट करीत आहेत की, स्नान-संध्यानिरत, शुद्ध नि शुभ्र यज्ञोपवीत धारण करीत असलेले ब्राह्मण

एकदा मांडी घातली की अस्खलित, स्वरशुद्ध नि वर्णस्थानसमीरत अशा वाणीने चारही वेदांचा भ्रमरहित पाठ करताना आजही दिसून येतात!

परंतु हे वेदपठण ऐकण्याचा अधिकार शूद्रांस नाही अशी कल्पना असल्याने ब्राह्मणांची वस्ती वेद मोठ्याने म्हणत असताही ते स्पष्टपणे इतर जातीस ऐकू न जातील अशा दूरभागी पण गावच्या सीमेतच वसलेली असते. त्यांच्यापुढे नायर लोक बसतात. ते आपणास क्षत्रिय समजतात नि त्यांच्या कन्येशी ब्राह्मणांचे कनिष्ठ पुत्र संबद्ध होऊ शकतात. ब्राह्मणांचा ज्येष्ठ पुत्र मात्र ब्राह्मण कन्येशीच विवाह करितो; कारण की नायरांशी अनुलोम पद्धतीने संबंध ठेवून त्या जातीशी रक्तैक्य नि बीजैक्य स्थापित करताना उच्च समजले जाणारे, बीज रक्त व जातीही पण निर्भेळ शुद्धतेने अस्तित्वात असावी. नायर लोक हेही थिय्या, नवाडी, यलाबन, कलियन व मसकून- ह्या जातींना अस्पृश्य समजून त्यांच्या दर्शनानेही आपणास विटाळ झाला असे समजतात. म्हणून ह्या जातींची घरे प्रत्येक गावाच्या मैल-अर्धा मैल तरी दूर असतात.

ह्या सामाजिक रूढीने विस्कळीत झालेल्या एकंदर हिंदूसमाजाप्रमाणेच ह्या कुट्टम् गावाची वस्तीही व्यवस्थित रीतीने विस्कळीत झालेली होती.

ही वेळ सकाळची होती. दूरवर असलेल्या त्या नारळी-पोफळीच्या सुंदर वनात वेदशास्त्रनिरत ब्राह्मण आपले वेदपाठ सांगोपांग करीत बसलेले होते; मधूनमधून होमांचे नि हवनांचे सुगंधी धूम नारळीच्या टोकावर अटकून कालिदासाच्या यक्षाचा निरोप ऐकण्यासाठी थांबलेल्या दयाळू नि स्निग्ध मेघाप्रमाणे लोंबकळत असत. मध्यवस्तीत नायरांची नि इतर जातींची कुटुंबे नुकतीच आपापल्या उद्योगास लागत होती. त्यापैकी काही त्या वाडीच्या कंठाशीच असलेल्या एका तलावावर पाणी भरण्यास जात होती; नायरांच्या स्त्रियाही स्वच्छंद रीतीने त्या तलावाच्या मार्गावर जात-येत वा मध्येच दहा-पाचजणी क्षणभर थांबून बोलत वा मंजुळपणे हसत उभ्या होत्या.

हयाच वेळी त्या वाडीपासून दूर असलेल्या त्या थिय्यांच्या वस्तीत एक मुसलमान मौलवी एका पारावर दोघा थिय्यांशी बोलत होता. प्रत्यक्ष महंमद पैगंबराच्या चुलत्याच्या मावशीच्या जावयाची जी बहीण होती, तिच्या शेजारचीच्या भाचीचाच मुलगा आपला पूर्वज होय नि अशा रीतीने आपण अगदी एका अस्सल अरबाच्या घराण्यास अलंकृत केलेले आहे, असे हा मौलवी सर्व लोकांस आपल्या लांब दाढीवर तीन-तीनदा थाप मारीत सांगत असे. त्या थिय्यांपैकी जो सरासरी तीस वर्षांचा मनुष्य होता त्यास तो मौलवी म्हणाला, “कम्बू, हे पहा दिव्य पुस्तक पुढे काय म्हणते ते!

सूरतुल् फुर्कान हया अध्यायात ईश्वराने साफ सांगितले आहे की, हे कुराण! आकाश नि पृथ्वीतील सर्व गोष्टी जो जाणतो त्याने प्रकटविले आहे! पण हयास नि पुनरुत्थानाच्या घटकेस जे खोटे समजतील त्यांच्यासाठी आम्ही भयंकर नरकाग्नी तयार करून ठेविला आहे!" ते ऐकून कम्बू शांतपणे म्हणाला, " मौलवी, हे वचन तुम्ही मला अनेकवार सांगितलेत. पण तुम्ही, मी म्हणतो ती शंका का निवारण करीत नाही? सर्व मनुष्ये एकदा मेली की ती सर्व थडग्यात आहेत तिथेच पडून राहावयाची नि जेव्हा केव्हा युगांती जग संपेल तेव्हा परमेश्वर त्यास एकदम तुताऱ्या फुंकून उठवील नि त्यांचा न्याय करील, हयासच आपण पुनरुत्थान म्हणता ना?" "होय." "बरे, आता हे सांगा, एखाद्या मनुष्याच्या काही कामाचा निवाडा करण्यासाठी त्यास पोलिसाने एका खोलीत अटक करून बंद केले नि जर त्याची चौकशी दहा वर्षे- पर्यंतही न करता त्यास तसाच तेथे कुजत पडू दिला तर आपण त्या पोलिसास या भयंकर कच्च्या कैदेविषयी दोष देऊ, नव्हे काय?" "होय" "इतकेच नव्हे, तर असली कच्ची कैद देणारा पोलिस नि त्याचा अधिकारी अमानुष होय असेच म्हणू नाही काय?" "होय." "तर मग न्याय न करता नुसत्या चौकशीवारी एखाद्या मनुष्यास दहा वर्षे कैदेत कुजत पाडणे हे जर अमानुष क्रौर्य होय असे आपण समजतो, तर मग अन्यायी वा न्यायी कोणाही माणसास अंतिम चौकशीसाठी जगाच्या अंतापर्यंत थडग्यासारख्या भयंकर खोलीत कुजत ठेवणे, हे परमेश्वराच्या अमानुषतेला जरी विरुद्ध नसले तरी दयालुत्वाला अत्यंत विरुद्ध आहे, नव्हे काय? नि अशा गोष्टीवर जर कोणाचा भरवसा नसला तर त्याला नरकाग्नीत फेकून द्यावयाचे! छे ! छे! परमेश्वर महान दयाळू, कृपाळू आहे. तो न्यायीही आहे. आपण शिकविता त्या परमेश्वराच्या कल्पनेत न्यायीपणाही नाही नि दयेमायेचे तर नावच नको!"

"कम्बू !" मौलवी रागाने म्हणाला, "तुम्हा काफरांच्या कानांवर नि हृदयावर परमेश्वराने मोहोर लावली आहे. तुमची बुद्धी नि हृदये परमेश्वराने बधिर नि वेदनाशून्य करून टाकली आहेत. म्हणून तुम्हांस हे पुनरुत्थानाचे नि पैगंबराचे अभिवचन कळणारच नाही."

"आणि," कम्बू मध्येच म्हणाला, "तरीही पण आम्हालाच शिक्षा भयंकर नरकाग्नीची होणार! हे परमेश्वरी थोरवीस शोभते तरी का? प्रथम तो सर्वशक्तिमान म्हणून आमचे कान नि हृदये बंद करून, त्यावर अज्ञानाची मोहोर ठोकणार ! मग आम्हांस (तुमच्या म्हणण्याप्रमाणे) सत्य वचने ऐकविण्यास आपल्यासारखे मौलवी धाडणार आणि त्यांच्याच आज्ञेने आम्हास कळले नाही, तर उलट आम्हांसच शिक्षा करणार ! प्रथम जर कोणी आमच्या हातास धरून बळाने दुसऱ्याची वस्तू उचलविली व मग चोरी केली म्हणून आम्हांसच शिक्षा दिली, तर त्याचे ते कृत्य जितके अन्याय्य

होईल तितकेच आपण म्हणता अशी परमेश्वराच्या न्यायाविषयी केलेली कल्पनाही अन्याय्य नि अधर्म्य होय.”

“तोबा ! तोबा !!” मौलवी उद्‌गारला, “परंतु हे परमेश्वराने प्रकट केलेल्या पुस्तकात लिहिले आहे ना ?”

कम्बू :”जर आपणास तसे वाटत असेल तर आपण तसा विश्वास सुखाने ठेवावा. मला आमच्या हिंदू संतांच्या उपदेशातच जास्त आनंद होतो आहे. मला असे वाटते की, पुनरुत्थापनावर त्याचा विश्वास होता की नव्हता त्यावरच मनुष्याच्या भक्तीची वा साधुतेची परीक्षा परमेश्वर करणार नसून, “तू सत्कृत्ये केलीस वा दुष्कृत्ये केलीस?” ह्या प्रश्नानेच तो त्याची परीक्षा करील. पुनरुत्थानाच्या कल्पनेचे नावही ज्यांना माहीत नव्हते, परंतु ज्यांनी जगात भूतमात्रांवर दया केली; सत्य, समत्व, परहित-तत्परता ह्यातच जीवित घालविले त्यांच्यावर परमेश्वर सदोदित संतुष्टच राहील. आम्हा हिंदूंत असे अनेक साधू झाले की, जे मुसलमानी कुराणाचे पान न उलटता केवळ आपल्या पवित्र आचरणाने नि भक्तीने मुक्त झाले !”

“‘मुक्त झाले !” मौलवी हसला. “मूर्खा ते सर्व नरकाग्नीत पडले ! परमेश्वरावर नि पैगंबरावर जो विश्वास धरील तोच मुक्त होतो.”

“काय ? आम्हा हिंदूंनी परमेश्वरावर विश्वास ठेवला नि त्याची भक्ती आम्ही मनोभावाने केली; परंतु महंमद पैगंबरावर मात्र तुम्ही म्हणता त्याअर्थी विश्वास ठेवू शकलो नाही किंवा पुनरुत्थानाच्या उपपत्तीचे तथ्य मानू शकलो नाही तर आम्हांस मुक्तीच नाही?”

“अलबत्-अर्थात नाही !”

“तर मग परमेश्वराच्या भक्तीइतकीच पैगंबराची भक्ती महत्त्वाची आहे म्हणावयाची ! आणि पैगंबराच्या पूर्वीच्या मनुष्यजातीच्या लाखो पिढ्या, निदान त्याच्या नंतरच्या तरी, अर्ध्या जगताच्या सर्व पिढ्या नरकात गेल्या ना ? आमचे हिंदू जातीतील साधुसंतही नरकातच पडले ना?”

“अर्थात ! परमेश्वरी पुस्तकात ते स्पष्टच आहे.”

“तर मग !” कम्बू उठत उठत म्हणाला, “ ‘मौलवीजी’ ज्या नरकात असले साधुसंत राहातात, ज्यात माझ्या पूर्वजांच्या पिढ्यांच्या पिढ्या निवसत आहेत, तोच माझा स्वर्ग ! मी हिंदूच राहाणार. त्यांस सोडून मी स्वर्गात येऊ इच्छित नाही. धर्मराजाची कथा माझी आजी मला अजून शिकविते, की स्वर्गाची दारे उघडी असूनदेखील तो आपल्या पाची भावांस सोडून स्वर्गात जाण्यापेक्षा आपल्या ज्ञातिबांधवांसह नरकातच राहून त्यांची आपल्या धर्मबळाने सुटका करण्यास झटला. मी त्याच धर्मराजाच्या भक्तातील एक अत्यंत कनिष्ठ भक्त आहे. मी त्या धर्मराजाच्या नि श्रीकृष्णाच्या हिंदू धर्मातच राहणार !”

इतक्यात “कम्बू ! अरे धावा ! पोर मेले. ठार झाले,” म्हणून महारवाड्यात एकच आरोळी उठली. महारवाडा हा मराठी प्रतिशब्द थिय्यांच्या वस्तीस, ती अस्पृश्यांची वस्ती हया अर्थी वापरला आहे.

ती आरोळी ऐकून कम्बू नि त्याच्या भोवती आता जमलेले सर्व थिय्ये लोक आपल्या महारवाड्याकडे पळत जाऊन पाहातात तो, कम्बूचा एकुलता एक मुलगा वडाच्या झाडावर चढत असता खाली पडून त्यास भयंकर खोक पडली आहे! त्याच्या जखमेतील रक्ताने अंग नि कपडे चिब झाले असून तो बेशुद्ध पडला होता. काही थिय्यांनी त्यांस माहीत होते ते उपचार केले; परंतु पोर शुद्धीवर येईना. रक्तप्रवाह बंद होईना. तेव्हा एक थिय्या म्हणाला, “आता गावात कृष्ण नायर हयांच्याकडे कोणीतरी धावत जाऊन त्याला आणविल्याविना पोर जगत नाही.” हे ऐकताच कम्बू नि अठरा वर्षांचा मुलगा दामू हे एकदम तीरासारखे धावत निघाले. मौलवी त्या पारावरून त्यांस पहात होता. तो त्यांच्या पुढे येऊन त्या तलावाच्या जवळ उभा राहिला. ते दोघे कम्बू नि दामू विव्हळ हृदयाने धापा टाकीत त्या तलावापासून काही शंभर दीडशे फुटांवर येतात, तोच “ थिय्या ! थिय्या” म्हणून तलावावर पाणी भरणाऱ्या नि इतर उभ्या असलेल्या पुरूष-स्त्रियांतून एकच ओरड उठली !

मलबारमध्ये अस्पृश्यांना शंभर-दीडशे फुटांच्या आत स्पृश्य जाती येऊ देत नाहीत. तलावाच्या जवळ शंभर फुटांवरून जाणाऱ्या मार्गावर अस्पृश्य समजतात ते दोन थिय्ये इतके भरधाव येताना पाहताच तलावावर झालेला हा गलबला ऐकून मौलवी मनातल्या मनात आनंदी झाला आणि तसाच उभा राहून तो गंमत पाहू लागला.

“महाराज!” दुरूनच ते थिय्ये ओरडले. “आमचा एक मुलगा भयंकर घायाळ होऊन मरणासन्न पडला आहे. कृष्ण नायर वैद्य यांच्या घरून औषध आणावयास आम्ही चाललो आहो. दुसरा मार्ग दोन-तीन मैल अंतराचा असल्याने अकडून धावत आहो. दया करा नि आम्हाला जाऊ द्या.”

“चांडाळा ! मरो तुझा तो मुलगा !” एक नायर हात उगारीत धावत आला. “ बघत नाहीस का, की हा तुझा मार्ग शंभर फुटांहून दूर नाही. पाहिजे तर मोजून पहा.”

“महाराज! तलावापासून हा मार्ग जितका जवळ आहे त्याहूनही माझे मूल मृत्यूच्या मार्गापासून जवळ आहे. तरी कृपा करून औषध आणण्यास मला जाऊ द्या.”

“म्हणजे तुझ्या मुलाकरिता...’ रामनायर, की ज्याला चोरीच्या अपराधासाठी दोनदा तुरूंगात जावे लागले होते, तो म्हणाला, “आमच्या तलाव बाटला तरी चालेल ? नाही ! पापयोनीत जन्म घेतलेल्या, तुझे दर्शनदेखील खरे म्हणता घेऊ नये. कलियुग म्हणून आम्ही हे सहन करतो.”

“ महाराज, काय वाटेल ते म्हणा; पण माझ्या एकुलत्या एका मुलावर दया करून मला जाऊ द्या. मी पाहिजे तर माझ्या तोंडावरून पदर घेऊन ते न दाखविता जातो.”

“चूप !” मुकुंदर जो कालिकतमध्ये दारूच्या मक्त्याचे दुकान आज पाच वर्षे चालवीत होता तोर ओरडून धावला, “मी स्नान करीत आहे; दिसत नाही ? तू धीटपणे आमच्या प्रतिपादनास न जुमानता पुढे पुढेच येत आहेस तो आहेसच ! पण ओरडतोस तरी केवढ्याने ! तुझे शब्द कानी पडल्याने मला आता पुन्हा स्नान केले पाहिजे ! पहा नाही तर !”

ही इतकी भांडाभांडी होअतो ते दोन थिय्या, जे पूर्वी शंभर-सव्वाशे फुटांवर थबकले होते, ते सरकत सरकत अगदी त्या तलावाच्या कोपऱ्यावरून जाणाऱ्या मार्गावर येऊन पोहोचले होते. मुलाच्या डोक्यातून भळाभळा वाहणारे रक्त, त्या बापाच्या डोळ्यांपुढे पुन्हा पुन्हा उभे राहून, एकेक क्षण त्यास मृत्यूच्या जवळ पडणारे एकेक पाऊल वाटू लागले. तलावाच्या अगदी सन्निध-म्हणजे तीस फुटांवर मार्गाने जे वळण होते तेथे जेव्हा ते अस्पृश्य आले तेव्हा त्या तलावावरील स्पृश्यांचा कोप अनावर होऊन दोघे नायर, एकदोन ब्राह्मण नि काही सुतार असे त्यांच्या अंगावर दगड फेकीत धावले. इतक्यात शांतपणे पुरुषसूक्त म्हणत असलेला एक ब्राह्मण पुढे सरला नि त्याने त्यास थांबवीत म्हटले, “हा ! हा ! अशी निरर्थक मारामारी तुम्हाला शोभत नाही. हे पहा कम्बू, मी तुझ्या त्या वैद्याकडे जातो नि तुझे ते औषध तुला आता आणून देतो. मी जरी तुझ्या मुलाचा

संबंधी नसलो तरी प्रत्यक्ष तुझ्यापेक्षा अधिक वेगाने जाऊन नि काळजीपूर्वक मी तुझे औषध आणतो. तू येथेच उभा रहा, म्हणजे कोणाच्याही समजुतीस धक्का न पोहोचता तुझे कार्यही होईल."

तो ब्राह्मण इतके बोलतो तोच तो मौलवी पुढे झाला नि म्हणाला, "माफ कराना ! मी मोठ्या आनंदाने कम्बूचे औषध घेऊन येतो. आपण आपली संध्या पुरी करावी. मला हया मार्गाने तलावाच्या जवळून जाण्यास हरकत नाही ना ?"

तेव्हा दारूच्या मक्त्याचे दुकान चालविणारा मुकुंद म्हणाला, "पण तुझी जात कोण? थिय्या लोक अस्पृश्य असून अगदी घाणेरडे धंदे करतात"

मौलवी म्हणाला, "मी थिय्या-हिंदू नसून मुसलमान आहे."

"तर मग खानसाहेब ! आपणास कोण हरकत घेतो ? आपण हया मार्गाने वाटेल तेव्हा यावे-जावे. हे थिय्या लोक पापयोनी असल्याने हयांना तलावापासून शंभर फुटांच्या आत येऊ दिल्याने तलाव बाटेल !" चोरी करून दोनदा तुरूंगात गेलेला तो क्षत्रियकुलावतंस रामनायर म्हणाला.

तो मौलवी इकडे हे बोलत आहे, इतक्यात तो पुरुषसूक्त म्हणणारा ब्राह्मण तसाच ओलेता धावत निघूनही गेला होता. तो औषध घेऊन परत येईतो तेथेच वाट पाहात उभे असणाऱ्या त्या दोघा थिय्यांकडे जाऊन मौलवी म्हणाला, "हाय ! हाय ! कोण ही हया काफरांची निर्दयता ! कम्बू, मला क्षमा कर, पण मी तुझ्या हिताकरिता सांगतो की, इस्लामाविरुद्ध तू मघा जे अपशब्द उच्चारलेस त्याचेच तुला हे रोकडे प्रत्यंतर आले. तुझा मुलगा तू इस्लामास पाठ दाखविताच, अल्लाने क्रोधाने झाडावरून ढकलून दिला ! व ज्यांना तू स्वतःच्या धर्माचे समजतोस त्या हया काफरांच्या-ब्राह्मणांच्या, क्षत्रियांच्या, वैश्यांच्या व शूद्रांच्या हृदयावर अल्लाने मोहोर ठोकली. मी मुसलमान. मी त्या तलावावर जाऊ शकतो. तू हिंदू-पण अस्पृश्य ! तू जाऊ शकत नाहीस ! तू मुसलमान हो! बघ परवा मी तुला हयाच तलावावरून नेतो की नाही ! अरे तलावाचे पाणीग्रहण तर काय ? तू मुसलमान हो, लवकरच मुसलमान या सर्व काफरांच्या स्त्रियांचेही पाणि-ग्रहण करणार आहेत; समजलास ! चल तर तू मुसलमान होण्याचा संकल्प कर. केलास म्हण की मी हा आयत कुराणाचा मंत्र म्हणतो म्हणजे ते तुझे मूल तत्काल बरे होईल नि हया निर्दय ब्राह्मणांचा नि स्पृश्यांचा सूडही उगवला जाईल !"

हे त्याचे भाषण पुढे ऐकणे आपल्या चिंतेत मग्न झालेल्या त्या थिय्यास अगदी असह्य होऊन तो संतापाने म्हणाला, "ते मूल बरे न झाले- ते मूल मेले तरी मी मुसलमान होणार नाही ! ब्राह्मणादी हिंदूंची ही निर्दयता व तिचा सूड कसा घ्यावयाचा हा माझा प्रश्न आहे. तुझा नव्हे. आणि जो सदय मनुष्य मजसाठी प्रार्थना करता करता ओलेताच वैद्याकडे धावत गेला आहे, तोही ब्राह्मणच आहे !"

आता मात्र निराशेच्या रागाने मौलवी लाल होऊन म्हणाला, "चांडाळा ! काफर !" 'सूरतूल बय्यन' हया अध्यायात परमेश्वराने मूर्तिपूजकास फर्माविलेली भयंकर नरकाग्नीची शिक्षा तुजवर कोसळो ! तुझा मुलगा तू म्हणतोस तसाच मरो. नव्हे, नव्हे तुम्हा काफरांस हे ईश्वरी प्रकटीकरण-हे कुराण खरे वाटणारच नाही तोवर, की जोवर तुमच्या मानेवर तलवार येऊन पडली नाही ! थांबा तोही दिवस दूर नाही." हाताच्या मुठी वळून त्याच्या तोंडावर त्या उगारीत तो मौलवी हा शाप देऊन निघून गेला.

इतक्यात तो औषध आणावयास गेलेला ब्राह्मणही ते औषध घेऊन परत आला. त्याच्या बरोबर तो नायर वैद्यही आला होता. कम्बू थिय्या हा जरी अस्पृश्य जातीत उत्पन्न झालेला होता तरी तो चांगला सुशिक्षित असून कालिकतमध्ये एक मल्यालम भाषेतील साप्ताहिक-पत्रही चालवीत असे. त्याने हिंदू धर्माचे मल्यालम भाषेमधून नि इंग्रजी ग्रंथावरून बरेच अध्ययन केलेले होते. इतकेच नव्हे तर तो संस्कृतही अस्खलित रीतीने वाचू नि बहुतेक समजू शके. तो भगवद्गीता तोंडपाठ म्हणे. मलबारमध्ये आजही संस्कृत भाषा मातृभाषेप्रमाणे बोलणारी ब्राह्मण कुटुंबे तर आहेतच; पण निवडक संस्कृत शंभर-दोनशे श्लोक मुखोद्गत असणारे थिय्या आदिकरून अस्पृश्यही आढळण्यात येतात. इतकेच काय, पण संस्कृतचे श्लोक तेथे सर्वसाधारण जनतेस इतके परिचित की, भर्तृहरीचे नीतिशतकातील वेचक श्लोक, अशिक्षित मुसलमानांच्या तोंडूनही लेखकाने ऐकलेले आहेत. कम्बू थिय्याच्या विद्वत्तेने, अस्पृश्यतेची गोष्ट सोडून दिली तर, इतर विषयात स्पृश्य लोकही त्याला मानीत असत. कृष्ण नायर वैद्य तर त्याला फारच मानी. तेव्हा त्याच्या बरोबर म्हणजे सुमारे पन्नासएक फुटांचे अंतर सोडून तो महारवाड्यात गेला नि त्या मुलास यथोचित औषधोपचार करवून परत आला.

मुलग्यास जरा बरे वाटल्यावर कम्बूच्या बरोबर जो थिय्या तरुण त्या मौलवीचे संभाषण ऐकत उभा होता तो कम्बूस म्हणाला, “दादा ! मला क्षमा करा, तो मौलवी म्हणतो तसेच ते कुराण ईश्वरानेच प्रकट केलेले पुस्तक असावे असे मला वाटते.”

कम्बू हसून म्हणाला- “ते कशावरून ?” तरुण म्हणाला, “कारण तो मौलवी तीच गोष्ट अगदी ठासून वारंवार सांगत होता.”

“तर मग कोणतीही गोष्ट केवळ एखाद्याने वारंवार ठासून सांगितली म्हणजे ती खरी ठरते का ? तर मग मी तुला दोन नि तीन मिळून सात होतात व हे ज्ञान मला परमेश्वराने प्रकट केले आहे, असे शंभर वेळा ठासून सांगतो ! तू मानशील ?”

“छे, छे, ते मुळी माझ्या प्रत्यक्ष ज्ञानाच्या नि अनुभवाच्या विरुद्धच आहे. ते बुद्धीला पटत नाही.”

“तर मग दामू, कुराण ईश्वरप्रणीत आहे. इतकेच नव्हे, तर तेच काय ते ईश्वरप्रणीत आहे, हे बुद्धीला पटेल असे काही गमक तू सांग. आणखी असे पहा की, ज्यांना कुराण ईश्वरप्रणीत वाटते, त्यांनी खुशाल त्यास तसे मानावे. पण आम्हांस जर त्यातील प्रमेये समाजनाशक, निष्ठुर किंवा अविश्वसनीय वाटली तर ती तलवारीच्या टोकाने, नरकाग्नीच्या ज्वालांत तापवून, आमच्या हृदयावर डाग देऊन बलात्काराने कोरून टाकण्याचा का प्रयत्न केला जावा ?”

“दादा, आपणा अस्पृश्यांवर जो हिंदू धर्म इतका अन्याय करतो, की त्यास त्यांच्या धर्माचा उपमर्द करणारा व त्यांस काफर म्हणून समजणारा मुसलमान आम्हाहून अधिक पवित्र वाटतो, तो गायीचा वध करणारा व देवमूर्तीस दगड समजणारा मुसलमान त्यांच्या तलावावर जाऊ शकतो; पण रामकृष्णाची पूजा करणारे आम्ही, त्यांचेच हिंदू-बांधव मात्र त्याहूनही पापयोनी ठरून त्यास स्पर्श करू शकत नाही. ज्या हिंदुधर्मात हा भयंकर अन्याय पुण्य गणला जातो त्या हिंदू धर्मापेक्षा अस्पृश्य जाती मुळीच न मानणारा नि सर्व मनुष्यास समजणारा, मुसलमानी धर्म श्रेष्ठ नाही का?’

“वेड्या,” लडिवाळ क्षमेने त्या तरुणाच्या पाठीवर हात टाकीत कम्बू म्हणाला, “हे पहा शब्दाशब्दामध्ये फरक झाल्याने केवढा विचारातच घोटाळा होतो तो ! तू म्हणालास हिंदू धर्म अन्याय करतो, पण आम्हा अस्पृश्यांवर मघा जो निर्दय अत्याचार करण्यात आला तो हिंदू धर्माने केला, हे कसे म्हणतोस ! तो अत्याचार हिंदू समाज करीत आहे असे म्हण. तेही थोड्या अधिक

विचारांनी चुकीचे आहे. कारण आपण अस्पृश्यही हिंदू समाजाच्याच अंतर्गत आहोत; तेव्हा हिंदू समाजातील काही लोक-स्पृश्य समजले जाणारे लोक- आम्हा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांवर काही गोष्टीत अत्याचार करतात, असे म्हणणे न्याय्य होईल. आणखी एक विधेय ध्यानात धर की, हिंदू समाजात हे अस्पृश्यतेचे पातक ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र-हेच करीत नाहीत तर त्या पातकांचे विभागी आपण थिय्येही आहोतच. नायर मघा आपणांस शिवू नका म्हणून म्हणाले तेव्हा आपणा महारांस जितका राग आला नि तो योग्यच होता-तितकाच राग, महार थिय्ये त्या मांगाच्या मुलास आपल्या पंक्तीस व समाजास विटाळ होईल म्हणून जवळ येऊ न देता जेव्हा हुसकून लावतो, तेव्हा त्या मांगांसही येत असेल. म्हणून ह्या पापाचे प्रक्षालन आपण सर्व हिंदूंनी मिळून केले पाहिजे. आणि त्या पापप्रक्षालनाचा मार्ग म्हणजे मुसलमान होणे हे तुला पटले तरी कसे ? एक वेळ नव्हे, हजार वेळही केवळ शिवाशिवीच्या प्रश्नापुरती हिंदूतील अस्पृश्यता पुरवली; पण ती, जीस मुसलमान परमेश्वरी आज्ञा समजतात, ती भयंकर अस्पृश्यता नको ! कारण मुसलमानी वीस कोटी लोक सोडून बाकी जे शेकडो कोटी लोक पृथ्वीवर आहेत, ते मुसलमानांच्या मते अस्पृश्यांहून अस्पृश्यच नव्हेत काय ? त्यांस तारण नाही, त्यांस मुक्ती नाही. त्यांचे हजारो पूर्वज, साधू, संत सर्व नरकात गेले व जातील! पैगंबराच्या पुस्तकावर विश्वास न ठेवणाऱ्या नास्तिकास ईश्वरही स्पर्श करणार नाही, म्हणून कुराणाची वाक्ये सांगतात ! म्हणजे ईश्वरदेखील त्यांच्या मते स्पृश्यास्पृश्य विचार धरतो. आम्हा हिंदू अस्पृश्यांस पुण्याचरणाने निदान पुनर्जन्मी तरी स्पृश्य होण्याची आशा आहे. पण मुसलमानांच्या मते जे अस्पृश्य आहेत आणि ज्यांची संख्या शेकडो कोटी होते त्यांस पुनर्जन्मच नाही; ते नरकातच कुजणार, सडणार; त्यांचेकडे ईश्वरही बघणार नाही. केवळ मुसलमान तेवढे स्वर्गात; बाकी सारे जग, तुझा रामचंद्र, श्रीकृष्ण, पांडुरंग, भक्त पुंडलिकसुद्धा नरकात पिचणार ! अस्पृश्यता वाईटच, पण ह्या मुसलमानी भयंकर अस्पृश्यतेपुढे ती हिंदू-अस्पृश्यता म्हणजे एक वरदानच नव्हे काय ? आणखी हे पाहा की अस्पृश्यता वाईट आहे म्हणून आपण सर्व हिंदू मिळून तेवढी रूढी मोडून टाकू. त्यासाठी हिंदू धर्मच बदलण्याची निद्य कल्पना आम्हांस सुचावी तरी का? अस्पृश्यता म्हणजे काही सांगोपांग हिंदू धर्म नव्हे. घरात एक घुशीचे बीळ आहे- सापाचे म्हणा पाहिजे तर-आपण त्यास बुजवू. पण त्या एका बिळाकरता आपल्या थिय्या जातीच्या अनेक पूर्वजांच्या पूर्वजांना पवित्र व प्रिय झालेले हे हिंदू धर्माचे मंदिरच सोडून रानोरान भटकत फिरण्याचे काही कारण नाही.”

थिय्या लोक इतरांच्या दृष्टीने जरी अंत्यज असले तरी त्यांना स्वतःच्या जातीचा, चालीरीतींचा नि धर्माचा फार अभिमान असतो. आपल्या पूर्वजांस कोणीही निद्य म्हणावे हे त्यांस खपत नाही. त्यांच्या हया प्रखर पूर्वजाभिमानाने व जातिप्रेमानेच ते अजूनपर्यंत ईसाच्या किंवा मुसलमानांच्या जाळ्यात पूर्णपणे अडकून गेले नाहीत. त्यांच्यात अनेक साधुसंत पूर्वी होऊन गेले आहेत. आजही कित्येक बॅरिस्टर, वकील, डॉक्टर नि पत्रकर्ते त्यांच्यात निघत आहेत. तथापि त्यांच्यातील अनेक उतावळ्या तरुणांस आपल्या हिंदू समाजातील अस्पृश्यतेची अन्याय्य नि घातकी रूढी आपल्या धर्मातून जवळजवळ बलात्काराने परधर्मात ढकलून देत आहे.

थिय्या जातीतून परधर्मात जाणाऱ्या तरुणांस उन्मार्गापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्या ज्या पुढाऱ्यांचे प्रयत्न चालले होते, त्यात कम्बू हा अग्रगण्य होता. अशा हया हिंदुधर्माभिमानी महार बंधूंचा तलावावर स्पृश्य लोकांकडून इतका अपमान झाला असताही त्यांची ही हिंदू जातीवरील निष्ठा पाहून त्या तरुणाला गहिवरून आले नि तो कम्बूच्या पायावर डोके ठेवून म्हणाला, "मी हयापुढे हिंदू जातीतील अस्पृश्यतेसारख्या नीच रूढी सुधारण्यासाठी आपले आयुष्य खर्च करीन. हिंदू धर्माची आपण सांगाल त्या मार्गाने मी सेवा करण्यास सिद्ध आहे." कम्बू म्हणाला, "ये तर, हिंदू धर्माच्या सेवेसाठी नि संरक्षणासाठी. आज जितक्या स्वयंसेवकांची नि स्वयंसैनिकांची आवश्यकता आहे तितकी ती कधीच नव्हती ! माझी अशी आकांक्षा; महत्त्वाकांक्षा आहे की, हिंदू धर्माचे संरक्षण आजवर ब्राह्मणांनी नि क्षत्रियांनी जसे प्रामुख्याने केले, तसे आता ते आम्ही थिय्यांनी केले पाहिजे. हिंदू धर्मासाठी धर्मवीरत्व गाजवून त्याचा त्रिभुवनात जयजयकार करविण्यात स्पृश्यांहून आम्ही अस्पृश्यांनी- ब्राह्मणांहून आम्ही महारांनी अधिक शौर्य दाखवावे, अधिक सेवा करून दाखवावी ही माझी महत्त्वाकांक्षा आहे. चल; आपल्या मलबारच्या हिंदू लोकांवर जे भयंकर संकट लवकरच कोसळणार आहे नि ज्याची कल्पना वेदघोषात निमग्न झालेल्या हया ब्राह्मणांस मुळीच आलेली नाही, त्या संकटास तोंड देण्यास मजबरोबर चल."

## २. भयंकर धोक्याची पूर्वसूचना

त्या तरुण मुलास घेऊन कम्बू आपल्या महारवाड्यास सोडून जो निघाला तो एका लांब वाटेने ती गावची टेकडी चढत-चढत त्या नारळी-पोफळीच्या बनापाशी जाऊन उभा राहिला. तेथून त्या बनामध्ये असणाऱ्या ब्राह्मणांच्या दृष्टीस पडेतो गुपचिप उभे राहावे - कारण मोठ्याने हाका मारिल्या असता कोणा ब्राह्मणांच्या स्नानसंध्येच्या वेळी तो शब्द कानी पडला तर त्यास विटाळ व्हावयाचा ! म्हणून तो हाताने मधून मधून दामूशी बोलत एका झाडाखाली बसला.

आता ब्राह्मणांच्या घरचे प्रातःकालीन वेदघोष संपून गेलेले होते. हरिहर शास्त्र्यांच्या दाराशी त्यांची पंधरा वर्षांची मुलगी नि सुमारे अठरा वर्षांचा मुलगाही नारळीच्या आगरात फुलांच्या टुमदार बागेमध्ये फुले तोडीत होती. मधूनमधून ती मुलगी नि तो मुलगा संस्कृत श्लोकांच्या भेंड्या लावीत नि एकमेकांवर भेंडी लागली म्हणजे हसत नि खिजवीत ते रमलेली होती. हरिहरशास्त्री हे जरी नंबुद्री ब्राह्मण होते तरीही एकदा ते मद्रासपर्यंत जाऊन आल्याने आगगाडी नि तारायंत्र म्हणून काही पदार्थ हया जगात आहेत हयाविषयी त्यांस काही शंका उरली नव्हती. इतकेच नव्हे, पण जन्मच्या जन्म त्या नारळी-पोफळीच्या वनातच काढल्याने, नि यज्ञशाळेबाहेर अग्नी कोणती तदितर रूपे धारण करतो हे मुळीच माहीत नसल्याने ज्या ब्राह्मणास आगगाडीच्या नि तारायंत्राच्या हरिहरशास्त्री हयांनी सांगितलेल्या कथा पटत नव्हत्या, त्यास त्या पटविण्यासाठी प्रयत्न करताना सर्वज्ञ वेदामध्येही हरिहरशास्त्री हयांस आगगाडीचा नि तारायंत्राचा सनातन उल्लेख आढळू शकला. हरिहरशास्त्री हयांची विद्वत्ता दांडगी होती. आणि तिला मद्रासपर्यंतच्या प्रवासाची धारही लावली गेल्याने सद्यःस्थितीतील सामाजिक नि राष्ट्रीय कल्पनांची काही कोडी उलगडण्यास नसली तरी कापून काढण्यास ती समर्थ झालेली होती. त्यांच्या घरी नोकरांपर्यंत संस्कृत भाषा थोडीबहुत समजत असे. ते आपल्या घराच्या ओसरीवरून बागेत फुले तोडीत असलेल्या आपल्या दोन मुलांच्या लीला पहात उभे होते. इतक्यात तिकडे त्या कुमारिकेवर भेंडी लागल्याने ती आपल्या भावास खेळकर रागाने म्हणाली, “भाऊ ! अशाने मी खेळणार नाही अं ! हा श्लोक तू आपल्या नियमाबाहेर म्हटलास. पंचमहाकाव्यातील हा श्लोक नाही. नि पंचमहाकाव्यातील श्लोक म्हणावयाचे म्हणून आपली प्रतिज्ञा आहे.”

“पण सुमती ! हा श्लोक रघुवंशातील आहे.”

“मुळीच नाही-” “आहे ग! पैज तुझी-माझी”, “हो हो पैज. चल बाबांना विचारू !” “का हो बाबा” तिचा भाऊ म्हणाला, “बाबा ! ‘सीते दुस्सहनं वनं !’ हा श्लोक कालिदासाचा नाही का हो ?” “नाही बाळ,” शास्त्री म्हणाले. “पण तो कुठला हे सुमतीने स्वतः सांगितले तर तिने जिकले असे मी समजेन !” “हा हा रामायणातील आहे.” सुमती चटकन म्हणाली. शास्त्री हसून म्हणाले, “खरोखरच.” तथापि रामायणातील काही अनुष्टुपे ही कालिदासाच्या अनुष्टुपाशी इतकी तंतोतंत मिळतात की जितकी गीतेतील उपनिषदांशी; म्हणूनच बाळ चुकला. “तो काही सुमतीने

धरण्यासारखा दोष नाही." "सोडण्याइतका का होईना !" सुमती खोचून म्हणाली. तोच तिच्या पायांभोवती वळसे काढीत पण किंचित अंतरावरून एक सतेज सर्प फिरताना दिसू लागला. शास्त्री लवमात्र न चमकता म्हणाले, 'सुमते ! बघ तो माझा फणींद्र तुझ्या पायाशी काही विनंती करीत आहे. तू आज सकाळचे फुले तोडण्याचे ते गाणे म्हटले नाहीस म्हणून तो आला असावा. ऐकीव त्याला ते गाणे !"

त्या सापाला पाहाताच 'फणींद्र,' 'फणींद्र', करून ती दोघे त्याच्यापाशी खेळू लागली. केव्हा चुटक्या वाजवून तर केव्हा शीळ घालून ते त्यास पुढे मागे बोलावीत. त्याच्याशी खेळता खेळता आणखी दोन-तीन नाग बिळातून बाहेर आले नि त्या खेळात भाग घेऊ लागले. आपल्या इकडे जशी मांजरे किंवा कुत्री आपण पाळतो त्याचप्रमाणे मलबारमध्ये सापांच्या सर्व जातींस लोक घरात, अंगणात बसू देतात, कुत्रे पिसाळेल नि मग ते प्राणघातक होईल ही कल्पना जशी आपण सहसा मनात आणीत नाही, तशीच ते लोक सर्प क्वचित चावेल ही भीती मनात आणीत नाहीत. पण कळत नकळत चवताळून सर्प चावत नाहीत असे मात्र नाही; तथापि, सर्पास मारणे हे साधारणतः क्रौर्य समजले जात असल्याने अनेक ठिकाणी पाळीव पशूंप्रमाणे सर्पही अंगणातून ओटीवर नि ओटीवरून अंगणात हिडताना दिसतात. हरिहरशास्त्री हयांच्या फुलबागेतील सर्पांचा त्यांच्या प्रेमावर नुसत्या धार्मिक दयेचाच नि सामाजिक रूढीचाच हक्क नव्हता, तर त्या सर्पांविषयी त्यांना जवळ जवळ वत्सलता वाटत असे. कारण जो नाग त्या मुलीच्या पायांभोवती लडिवाळपणे वर्तुळे घालीत होता तो हरिहरशास्त्री हयांच्या वृद्ध पित्यांनी मरताना आपल्या नातवाप्रमाणे हयालाही सांभाळ म्हणून त्यांच्या पदरात घातलेला होता. तो वृद्ध एके दिवशी पाऊस मी म्हणत असता एका वनातून येत होता. डोक्यावर जुन्या काळची ताडपत्री छत्री होती. त्या वनात पाऊस एकसारखा पडत असल्याने सर्व जीवजंतू थंडीने जवळ-जवळ थिजून गेलेले होते. अशा वेळी एका नागचाफ्याच्या झाडाखालून जात असता त्या वृद्ध ब्राहमणाच्या छत्रीवर वरून एक नागाचे पिल्लू पडले. पडताच छत्रीच्या वरच्या दांड्यास विळखा घालून ते तसेच तेथे राहिले. घरी येताच त्या वृद्धास दया येऊन त्याने त्या पिलास उबदार कपड्यात घालून ठेवले. हलके हलके त्या फुलबागेत त्याच्यासाठी एक लहान, सुंदर वारूळही बांधले. तेथे ते नागाचे पिल्लू वाढत वाढत एक अतरास भयंकर वाटणारा परंतु त्या वृद्धाच्या खांद्यावर नि हातांवर एखाद्या मुलाप्रमाणे बागडणारा नाग झाले. त्या फुलबागेतील इतर नागस्त्रियांशी त्याची सोयरीक जमून यथाकाली त्याची संततीही वाढू लागली. हे सर्व सर्प त्या बागेभोवती नेहमी फिरत नि तेथून जवळच असणाऱ्या धान्याच्या कोठारावर रात्री पहारा देत. एकदा काही चोर रात्री शास्त्री हयांच्या घरात शिरून धान्य नि धन घेऊन जात असता द्वाराशी येताच हया प्रचंड नागाने अडवून धरले. फूत्कार करीत नि भयंकर फणा उगारीत तो समोर उभा राहिला. त्यास पहाताच किंचित दबलेले ते चोर जो शस्त्र उपसून धावतात तोच ते इतर सर्प मागून नि बाजूने सरसावून त्या चोरांस घातक दंश कडकडून करते झाले, नि अंधेरात निसटून गेले. ते चोर दरवाजातून तीस-चाळीस

फुटांवरही जाऊ शकले नाहीत-तोच घेरी येऊन मुर्च्छित पडले, सकाळी वृद्ध शास्त्री उठतात तो त्या चोरांपैकी काही चोर आपल्या चोरून आणलेल्या द्रव्याच्या गाठोड्यावरच डोके टेकून गतप्राण झालेले, काही विषाच्या भयंकर वेदनांनी आसन्नमरण झालेले नि त्या सर्वांच्या भोवती एखाद्या कर्तव्यनिष्ठुर पोलीस अधिकाऱ्याप्रमाणे फेरी घालीत तो नाग पहारा देत असलेला त्या शास्त्रीबुवांच्या दृष्टीस पडला. त्या दयाळू ब्राह्मणास चोरीसाठी प्राणदंडाची शिक्षा फार झाली असे वाटून त्याने त्वरित सर्पाच्या विषावरील रामबाण उपाय, जे मलबारात कित्येकास माहीत असतात, ते करून चोरांस शुद्धीवर आणले नि सोडून दिले. तेव्हापासून त्या गावात ह्या नागाची ख्याती होऊन तो शास्त्रीबुवांच्या घरावर पहारा देण्यासाठी जन्म घेऊन आलेला त्यांचा मूळ पुरुष होय अशी किवदन्ती पसरली. हया गोष्टीहूनही एक विशेष गोष्ट म्हणजे त्या नागाची लहानपणापासून त्या सुंदर कुमारिकेवर जडलेली प्रीती होय. सापाचे प्रेम बसल्याने काही कुमारींचे जीवन धोक्यात पडले अशा अद्भुत गोष्टी कधीकधी घडतात. पण ह्या नागाचे त्या कुमारिकेवरील प्रेम तिच्या जिवास धोक्यात घालण्याइतके उद्दाम नव्हते. तो अगदी एखाद्या चतुर प्रियकरासारखा तिच्या अर्ध्या वचनात असे, तिच्याभोवती फिरणे, तिच्या हातून दूध पिणे, तिचे गाणे ऐकणे नि दिवसातून एकदा तरी तिचा हात आपल्या अंगावरून फिरवून घेणे हयात तो नाग आपला सर्व दिवस स्वर्गीय आनंदात नेत असे. केव्हा केव्हा मात्र तिच्या अंगास वेढून तिच्या मुखाकडे टक लावून बसावे अशी उच्छृंखल इच्छा त्यास होई नि ती पूर्ण न झाली तरी तो दूधच पीत नसे. जेव्हा सुमती निदान आपला हात तरी पुढे करून त्या नागास सुकुमार नि त्याच्या अंगाहूनही कांतिमान नि मृदुमांसल असल्याने एखाद्या नागिणीसारख्या शोभणाऱ्या आपल्या हातास वळसे घालून कवळू देई नि त्याच्या नेत्रांस आपल्या वदन चंद्रिकेस पिऊ देई, तेव्हाच तो नाग दूध पिई. हरिहरशास्त्री हा त्याचा सर्व लळा पुरवीत. सुमतीस नि त्या सर्व कुटुंबास तो नि त्याची सर्व संतती घरची माणसेच वाटत.

त्या सापाशी खेळता खेळता सुमतीची दृष्टी सहज वर गेली, तो दूरवर कोणी तरी उभे राहून हाताने आपणांस तिकडे बोलावीत आहे असे तिच्या पाहण्यात आले. “बाबा ! ते पहा कोण ते ! आपल्या इकडेच येत आहेत वाटते; पण ते तिथेच का उभे?” हरिहरशास्त्री यांनी वर पहातच म्हटले की, “तो थिय्यांचा पुढारी कम्बू असावा.” कम्बूविषयी हरिहरशास्त्री हयांनी प्रशंसा केलेली सुमतीने ऐकलेली होती. तेव्हा ती म्हणाली,”बाबा, अशा विद्वान मनुष्यास इकडेच का बोलावीत नाही ?” शास्त्री म्हणाले, “वा ! थिय्यांना येथे बोलावले तर उद्या हे सर्व ब्राह्मण मला येथून हुसकून देतील, मीच तिकडे जातो.” सुमती चटकन हसून म्हणाली, “खरंच का बाबा ! ब्राह्मणांच्या वठारात (वस्तीत) वावरणाऱ्या हया कुत्र्यांपेक्षा गदळ नि हया सर्पांपेक्षा भयंकर असेच का हे थिय्या लोक खरोखरीच असतात ?” असा छद्मी प्रश्न करीत, पण अगदी सहज खेळकर स्वभावाने करीत, कुमारिका घरातून निघून गेली नि शास्त्री आपल्या त्या तरुण मुलाबरोबर त्या थिय्याकडे

चालले. सुमती मागच्या बाजूने त्यांचे एक घर होते तेथे जाऊन त्या थिय्याशी आपल्या बापाचे संभाषण काय होते ते ऐकू जरी येणार नव्हते तरी कसे होते ते पाहता येईल म्हणून उभी राहिली.

हरिहरशास्त्री त्या एखाद्या तपोवनाप्रमाणे शांत नि निर्भय भासणाऱ्या ब्राह्मणागारातून चालू लागले. मधून कोकिळा उंच किलकिल करी. मधून गायी हंबरत. मधून वेदांची संथा चाललेली ऐकू येई. एका ठिकाणी दोन-तीन शास्त्री अत्यंत गंभीरतेने प्रदक्षिणेच्या वेळी प्रत्येक दोन पावलांत किती अंतर असावे हयाविषयी स्मृतीमध्ये काही स्पष्ट व्यवस्था दिलेली आहे की नाही नि नसल्यास ती कशी लावावी ह्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर वाद करीत असलेले दिसले. लवकरच ते कम्बू उभा होता तेथे आले. नि यथोचित अंतरापेक्षा बरेच पुढे होऊन एकांतात त्याच्याशी बोलू लागले. काही अगदी हळू नि काही जरा उंच असा त्यांचा संवाद चालता चालता कम्बू म्हणाला, "त्याची अगदी शंका नको. महाराज ! ज्या घराखाली सुरूंग लावलेला असतो ते घर केवळ तो सुरुंग खाली लावला जाताच हलू नि अस्वस्थ होऊ लागत नाही, परंतु त्या वेळच्या त्या घराच्या स्थिरतेने नि घरच्या माणसांच्या शांत निर्भयतेने जर कोणी म्हणेल की त्या घराखाली सुरुंग लावलेला आहे ही बातमीच खोटी आहे, तर त्याची समजूत कोणी घालावी ? सुरुंगात ठिणगी पडताच जो भयंकर धक्का बसेल तोच एक कोटिक्रम त्याची ही समजूत चुकीची ठरवू शकेल ! आज तुमच्या हया ब्राह्मण वठाराची स्थिती अगदी तशीच आहे. तो मौलवी दोनदा मला म्हणाला की, 'जर तू मुसलमान होशील तर एका महिन्याच्या आत तुला'- महाराज, हे वाक्य उच्चारून नये पण- न उघडणाऱ्या आईच्या डोळ्यांस उघडविण्यास समर्थ असणारे अनन्य अंजन म्हणून उच्चारतो तो म्हणाला, 'तुला नि तुझ्या थिय्यांना जे आज कुत्री फिरतात त्या मार्गावरूनही विटाळ होईल म्हणून जाऊ देत नाहीत त्याच या ब्राह्मण-मराठ्यांच्या मुलीच्या मंचकावर तुम्हांस नेऊन न बसवीन तर मी मौलवीच नाही ! जो जो थिय्या आज मुसलमान होऊन या लवकरच होणाऱ्या बंडात भाग घेईल त्या प्रत्येकास, तो निवडील ती ब्राह्मणाची मुलगी एक महिन्याच्या आत अर्पण केली जाईल !' महाराज रागावू नका! मलबारमध्ये आज काहीएक गडबड दिसत नाही ! हया तुमच्या शांत तपोवनात कोकिलांचा किलकिलाट हे काय जी शांती भंगितील ती भंगितील, अशी आज जरी स्थिती असली तरी आत्ता हया घडीस- हया तपोवनाखाली मोपल्या मुसलमानांच्या राक्षसी धर्मवेडाचा भयंकर सुरुंग लाविला जात आहे."

त्या मौलवीसारख्या दहापाच धर्मोन्मत्तांच्या मारहाणीने डळमळून जाईल इतके का ब्रिटिश राज्य दुर्बल आहे ?" त्या थिय्यांच्या बातमीचा जरा परिणाम होऊ लागल्यामुळे थोड्याशा चिंतायुक्त ध्वनीने शास्त्रीबुवांनी विचारले.

"दहापाच धर्मोन्मत्त मौलवी नव्हेत ! तर एकूण एक मोपला हया बंडात शस्त्र घेऊन खिलाफतीसाठी उठणार आहे. हया विरहित त्या मौलवीने मला हेही सांगितले आहे की, 'अरबस्थानातून दारूगोळा समुद्रमार्गे त्यांस पोहोचविला जाणार असून अफगाणिस्थानचा अमीर हा त्याच वेळेस पन्नास-साठ हजार फौज घेऊन हिंदुस्थानवर स्वारी करणार आहे. आमच्या

उठावणीचाच काय तो विलंब आहे. आम्ही बंड करून उठताच तीन महिन्यांच्या आत तुर्कस्थानचा झेंडा झुलवीत अनवर बेन आम्हांस येऊन मिळणार आहे', असे तो मौलवी वारंवार म्हणत होता."

"हा अनवर बेन कोण ?"

"तो तुर्क आहे नि त्याला हिंदुस्थानातील मुसलमान सर्व जगातील मुसलमानांना स्वतंत्र करण्यासाठी धाडलेला ईश्वरी वीर समजतात."

"अरे पण, तो अनवर जर तुर्क आहे म्हणतोस तर मोपल्यांचा तो कोण लागतो ? हे मोपले तर आमच्या हिंदूंचे वंशज !"

"भलतेच महाराज ! ते स्वतःस अरबस्थानातील महंमदाच्या कुरेशी वंशातील समजतात. एकवेळ अरबी लोक किंवा कुरेशी देखील हिंदूंविषयी काही ममत्व धरीत असतील; पण हे मोपले-आमच्या हिंदूंचे वंशज आपल्या हिंदूंविषयी तितकी देखील ममता ठेवणार नाहीत. दहा-पंधरा वर्षांपूर्वी एकदा जेव्हा मोपले लोकांनी दंगा केला होता, तेव्हा त्यांनी उभ्या अरनाड तालुक्यात हिंदूंना बळाने मुसलमान बनवीत वा ठार मारीत आकान्त केला नाही का ? तो काळ आपल्या आठवणीत असेलच ?"

"काय म्हणतोस? तो दंगा करणारे तेच हे मोपले होते ?" काही तरी मर्मभेदक आठवण झाल्याप्रमाणे दचकून जाऊन शास्त्रीबुवांनी विचारले. कारण जरी तो दंगा नि त्याची कारणे याचा विचार नि आठवणही कुट्टम् येथील ब्राह्मणादिक हिंदूंस जवळजवळ उरलेली नव्हती- कारण तो त्यांच्या गावात झालेला नव्हता नि इतर गावी काय होते हयाची उठाठेव करण्याइतकी सार्वजनिक कळकळ हया विस्कळीत हिंदू समाजास असती तर हे दिवस येतेच ना- तथापि हरिहरशास्त्री हयास त्या दंग्यासंबंधी स्मृती इतकी तीव्र राहण्याचे कारणही तसेच तीव्र होते. त्यांची प्रत्यक्ष आजीच त्या दंग्यात त्यांच्या आजोळच्या गावी मोपल्यांनी पकडली होती; तिला मुसलमानाच्या घरात बळाने एक वर्षभर कोंडून ठेविली होती नि शेवटी अन्नपाणी सोडून त्या साध्वीने तेथेच प्राण दिला होता; ती स्मृती होताच नि तेच हे मोपले हे कळताच शास्त्रीबुवांच्या हृदयात धक्का बसल्यासारखे झाले. कम्बू थिय्या जी बातमी सांगत होता, त्या बातमीतील भयंकर मर्म त्यांस आता कळू लागलेसे दिसले. तथापि पुन्हा त्यांनी विचारले, "काय म्हणतोस ? तेच हे मोपले पुन्हा बंड करून उठणार ? पण काय रे आपल्या या कुट्टम् गावी तर मागे तसा काही प्रकार झाला नाही. त्याचे कारण येथील ही पाच-सहा मोपल्यांची घरे ही काही धर्मवेडी नसून अगदी गरीब नि हया आपल्या गावच्या हिंदू अस्पृश्यांच्या वंशातीलच आहेत. तेव्हा तिकडे काही होत असेल अरनाड तालुक्यात. पण इथे आपल्या गावी काही भीती नको."

"महाराज ! हया गावी संकट नाही ? अहो ! या तुमच्या हिंदू अस्पृश्यांच्या वंशातीलच जी ही गरीब दिसणारी चार-पाच मोपल्यांची कुटुंबे आहेत त्यांच्यातीलच तो मौलवी आहे- की ज्याने मला नि मुसलमान होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक थिय्याला इष्ट त्या त्या ब्राह्मण नि नायर कन्या देऊ केल्या आहेत ! हया पाळीस मोपले सर्व मलबारभर एकदम उठावणी करणार आहेत. आणि

यद्यपि हे गृहीत धरले की अरनाड तालुक्यातच हिंदूंवर भयंकर संकट गुदरणार असून आपल्या कुट्टमला शांतता नांदणार आहे. तथापि मी विचारतो की त्या अरनाड तालुक्यातील हिंदूंच्या संकटात आपण विभागी व्हावयास नको काय ? त्यांच्या बायकामुलांवर जे संकट गुदरणार आहे ते आपल्या कुटुंबावर गुदरले आहे असे समजून त्याच्या प्रतिकारासाठी आपण धावून जावयास नको काय ? त्यांच्या बहिणी त्या आपल्याच बहिणी नव्हेत काय? त्यांची देवालये ती आपल्याच देवांची नव्हेत का ? मग त्यांचा नाश तोच आपला नाश. जेथे सर्व हिंदू जातीच्या सुखदुःखाचा प्रश्न आहे तेथे पेशावरच्या महार-वाड्यातील हिंदू झोपडी ही रामेश्वरच्या नगरसीमेतच समजली पाहिजे. आज अरनाडवर प्रसंग आहे म्हणून कुट्टमला लाज वाटावयास नको का? अरनाडला आज त्या मुसलमानांनी तुमच्या हिंदूंच्या मुली पळवून बायका केल्या नि तुमच्या मूर्ती भ्रष्ट केल्या हे येथील मुसलमान सांगतातना तेव्हा आमची तोंडे लज्जेने काळी ठिक्कर पडत नाहीत काय? निदान पडली पाहिजेत. पण ते सर्व सोडा. मला क्षमा करा. पण मी तुम्हांस स्पष्ट सांगतो की- माझे हे निष्ठुर कर्तव्य म्हणून सांगण्याचे क्रौर्य करतो की, आता एखाद्या कांचनलतेसारखी मोहक नि प्राणासारखी प्रिय अशी जी आपली कन्यका आताच फुलबागेतून तुमच्या घरात गेली, महाराज ! तिच्या पवित्र सन्मानाची नि जीवनाची होळी होऊ नये अशी जर तुमची इच्छा असेल तर-वेळीच सावध व्हा !”

हरिहर शास्त्रीबुवांच्या पोटात धस्स झाले. परंतु मनुष्य स्वभाव असा चमत्कारिक आहे की, अपमान आपल्यावर कोसळला तरी चालतो. पण त्याचे नाव घेऊन तो कोसळणार आहे असे सांगितलेले सोसवत नाही. आपल्या प्रिय, सुंदर नि सुशिक्षित कन्यकेचे नाव या थिय्याने नि अशा भयंकर भविष्यवाणीत घ्यावे हयाचाच त्यांना अधिक विषाद वाटला नि त्या भावी भयाने धस्स होत असताही त्यांच्या तोंडावर असंतोषाची छाया येऊन गेली. पण लवकरच विवेकाने सावरून ते म्हणाले, ‘कम्बू ! तर मग हया अनर्थाचा प्रतिकार करण्यास उपाय काय ? आणखी काय रे ! आजकाल तर हिंदू-मुसलमानांने ऐक्य स्थापित झाले आहे ना ? खिलाफतीस स्वधर्माच्या प्रश्नाप्रमाणे हिंदूंनी आपलासा केला नि म्हणून मुसलमान त्यांच्या शब्दाबाहेर पाऊल टाकीत नाहीसे झाले आहेत ना ? मग तू हे बंड होणार म्हणतोस हे हिंदूंच्या विरुद्ध कसे असेल ?”

“महाराज ! हया भावी अनर्थाचा प्रतिकार कसा करावा म्हणून जे विचारलेत त्याचा हाच पहिला उपाय प्रथम ही समजूत की हिंदू मुसलमानांचे झालेले ऐक्य हे हिंदूंच्या सुरक्षितेस पोषक आहे; ही समजूत ठार केली पाहिजे. तुम्ही म्हणता त्या वाक्याचा पूर्वार्ध खरा आहे; की हिंदूंनी खिलाफतीच्या प्रश्नास स्वधर्माच्या प्रश्नाप्रमाणे समजून आपलासा केला आहे. पण त्याचा उत्तरार्ध मात्र अवास्तव आहे. कारण हिंदूंनी खिलाफतीस आपलेसे केले म्हणून मुसलमान हिंदूंच्या शब्दाबाहेर पाय टाकू नये, असे मानीत नसून, हिंदूंनी आपल्या शब्दाबाहेर पाय टाकू नये असे म्हणत आहेत. ही सत्यस्थिती हिंदूंच्या दृष्टीस आणून हया बंडास असावधपणे कोणतेही साहय न देता त्यांची कंबर एव्हापासूनच नि उघड प्रतिरोध करून मोडून टाकावी हे हिंदूंस समजावून देणे

हाच अनर्थाच्या प्रतिकाराचा पहिला उपाय. पहिला पण एवढाच नव्हे; कारण, हिंदूंच्या आधारावर हे बंड मुसलमान करीत नाहीत. हिंदूंस,ते मिळोतर वा न मिळोत-बाटवून टाकावयाचेच हे तर हया बंडातील एक महत्त्वाचे ब्रीदवाक्य नि युद्धगर्जना व्हावयाची आहे. तेव्हा दुसरा उपाय म्हणजे त्वरित आपणा हिंदूंची स्वसंरक्षणार्थ पथके निर्माण करणे हे होय. हे काम आताच आरंभिले पाहिजे. तो मौलवी जो येथून गेला, तो अरनाड येथे त्यांच्या मुख्य सभेत बहुधा दोन-तीन दिवसांत जाऊन प्रतिवेदन करील की कुट्टम् येथील थिय्या लोक स्वेच्छेने मुसलमान होत नाहीत. इतर जातीची तर गोष्ट बोलावयास नको ! बहुधा कुट्टम् देशाचे नाव त्या टिपणीत दाखल केले जाईल की जीत ज्या हिंदूंच्या गावास बलात्काराने मुसलमानी धर्म स्वीकारावयास लावून त्यांची अवघी मत्ता काफिरांची म्हणून जप्त व्हावयाची, आणि हया मत्तेने हिंदू स्त्रिया ही धर्मवीरांची न्यायसिद्ध लूट म्हणून हरण करावयाच्या आहेत, त्या गावची नोंद आहे ! नि हेही निश्चितच आहे की, हया लुटीत, हया पवित्र, निरपराध नि लावण्यवती कन्येचा वाटा त्या नीच मौलवीचा म्हणून ठरणार ! महाराज ! राग करू नका ! माझा करू नका-जो राग करावयाचा तो ह्या पापाचरणास प्रवृत्त झालेल्या नीचांचा ! मी एक दुष्ट बातमी वेळेवर पोहोचवून तिच्या परिणामापासून तुमचे संरक्षण करण्यास आलेले पत्र आहे ! मला फोडून, तोडून टाकू नका. तर त्यातील बातमीचा नीट विचार करून त्या संकटावर नि दुष्टांवर आपला सूड उगवा !"

"तू म्हणतोस तसेच ! कम्बू ! चल ! कसा आरंभ करावा सांग !"

"ठीक आहे महाराज; पहिली गोष्ट म्हणजे अरनाड तेथे जाऊन तेथील मुसलमानांच्या मुख्य केंद्रातील मंडळींनी तेथील ज्या हिंदू पुढाऱ्यास भूलथापा देऊन 'स्वराज्या'च्या नि 'ऐक्या'च्या साखरेत गुंगीच्या विषाच्या गोळ्या चारल्या आहेत त्या हिंदूंस शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न मी करतो. ते वेळेवर शुद्धीवर आले तर ठीकच; नाहीतर निदान आपण कुट्टमच्या तरुण हिंदूंस तरी धर्मरक्षणार्थ सज्ज करून ठेवू. थिय्यांमधील तरुण हया कार्यास सिद्ध आहेत."

मध्येच तो कम्बूबरोबर आलेला थिय्या तरुण म्हणाला, "हो ! हो ! हिंदू धर्मरक्षणार्थ आम्ही मरावयास देखील सिद्ध आहोत."

"आपण तेवढे या ब्राहमणागारात, पांडवांच्या शिबिरात ज्याप्रमाणे द्रौपदेयादी होते त्या प्रमाणे, स्वस्थ घोरत पडलेल्या आपल्या बंधूंस सावध करून ठेवा. मी अरनाडहून येताच आपणास भेटतो."

हा संवाद इकडे चालला असताना प्रथम आपल्या घरामागे काही वेळ उभी राहिल्यानंतर हळूहळू पुढे सरकत शास्त्र्यांच्या दृष्टीस न पडेल, परंतु त्या सर्वांचे संभाषण स्पष्ट नसले तरी अस्पष्टपणे ऐकून घेऊन नि त्या थिय्यास स्पष्टपणे बघता येईल अशा अंतरावर, एका नारळीच्या आड येऊन गुपचिप उभी राहिली होती. तिला सरकताना त्या थिय्या तरुणाने पाहिलीही होती. तिनेही त्याला आपणास पाहताना पाहिले होते. थिय्याचे शब्द तिने बहुधा इतके स्पष्ट ऐकले असावे. त्या थिय्या तरुणाच्या ऐटदार अंगलटीस तर तिला निरखून पहावे असे देखील वाटले. दोनदा तिच्या सुशिक्षित मनात असा विचार येऊन गेला की, शरीररचना पाहिली असता हा थिय्या

तरुण ब्राह्मण तरुणांत सोडून दिला तर पुन्हा निवडणेही कठीण व्हावे इतका मिसळून जाईल ! मग हयास असे अस्पृश्य का बरे लेखिले ? रक्त, जाती, रूप इतके अभिन्न ? मग जे ब्राह्मण, क्षत्रिय सापसुद्धा पाळतात ते हयास इतके निष्ठुरपणे का बरे हिडिसफिडिस करतात ? हा सहानुभूतीचा विचार तिच्या हृदयात उद्भवत असताच आकस्मिकपणे त्या थिय्या तरुणाच्या वरचेवर पण सावधपणे तिच्याकडे पाहणाऱ्या दृष्टीस तिची दृष्टी भिडली. तिला वाटले, त्याच्याशी बोलावे. तिच्या दृष्टीत ती सहानुभूतीची लकेर पुन्हा पाहण्यासाठी कोण्या महत्कार्यात आपले प्राणही अर्पण करावे.

इतक्यात कम्बूचा नि शास्त्रीबुवांचा तो संवाद संपून कम्बूने निरोप घेताना साष्टांग दंडवत घातला. कम्बू परतला. त्या थिय्या तरुणाने निघता निघता मागे पाहिले- तो त्या ब्राह्मण कन्यकेची सहानुभूतीची दृष्टी पुन्हा त्याच्या दृष्टीस. ती तिथेच आडोशास उभी होती. त्याच्या इच्छेच्या इतकी सन्निध ! त्याच्या आशेच्या इतकी सुदूर !

हरिहरशास्त्री जड पावलांनी आपल्या घराकडे चालले. आपल्या आजीची झालेली भयंकर स्थिती नि त्याच राक्षसांच्या तसल्याच क्रौर्यास आपली स्वतःची ही अल्लड प्रियतम कन्या आता बळी पडणार की काय ! छे ! तो सर्व विचार स्वतःच्या मनात देखील जुळवून घेण्याचे त्यांस धैर्य होईना. त्या वनातून परत जाताना पुन्हा त्या घरावरून ते गेले की जेथे प्रदक्षिणेच्या दोन पावलांत किती अंतर असावे हया विषयाचा स्मृतिशास्त्राधारे गंभीर वाद करीत शास्त्री मंडळी बसलेली होती, तो वाद आता अगदी भरात आला होता ! परंतु शास्त्रीबुवास आता त्यांचा तो वाद कर्कश लागू लागला नि कशाने कोण जाणे-तो वाद ऐकताच त्यांची भीती जणू द्विगुणित होऊन कम्बूची बातमी खरी असावी असे त्यांस वाटू लागले.

## ३. हिंदू-मुस्लिम ऐक्य !

कालिकत येथे एका विस्तीर्ण बंगल्यात खिलाफत मंडळाच्या हिंदू शाखेची सभा भरली होती. पंजाबकडून एक प्रख्यात खिलाफत चळवळीचे धुरीण अल्लाबक्ष हे मलबारास भेट देण्यास आले होते. गावातील हिंदू-मुसलमानांच्या वतीने त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात आले होते. त्या सभेत हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी हिंदूंनी काय केले पाहिजे हया विषयावर अल्लाबक्ष यांचे फार परिणामकारक व्याख्यान झाले. इतके परिणामकारक की, परत मिरवणुकीच्या वेळी खानसाहेबांच्या गाडीचे घोडे सोडून हिंदू लोकांनी ती स्वतः ओढीत नेली ! मिरवणुकीत एकदा कोणी एक "वंदेमातरम्" म्हणून ओरडला; परंतु-परंतु त्यास साथ देण्याइतका मूर्ख नि अनुदार हिंदू कोणी मिळाला नाही ! मुसलमानांनी मात्र तो शब्द उच्चारला गेला असता शांतवृत्ती ठेवून दंगाधोपा केला नाही. हिंदू पुढाऱ्यांनी लगेच आज्ञा फर्माविली की, सर्वांनी 'अल्ला हो अकबर' असा एकच जयघोष करून हिंदू-मुसलमानांची एकी दृढ होत चाललेली आहे हे जगाच्या प्रत्ययास आणून द्यावे !

मिरवणूक संपताच रामनारायण नंबुद्री, माधव नायर, सीताराम चेट्टी इत्यादी हिंदू पुढारी अल्लाबक्ष हयांसह त्या बंगल्यात गोळा झाले. कालिकतच्या खिलाफत चळवळीचे प्रमुख पुरस्कर्ते महानंदी अय्यर हेही तेथेच उपस्थित असल्याने सभेच्या अध्यक्षस्थानी त्यांचीच योजना झाली. ते म्हणाले, "आजच्या व्याख्यानाने कालिकत नगरातील लोकांवर जो परिणाम झाला आहे त्याचा त्वरित लाभ घेऊन खिलाफतीच्या चळवळीसाठी हिंदूंनी काय करावयाचे ते प्रयत्न करण्यास आताच आरंभ व्हावा म्हणून ही सभा भरली आहे."

माधव नायर म्हणाले, 'स्वराज्य खिलाफतीच्या चळवळीसाठी' असा शब्दप्रयोग ठरावात असावा.

तेव्हा हया सहेतुक उद्दामपणाने चिडून मौलाना ऐटखान म्हणाले, "स्वराज्य, खिलाफतीच्या बोकांडी! हिंदू-मुसलमानांच्या बोकांडी ! असे असेल तर मी हा सभेतून उठून जातो."

ओशाळे झाल्यासारखे होऊन माधव नायर म्हणाले, "क्षमा करा, मौलवीजी ! माझा तसा मुळीच उद्देश नव्हता. आपल्या धार्मिक भावना दुखत असल्या तर ठरावात खिलाफत- स्वराज्याची चळवळ असा आपण उल्लेख करू." मौलवी ऐटखान म्हणाले, "मुळीच नाही ! हे स्वराज्याचे खूळ तुम्ही आमच्या खिलाफतीवर तुमचा विश्वास नाही म्हणून मध्येच आणता. हा मुसलमानी धर्माचा नि जातीचा उपमर्द आहे."

इतक्यात एका कोपऱ्यातून धीटपणे उठून एक तेजस्वी पुरुष म्हणाला, "पण मौलानासाहेब ! खिलाफत ही संस्था नि चळवळ मुसलमानी असताही हिंदू लोक जर तिला पाठिबा देतात, तर हिंदूंच्या स्वराज्याच्या चळवळीस मुसलमानांनी इतके उपमर्दकारक का मानावे ?"

"तू मूर्ख आहेस !" ऐटखान उसळून म्हणाले, "खिलाफत हा आमचा धर्मच आहे. उमरच्यापूर्वी, अब्बासच्यापूर्वी प्रत्यक्ष पैगंबराबरोबरच खिलाफतचा जन्म झालेला आहे. पण ही तुमची हिंदूंची स्वराज्याची चळवळ आजची आहे, नवीन आहे. म्हणून ती उपमर्द कारक आहे."

"स्वराज्याची चळवळ नवीन नाही-" तो पुरुष म्हणाला, "महंमद पैगंबरांच्या पूर्वी ती विक्रमाने केली होती, कृष्णाने केली होती, रामचंद्रा-"

"बस्स ! बस्स ! त्या काफरांचे नाव काढू नकोस. पैगंबर-नि कृष्ण ! निश्वासात दोन्ही नावे ! पैगंबराचा हा अपमान आहे ! चूप ! नाही तर जीभ उपटून काढीन !" असे म्हणत मौलाना ऐटखान त्या हिंदूवर चालून गेले.

"हां हां," असे म्हणत मंडळी मध्ये पडली. अध्यक्ष महानंदी उठून म्हणाले, "शांत व्हा मौलानाजी, मी आम्हां सर्व हिंदूंच्या वतीने त्या मनुष्याच्या उद्दामपणाविषयी आपली क्षमा मागतो. हे उद्दाम मनुष्या ! ही सभा अनत्याचारी असहकारवादी लोकांची आहे हे तू कसा विसरतोस? येथे तू आपल्या मुसलमान बंधूंशी असले अत्याचाराचे वर्तन केलेस हे हिंदू धर्मास लांच्छनास्पद आहे. ठरावाध्ये 'खिलाफतीची चळवळ' असेच शब्द असावे असे मी ठरवितो." "ठीक," हातात माळ घेऊन शांतपणे बसलेला एक मुसलमान मौलवी म्हणाला, "हेच ठीक. आमच्या प्रिय हिंदू बंधूंच्यासाठी आम्ही प्राणदेखील देऊ. दोघांचे लक्ष एकाच शब्दात व्यक्त झाले म्हणजे आपल्या ऐक्याला शोभा येते. पुन्हा खिलाफतीत स्वराज्य आहे;- पण स्वराज्यात खिलाफत असेलच असे नाही. तेव्हा महानंदींनी योग्य निकाल दिला. महानंदी खरोखरीच महापुरुष आहेत."

"ते खरेखुरे हिंदू आहेत !" सभेतून एकवाक्यता उद्‌गारली.

"नुसते आशीर्वाद नको आहेत. खिलाफतीसाठी हिंदू लोक काय काय प्रत्यक्ष साहाय्य देतात त्यावरून त्यांची ही एकीची भाषा किती खरी आहे हे मुसलमान पारखतील." मौलाना ऐटखान रागाने फुरफुरलेली दाढी हाताने थोपटीत म्हणाले. "आम्ही खिलाफतीच्यासाठी मोपला लोकांची स्वयंसैनिकांची पथके उभारणार आहोत. परंतु मोपले लोक निर्धन असल्याने नि त्यांचे धन हिंदू भुंग्यांनी (जमीनदारांनी) हरण केले असल्याने माझी अशी सूचना आहे की, स्वयंसैनिकांच्या खर्चाचा सर्व भार हिंदूंनी सोसावा."

"उचितच आहे," महानंदी म्हणाले.

"माझी अशी सूचना आहे की, त्या स्वयंसैनिकांच्या अधिकाऱ्यांत काही हिंदू गृहस्थ असावेत." माधव नायर म्हणाले.

"काय ? मुसलमानांवर अविश्वास ? मुसलमानांवर हिंदू अधिकारी ? हा मुसलमानी धर्माचा उपमर्द आहे ! मुसलमान गुलाम होण्यास जन्मलेले नाहीत ! ते राज्य करावयास जन्मले आहेत!"

"क्षमा करा ! मौलानासाहेब ! माझा तसा उद्देश नव्हता." ओशाळे झाल्यासारखे होऊन माधव नायर म्हणाले. "आपल्या धार्मिक भावना दुखत असतील तर मी असे सुचवितो की, त्या स्वयंसैनिकांत मुसलमानी अधिकाऱ्यांच्या हाताखाली हिंदू स्वयंसैनिक असावेत."

ऐटखान म्हणाले, “मुळीच नाही; खिलाफतीच्या रक्षणाकरिता मुसलमानी स्वयंसैनिक होणे हा आमचा धर्मच आहे. उमरच्या पूर्वी, अब्बासच्या पूर्वी, पैगंबराच्या वेळेपासून मुसलमानी खिलाफत रक्षणाचे काम मुसलमानांनीच केले पाहिजे असा हुकूम आहे. काफरांनी केवळ जिझिया द्यावा. पण प्रत्यक्ष स्वयंसैनिक त्यांना कधीच होता येणे नाही.”

“पण !” माधव नायर जरा आग्रहाने मध्येच म्हणतात, तोच “चूप. तू मूर्ख आहेस,” ऐटखान पुन्हा उसळून म्हणाले. “स्वयंसैनिक खिलाफतीच्या रक्षणाकरिता मुसलमान असावेत हा आमचा धर्म आहे सांगितले ना! तुझी सूचना नवीन आहे म्हणून तो आमचा उपमर्द आहे ! आमच्या धर्माविरूद्ध कोणी बोलेल तर मी जीभ उपटून टाकीन !” असे म्हणत मौलाना चालून जाऊ लागले. “हां हां !” असे म्हणत मंडळी मध्ये पडली. अध्यक्ष महानंदी उठून म्हणाले, “शांत व्हा मौलवीजी ! माधव नायरांची सूचना निःसंशय आमच्या मुसलमान बंधूंवर हिंदूंचा विश्वास नाही असे दर्शविणारी होती. मुसलमान गुलाम होण्यास जन्मलेले नाहीत, हा मुसलमानांचा बाणा निःसंशय अभिनंदनीय आहे. माधव नायर ! आपण इथे सर्व अनत्याचारी असहकारितावादी जमलेले असताना मौलवीस शब्दाने तुम्ही दुखविलेत हे आपणांस शोभले तरी कसे ? मी असा निर्णय देतो की, आमच्या मुसलमान बंधूंस खिलाफतीच्या रक्षणार्थ स्वयंसैनिकांची पथके उभारण्याचा पूर्ण हक्क असून खर्चासाठी हिंदूंनी सर्व धन-ज्यास हे मौलवी ‘जिझिया’ म्हणतात तो द्यावा.”

“ठीक ! ठीक !” हातात माळ घेतलेला तो शांत मुसलमान मौलवी म्हणाला, हेच ठीक. परंतु आमच्या परमप्रिय हिंदू बांधवांच्या या प्रेमाने मोहित होऊन मी असे सुचवितो की, मुसलमानांनी हिंदू जे धन देतील त्यास ‘जिझिया’ न म्हणता केवळ ‘वर्गणी’ म्हणून म्हणण्याचा उदारपणा दाखवावा.”

“मौलवी थोर पुरुष आहेत ! मौलवी आमच्या हिंदूंचे हितकर्ते आहेत.” सभेतून हिंदूंची एकवाक्यता गर्जली.

“मौलवी माझे धाकटे भाऊ आहेत !” महानंदी म्हणाले, “नि त्यांच्या हया अत्युदार सवलतीचे ऋण फेडण्यास मी असा निर्णय देतो की, जर हिंदूंकडून मोपला स्वयंसैनिकांचा खर्च भागण्याइतके धन स्वेच्छेने मिळाले नाही तर आमच्या मुसलमान बांधवांस ते शक्य त्या उपायांनी वसूल करून घेण्याचा हक्क आहे!”

“मान्य ! मान्य !” हिंदू लोक म्हणाले.

“महानंदी निःसंशय महापुरुष आहेत.” मुसलमान म्हणाले. “महानंदी माझे बडे भाई आहेत.” तो शांत मौलवी म्हणाला.

“परंतु माझी अशी विनंती आहे की, हया निर्णयाचा हिंदूंनी नीट विचार करावा. धन शक्य त्या उपायांनी मुसलमानांनी हिंदूपासून वसूल करून घ्यावे म्हणजे काय ? त्यांची घरे लुटून ? का गुरे विकून ? का देवमूर्तीस-”

“ए काफर ! पकडो सालेको ! गिरादो.” असे म्हणत मौलवी ऐटखान आपल्या साथीदारांसह पिसाळलेल्या वाघासारखा तुटून पडत म्हणाला. महानंदी देखील चिडून गेल्यासारखे दिसले नि मोठेमोठ्याने हे वाक्य बोलत असणाऱ्या त्या तेजस्वी पुरुषास, “ ही अनत्याचारी लोकांची सभा आहे ! लूटमारीचे नाव देखील येथे काढू नकोस ! आमचा मुसलमान बंधूंवर विश्वास आहे. ते करतील ते उत्तमच करतील !” इत्यादी वाक्ये ओरडत होते.

त्या गर्दीस मुळीच न डगमगता तो पुरुष म्हणाला, “अहो जो लूटमारीचा उल्लेख करतो तो अत्याचारी का जो लूटमार करतो तो ?”

हया वाक्याने तो शांतपणे बसलेला मौलवी देखील खवळला. सीताराम चेट्टी तर त्या मौलवीच्याहीपुढे घुसून त्या पुरुषास म्हणाला “नीचा, हिंदू-मुसलमानांचे ऐक्य बिघडवितोस ? लूटमारीचे नाव हया सभेत ?” असे म्हणून नि त्या पुरुषास जोराचा एक ठोसा लगावून म्हणाला, “माहीत नाही तुला की आम्ही अनत्याचारी, असहकारितावादी आहोत ते ?”

नारायण नंबुद्रीने त्यासरशी त्या पुरुषास लाथ मारून विचारले, “माहीत नाही तुला की सीताराम चेट्टी अनत्याचारी आहेत ते ?”

तो मौलाना ऐटखानही तेथे पोहोचून नि त्या पुरुषाची मानगुटी घट्ट धरून ओरडले, “काफर ! माहीत नाही तुला की, नारायण नंब्रुद्री अनत्याचारी, असहकारवादी आहेत ते ?”

आता मात्र त्या पुरुषाची सहनशीलता संपली. त्याने गुदमरून जाऊ पाहणारी आपली मान कशीबशी त्या मौलानाच्या पकडीतून सोडविली नि त्याची रागाने फुरफुरलेली दाढी एका हाताने गुंडाळून धरून दुसऱ्या हाताने त्याच्या श्रीमुखात ताडकन भडकाविली ! हे पाहाताच त्याच्या मागे उभा असलेला एक तरुण पुढे सरसावला नि त्याने त्या मौलानास मारून, उचलून धाडकन भूमीवर आपटले. त्यासरशी त्या सभेतील अनेक हिंदू त्या दोघा जणांवर तुटून पडून काठ्यावर काठ्या घालू लागले. ते दोघे रक्तबंबाळ झाले, पण त्यांनी त्या मौलानास तसे तिबवीत ठेवले होते. थोड्या वेळाने ते दोघे इतर हयांच्यामध्ये स्वतः महानंदी उभे राहिल्याने सभागृह थोडे शांत झाले. महानंदीने आज्ञा केली की, त्या दोघांस अत्याचारी वर्तनाबद्दल बाहेर घालवून द्यावे.

माधव नायर कचरत म्हणाले, “पण वास्तविक पहाता त्यांच्या अंगांवर मौलानाच पहिल्याने चाल करून गेले होते.”

“चुप रहो !” मौलाना उसळून म्हणाले, “कोणाही नास्तिकावर नि मूर्तिपूजकावर आघात करणे हा आमचा धर्मच आहे. उमरच्या पूर्वी, अब्बासच्या पूर्वी, प्रत्यक्ष पैगंबराने कुराणात हुकूम आणला आहे की, पैगंबरावर विश्वास न ठेवणाऱ्या मूर्तिपूजकावर कधी प्रीती करू नका. आघात करणे हा मुसलमानांचा बाणाच आहे. पण प्रत्याघात करणे ही जी हिंदूंनी नवीन रूढी काढली आहे ती मुसलमानी धर्माचा उपमर्द करणारी आहे ! ही सभा काफरांची आहे. मी ही सोडून जातो ! कारण तुम्ही सर्व त्या मनुष्याच्या धर्माचे आहा ! त्यास ठार का नाही मारीत?”

“थांबा मौलानाजी ! आम्ही त्यास ठार मारतो.” रामचंद्र चेट्टी म्हणाले, “पाजी कुठला ! हिंदू-मुसलमानांचे ऐक्य बिघडवितो ! आम्हा अनत्याचारी असहकाऱ्यांना कलंक लावतो !”

परंतु मौलानांना इतका चोप मिळाला होता की, आता त्या दोघांच्याकडे पुन्हा धीटपणे पाहाण्याची त्यांची छाती नव्हती. म्हणून पानावर पान ठेवून ते ओरडत सभेतून निघून गेले. त्यांच्या मागोमाग तो माळ घेतलेला मौलवीदेखील चालला. पण त्या पुरुषाने त्या मौलवीस दारात अडवून नि आपले लावलेले कल्ले उपटून विचारले, ‘मला ओळखलेस?’ मौलवी चकित होऊन म्हणाला, “काय ? तू कम्बू ?” कम्बू म्हणाला, “होय ! आणि तू तो मौलवी जो आम्हा थिय्यांस मुसलमान झालो तर त्याच ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांच्या मुली वाटून देणार होतास !”

## ४. मारा, लुटा, बलात्कारा !

तिरुरंगाडी नावाच्या गावात मुख्य मशिदीत अली मुसेलियर बसला होता. त्याच्या आजूबाजूस शेकडो मोपल्यांचा समूह हातात भाले, तलवारी नि काही बंदुका घेऊन बसला होता. दूरवर मोपल्यांच्या स्त्रिया, मुले, माणसे ह्यांची एकच दाटी झालेली असून ते सर्व लोक मोठमोठ्याने “अल्ला हो अकबर!” म्हणून ओरडत होते. त्यांच्यातील काहींच्या अंगांवर घाव लागून त्यांतून भळभळ रक्त वाहात होते, तर काही विव्हळत पडलेले होते. अली मुसेलियरच्या पुढे तीन प्रेते छिन्नभिन्न होऊन आपल्याच रक्तात भिजत पडलेली होती. उतावळेपणाने अली मुसेलियरने विचारले, “कासम, त्या काफरास आणले की नाही ? अल्ला ! तू हया इमानदारास-आम्हां मुसलमानास पहिला विजय दिलास ! तुझे अनंत आभार आहेत ! हया इंग्रजांच्या राज्याचे तुकडे उडवून दिले ! हया अरनाड तालुक्यात एक तार उरली नाही की कचेरी नाही की गोरा चेहरा दिसत नाही ! बस्स ! यारो इंग्रजोंका राज खतम हो गया ! अल्ला हो अकबर!”

“अल्ला हो अकबर ! यारो, परंतु अजून काम ते पुढेच आहे,” तो मौलवी- जो आपल्याला प्रथमपासूनच, परिचित झालेला आहे- म्हणाला, “आपण कशाकरिता हया इंग्रजांच्या पोलिसांच्या रक्तात आज न्हालो आहोत ? तर खिलाफतकरिता! पण हे इंग्रजांचे पोलीस असतात कोण ? पहा हया काफराचे हे डोके-” असे म्हणत त्या मौलवीने अली मुसेलियरच्या पायासमोर पडलेल्या शिपायांच्या त्या तीन मुडद्यांतून एकाचे शीर छाटून त्याची शेंडी धरून लटकावीत विचारले, “हे पहा इंग्रजांचे शिपाई कोण असतात ते ! ही हया काफराने बायकांप्रमाणे राखलेली वेणी पहा ! हा दुसरा शिपायी! ही पहा शेंडी ! हा तिसरा काफर पाहा ! ही पहा शेंडी !” पण त्याचे शीर कापून शेंडीने धरू पहातो तो ती त्या डोक्यास मुळीच दिसेना. कारण तो तिसरा शिपायी मुसलमान होता. मौलवी दडपून तरीही म्हणाला, “हाही हिंदूच ! हे हिंदू लोक इंग्रजांसारखेच आमचे शत्रू आहेत. हे इंग्रजांचे आहेत. हे इंग्रजांनी सांगितल्याबरोबर मोपल्यांस गोळ्या घालतात. कुणीही मुसलमान इंग्रजांच्या देवाने सांगितले तरी मुसलमानांच्या विरुद्ध लढेल काय ?” सभेतून एकच कल्लोळ

उठला, “कधी नाही ! मुसलमान तितका एक आहे ! मुसलमान मुसलमानाविरुद्ध कधी लढला नाही, लढत नाही, लढणार नाही.”

सभेतील हया कल्लोळास उत्तेजवीत मौलवी म्हणाला, “कधी नाही ! खलिफा जर्मनीच्या बाजूस असल्यामुळे सगळा मुसलमान इंग्रजांवर उठला आहे. इंग्रजांस एकही मुसलमान शिपायी तुर्कांविरुद्ध लढण्यास मिळेना.”

“एकही मिळेना.” सभा गर्जली.

“इंग्रजांनी ज्या हजारो पठाण-हिंदुस्थानी मुसलमानांस लढाईवर पाठविले त्या सर्वांनी लढणे नाकारले !”

“सर्वांनी.” सभा गर्जली.

“जे मुसलमान तुर्कांविरुद्ध लढत राहिले त्यातील सर्व वेळ सापडताच तुर्कांकडे पळून गेले.”

“सर्व पळून गेले.” सभा गर्जली.

“शेवटी इंग्रजांच्या शिबिरात एकही मुसलमान औषधालासुद्धा उरला नाही ! अखेर इंग्रजांचा पराजय झाला. खलिफा इंग्लंडवर चालून गेला !”

“लंडनवर.” सभा गर्जली.

वाटेत जर्मन तुर्कांचा दोस्त होता; पण तो ख्रिस्ती होता. त्यास अनवरपाशा म्हणाला, “आजवर तुझे साहाय्य केले- पण आता तू मुसलमान होशील तर दोस्ती. नाही तर अर्ध्या मिनिटात बर्लिन नगर धुळीस मिळवून देईन.” तेव्हा कैसर म्हणाला, “तू म्हणतोस ती गोष्ट खरी आहे. परमेश्वरानेच आज्ञा दिली आहे की, मुसलमान सर्व अमुसलमानांवर बलवत्तर होतील ! सुरतुल-मुजादिक हया अध्यायात कुराणाने हे सांगितले आहे. तेव्हा तू बर्लिनचा नाश करू नकोस, मी मुसलमान होतो.” असे म्हणून कैसर मुसलमान झाला.

“कैसर मुसलमान झाला!” सभा गर्जली

“आणि कैसरचे उदाहरण पाहून अमेरिकेचा झारही मुसलमान झाला !”

“अमेरिकेचा झार मुसलमान झाला !” सभा गर्जली.

“आणि अमेरिकेचा झार नि कैसर हयास उजव्या नि डाव्या हाताशी घेऊन अनवरपाशा फ्रान्सच्या मशिदीत नमाज पडला.”

“अनवरपाशा नमाज पडला ! अनवरपाशा मोठा धार्मिक मुसलमान आहे. तो दारू रोज पीत असला तरी चिंता नाही.” सभा गर्जली.

“तेव्हा आता टोपीवाला तितका मुसलमान झाला. आता हया जगतावर केवळ हा इंग्रज नि हा इंग्रजांचे अन्न खाऊन त्यांच्या सैन्यात आम्हाशी लढणारा हिंदू तेवढा काफीरपणा सोडीत नाही.”

“त्यांनी काफीरपणा सोडला पाहिजे. अमेरिकेच्या झारपेक्षा काही ते मोठे नाही. दात पाडून टाकू !” सभा गर्जली.

“म्हणून आता मलबारमधून इंग्रजांचे राज्य उलटून पाडणाऱ्या वीरांनो ! हे कार्य हाती घ्या.”

हया वाक्यासरशी “अल्ला हो अकबर ! पकडो हिंदूको ! मारो हिंदूको ! मुसलमान बनाओ काफरको!” असा एकच तुमुल शब्द उठला. त्याच वेळेस कासम, अली मुसेलियरास म्हणाला, “हुजूर ! ते पहा ते काफर धरून आणले जात आहेत!” अली मुसेलियर उतावळेपणाने म्हणाला, “इकडे आणा त्यांना.” लगेच सहा सशस्त्र मोपल्यांच्या पहाऱ्यात चार हिंदू गृहस्थ अली मुसेलियरच्या समोर आणून उभे करण्यात आले. ते कोण होते ?

पहिला गृहस्थ महानंदी होता. दुसरा माधव नायर. तिसरा राम चेट्टी नि चवथा नंदी दत्त. कालिकतच्या खिलाफत सभेत ठरल्याप्रमाणे हे चारही हिंदू पुढारी खिलफतीच्या चळवळीसाठी हिंदूंपासून वर्गणी जमविण्यासाठी अरनाड तालुक्यात हिडत होते; तोच तिरुरंगाडी येथे दंग्यास सुरुवात होऊन अली मुसेलियर हयास धरण्यासाठी शिपायांची एक तुकडी सरकारकडून धाडण्यात आली. परंतु मोपले लोक एकाएकी तलवारी घेऊन त्या शिपायांवर तुटून पडल्याने त्यातील काही मारले गेले नि काही परत फिरले, ही बातमी विजेसारखी पसरून जेथे तेथे मोपले लोक बंड करून उठले. एका आठवड्याच्या आत अरनाड तालुका खरोखरच मोपल्यांच्या अधिकारात आला. त्या तालुक्यात कोणीही इंग्रजी अधिकारी उरला नाही. कोणतीही तार वा सरकारी ठाणे राहिले नाही. अली मुसेलियर हयाने स्वतःस मोपल्यांचा मुख्य सरदार समजून बंडाचे स्वरूप हयापुढे कसे असावे नि बंडास शस्त्रे नि पैसे हयांचा पुरवठा कसा करावा म्हणून सभा भरविली होती. हिंदू लोक जे पैसे देणार होते ते अजून का आले नाहीत हयाचे उत्तर विचारण्यासाठी त्याने हया खिलाफतीच्या चळवळीसाठी वर्गणी जमविणाऱ्या चारही हिंदू पुढाऱ्यांस बंदिवान करून समोर आणले होते. तेथे ते येताच अली चवताळून महानंदीस म्हणाला, “क्यो बे ! तुमच्या हिंदू लोकांनी खिलाफतीसाठी किती पैसे अजूनपर्यंत दिले ? हे पहा मोपल्यांच्या हया धर्मयुद्धात सर्व खर्च तुम्हां हिंदूंना द्यावा लागेल, समजलात !”

थरथर कापत महानंदी गुपचीप उभा राहिला. पण माधव नायर म्हणाला, “खानसाहेब !” तोच त्यास एक जोराचा बुक्का डोक्यावर मारून पहारेकरी म्हणाला, “काफर ! सरकार म्हणा.” तेव्हा माधव नायर म्हणाला, “सरकार ! मी प्रथमतः तुमचे हया विजयाविषयी मनापासून अभिनंदन करितो. हिंदुस्थानात एका वर्षात स्वराज्य ! म्हणून हजारो तावड्कांनी प्रतिज्ञा केल्या, सभा भरविल्या, मेलेल्या निर्जीव कपड्यास जाळले. पण उभ्या हिंदुस्थानात एका वर्षात जर कोणी स्वराज्य खरोखरीच प्रस्थापित केले असेल तर ते मोपल्यांनीच होय. आज हया दोन-तीन तालुक्यात खरोखरच इंग्रजी सत्ता नष्ट झालेली आहे. आता हे मिळविलेले स्वराज्य हिंदू-मुसलमानांच्या एकीच्या विस्तृत नि दृढ पायावर सबळपणे कसे स्थापिता येईल हा प्रश्न आपण प्रथम सोडविला पाहिजे.”

“तो प्रश्न सोडविण्याची काळजी तुला नको आहे.” मौलवी मध्येच म्हणाला. “छे ! छे ! असे कसे म्हणता ? आपल्या हिंदू बांधवांस अनुकूल करून घेतल्याविना आपणास यश येणार नाही. स्वराज्यात हिंदूंचा भाग आहेच आहे. खिलाफत चळवळीस हिंदूंनी साहाय्य दिले, हा त्यांचा

खरोखरच उदारपणा होय. ते जरी काफर आहेत तरी त्यांच्याशी आपण शेजारी मुसलमानांनी न्यायाने वागलेच पाहिजे. स्वतः पैगंबरांनी मूर्तिपूजकांशी स्नेहाचा केलेला करार पाळला नव्हता का?' असे गंभीरपणे विचारीत त्या सभेतून एक सुशिक्षित दिसणारा मुसलमान पुढे म्हणाला, "आणि अहो मुसलमान हो ! हिंदूंवर सक्ती करून त्यांचे वैर तुम्ही संपादन कराल तर तुम्हांस इंग्रजांवर जय कधीही मिळविता येणार नाही हे ध्यानात धरा. मोपले आहेत किती ? मूठभर !"

तो त्या सुशिक्षित मुसलमानावर खवळून मौलवी म्हणाला, "पण ही पहा माझ्यापाशी असलेली पत्रे ! अफगाणिस्थानचा अमीर साठ हजार सैन्य घेऊन पेशावरला कालच पोहोचला आहे. आज उद्या तो लाहोरास येईल."

"अल्ला हो अकबर ! अमिराने दिल्ली घेतली!" सभेतून ती बातमी फुगत नि फैलावत जयघोष सुरू झाला.

मौलवी पुढे म्हणाला, "पैगंबराविषयी म्हणशील तर मी तुला विचारतो की सुरतू तौबा हया अध्यायाच्या ७३व्या अयनामध्ये काय सांगितले आहे ? त्यात असे परमेश्वरी वचन नाही काय की, 'हे मुसलमानांनो तुम्ही नास्तिकांशी, मूर्तिपूजकांशी नि दांभिकांशी जिहाद करा नि त्यावर सक्ती करा. कारण ते सक्तीस पात्र आहेत !' दांभिकांपैकीच तू आहेस म्हणून तू असे म्हणतोस. तू मुसलमानच नाहीस; अहो हयाला दाढी देखील नाही !"

"हयाला दाढी देखील नाही ! हा मुसलमानच नाही ! हा हिंदू आहे ! धरा त्याला ! मारा त्याला ! आणि त्या हिंदूंना !" असे अतिशय उत्क्षोभक उद्गार काढीत सभेतील लोक पुढे घुसू लागले.

माधव नायर पुन्हा एकदा साहस करून म्हणाला, "स्वराज्य नि हिंदू-मुसलमानांची एकी हयाविषयी आपण सर्व अनेक वेळा शपथबद्ध झालेलो असताना नि हिंदूंनी संपूर्णपणे मुसलमानांवर विश्वास टाकून वर्गणी जमिविणे चालविले असताना देखील हिंदूंवरच हया बंडातील अनेक पुढारी अत्याचार करण्याचे कट उभारीत आहेत- बंडापूर्वीपासून हिंदूंस मुसलमान करावे म्हणून गुप्त योजना होत आहेत ! हे सर्व माहीत असताना हिंदू लोक या बंडास साहाय्य देण्यास कचरतात हयात आश्चर्य नाही. तथापि आम्ही दहा हजार रुपये खिलाफतीकरता दिले आहेत नि आणखीही जमवितो, पण स्वराज्य नि हिंदू-मुसलमानांची एकी-"

"बस्स कर ! काफर !" अली मुसेलियर उताविळपणे म्हणाला. "ह्या हिंदूंचे हे 'पण' नि 'परंतु' आमरण संपावयाचे नाही. ही व्याख्यानाची सभा नव्हे. इथे मरण-मारणाचा बाजार आहे. एका शब्दात निकाल. एका घावात आज्ञा बजावणी !" नि तो सर्व सभेस एकदा न्याहाळून ओरडला, "ऐका ! सर्व मुसलमानहो, एका शब्दात बंडाचे स्वरूप कसे असावे ते ऐका ! हे हिंदू लोक स्वराज्य नि एकी म्हणून ओरडत आहेत. मी सर्व जगास सांगतो की, 'स्वराज्य म्हणजे खिलाफत राज्य नि हिंदू-मुसलमानांची एकी म्हणजे सर्व हिंदूंनी मुसलमान होऊन जाणे !' बस्स. वादविवादाचा एक शब्द हयावर कोणी काढील तर मान उडविली जाईल."

"स्वराज्य म्हणजे खिलाफत राज्य ! एकी म्हणजे सर्वांची एक मुसलमान जात करणे ! - अली मुसेलियर की जय !- अली मुसेलियर गाजी आहे !" सभेत सर्व दिशांनी ध्वनी कल्लोळ सुरू झाले.

"हं चल," अली मुसेलियर पुढे म्हणाला, "ए महानंदी, बोल, तू एकीसाठी मुसलमान होतोस की नाही !"

थरथर कापत महानंदी म्हणाला, "सर्व धर्म सारखेच आहेत. मुख्य धर्म म्हणजे अहिंसा-"

रक्ताने माखलेली तलवार झटकन उपसून अली मुसेलियर म्हणाला, "ही पहा अहिंसा! व्याख्यान नको. बोल मुसलमान होतोस की नाही !"

महानंदी म्हणाला, "होतो-मारू नका ! मी मुसलमान आहेच ! मुसलमान होत नाही म्हणून तुमच्या मनास दुःख देणे हे अहिंसा तत्त्वाच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणून मी मुसलमान होतो."

"हं चल; तू माधव नायर ! होतोस की नाही मुसलमान ?"

सर्व शक्ती एकवटून माधव नायर म्हणाला, "होत नाही जा !"

"मारो ! मारो !" एकदम कल्लोळ झाला. जो तो मोपला पहिल्या काफरास मारण्याचा पहिला मान आपणास मिळावा म्हणून तलवार घेऊन नायरवर तुटून पडला. वीस-पंचवीस तलवारी एकदम अंगावर पडून माधव नायरचे तुकडे तुकडे होऊन खाली पडले. रक्ताच्या चिळकांड्यांनी हत्या करणाऱ्यांचे देह ओले झाले.

अली मुसेलियर म्हणाला, "हे अल्ला ! तू दिलेल्या विजयासाठी काफराच्या रक्ताचे हे पहिले बलिदान मानून घे !"

"पहिले नाही ! पहिले नाही !" म्हणून ओरडत एक दहा मोपल्यांची टोळी इतक्यात येथे आली नि म्हणाली, "आम्ही मलापूरचे लोक. आम्ही आमच्या गावच्या सर्व हिंदूंस बाटवून टाकले नि जे बाटले नाहीत त्यांना मारून टाकले. तुम्ही बंड पुकारण्याच्या आधीच आम्ही गुप्त कट करून ठेविला होता."

"अल्ला हो अकबर! मलापूरचे गावच्या गाव मुसलमान झाले." सभा गर्जली; "आणि मलापुरीसही काफरांचे बीज म्हणून उरले नाही!" आणि "वेंगरा ऐमशमध्ये !" आणि "कन्ना ऐमशमध्ये-" एकामागून एक टोळ्या तेथे येत आपापल्या पराक्रमाची घोषणा करीत होत्या नि सभा त्यांचे प्रतिध्वनी घुमवीत होती.

"बस्स !" मौलवी म्हणाला, "बस्स ! आता राजसभा विसर्जन होत आहे. बाकी बातम्या नि कामे उद्या विचारात घेण्यात येतील. तोवर हे इमानदार हो ! जा-दशदिशेस जा ! गाव गाव मोजून जितका हिंदू सापडेल तितका मुसलमान करा. न होईल त्यास आमच्याकडे घेऊन या. न आल्यास तुम्हीच त्यास तेथेच ठार मारून टाका ! आजपासून हया आपल्या मलबारच्या खिलाफती राज्यात अन्यायाचे वा अधर्माचे कृत्य कोणीही करू नये अशी मी सक्त आज्ञा सोडतो. मूर्तिपूजा, कुराणास न मानणे, मोपल्यांनी जे हे धर्मयुद्ध पुकारले आहे त्यास आपले सर्वस्व न देणे ही तीन

महापापे जे जे करतील त्या सर्वांस हया लोकी, हया क्षणी वध नि परलोकी नरकाग्नी हा दंड ठेवलेला आहे. मलबारमध्ये मुसलमानी राज्य स्थापित झालेले आहे. हया राज्यात केवळ पापभीरू लोकच वसू शकतील ! तर जा, काफरांस धरधरून मुसलमान करा. नाही तर मारा. त्यांची संपत्ती तुमची आहे. त्यांच्या स्त्रिया तुमच्या आहेत. स्वेच्छेने देतील तर घ्या, नाही तर लुटा, बलात्काराने न्या."

"मारा ! लुटा ! बलात्कारा ! हया राज्यात केवळ पुण्यवान नि पापभीरू लोकच राहातात !" सभा सहस्त्र कंठाने गर्जली.

ही वेळ संध्याकाळची होती. कुणी चुडे तर कुणी मशाली पेटविल्या. कुणी पूर्वेस तर कुणी पश्चिमेस धावत सुटले. सैतान अंगात आल्याप्रमाणे हे हजारो मोपले दशदिशांस हिंदूंची मृगया करीत धावत सुटले. "जा ! दशदिशांस जा !" मौलवी ओरडतच होता.

हेच ते शब्द ! एका काली ह्या भारतभूतीत बोधी वृक्षाच्या शीतल छायेखाली वृद्धत्व प्राप्त झालेल्या गौतमाने अखिल जगाच्या भूतमात्राच्या दयेने द्रवून जाऊन हेच शब्द उच्चारले होते की, "भिक्षूंनो ! जा दशदिशांस जा नि अमृतत्त्वाचा हा शीतल संदेश देऊन भयतप्त जिवांस शांती द्या!"

तेच हे शब्द हा मौलवी आपल्या मुसलमानांस सांगत आहे.

पण त्या 'भिक्षूं'चे ते जाणे कोठे नि ह्या 'इमानदारां'चे हे जाणे कोठे !!

## ५. ब्राह्मणवनाची जाळपोळ बलात्कार नि लूटमार !

आता रात्री सरासरी बारा वाजले असतील नसतील. कुट्टम गावच्या नारळीपोफळीच्या सुंदर वनात सर्वत्र शांतता नांदत होती. त्या शांततेच्या पाळण्यात एखादे अल्लड मूल निजावे तशी सुमती गाढ झोपी गेली होती. तिच्या केसांची एखादी बट केव्हा केव्हा वाऱ्याच्या झुळुकेने कपाळावर खेळत राही. केव्हा केव्हा थांबून श्वास सोडताना तिचा पदर तिच्या तारुण्यमतंगजाच्या गंडस्थलाप्रमाणे शोभणाऱ्या त्या वक्षस्थलावर थोडासा हालत होता. नुकत्याच उदय पावलेल्या चंद्राचा एक चटोर किरण बकुल वृक्षाच्या सावलीतून चोरून तिच्या त्या मिटलेल्या कमलाच्या फुलाप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या निद्रित मुखास पहात होता.

श्रीरंगाच्या देवळातही सर्वत्र सामसूम होती. एक समई काय ती तेवत होती. बारा वाजले म्हणून अर्ध्या झोपेतच झोकांड्या देत पहारेकऱ्याने देवळातील तासाचे घड्याळ वाजविले नि तो पुन्हा निजला.

आणखी एक अर्धा तास लोटला असेल नसेल तोच त्या देवळाच्या पायऱ्यांपासून सुमारे शंभर फुटांवर एक तरुण मनुष्य येऊन तिथल्या एका विस्तीर्ण वडाच्या खाली निजलेल्या मंडळीपैकी एकास हलवून म्हणाला, "कम्बू ! ते आले. उठा!" ताडकन् उठून पण लगेच सावरून कम्बू म्हणाला, "कुठवर आले ? किती आहेत ? हत्यारे कोणती आहेत, दामू?"

"शंभर तरी लोक असावेत. हत्यारे दिसू शकली नाहीत. ते नीट ब्राह्मणवनाकडे जात आहेत." "चला तर ! श्रीरंग आम्हा हिंदूंचे रक्षण करो !" असे म्हणून कम्बूने त्याचे वीस-एक साथीदार जे तेथे निजले होते त्यांस उठवले नि ते आपल्या काठ्या, भाले, तलवारी परजून ब्राह्मणवनाकडे चालले. ब्राह्मणवनापाशी येतात तो तीन-चार ब्राह्मण युवकांसह हरिहरशास्त्री ठरलेल्या वृक्षाखाली बसलेले त्यास आढळले. त्यास पहाताच खिन्न झाल्यासारखा होऊन कम्बू म्हणाला. "हे काय शास्त्रीबोवा ! तीन-चारच लोक कसे?" शास्त्रीबोवा म्हणाले, "कम्बू, अधिक आणू कोठून ? प्रथमतः माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवून, मोपल्यांचे बंड होणार आहे, हे कोणा ब्राह्मणास वा नायरास खरेच वाटेना. त्यातूनही बहुतेक म्हणाले की, 'आमच्या घरी कोण येतो ! देवळावर आले तर श्रीरंग म्लेंच्छांचा समाचार घेण्यास समर्थ आहे ! देवाचे रक्षण आम्हा मानवांनी ते काय करावे ?' अशा लोकांची समजूत घालण्यात कालक्षेप न करिता मी जे चार-पाच स्वयंसेवक मिळाले ते घेऊन आलो आहे." "ठीक आहे," निराशा दाबून कम्बू म्हणाला ! "जे आहोत, ते आहोत. ते शत्रू चालून आले. त्यांचा मुख्य डाव आपल्या कन्येवर आहे. मौलवीने तिला स्वतःच्या उपयोगासाठी निश्चित केली आहे. असे अधीर होऊ नका. माझ्या जिवात जीव आहे तोवर तिचे रक्षण मी करीन."

"आणि मी"- दामोदर- तो तरुण थिय्या म्हणाला. तो त्या बनाच्या त्याच बाजूने ती मोपल्यांची टोळी दबत दबत जवळच आली. तीस थोडा वेळ थांबवून मौलवीने बजाविले- "मुसलमानहो ! आज तीन दिवसपर्यंत जवळ जवळ दहा गावे आपण निर्वीर केली असतील; जिथे

जिथे गेलो तिथे तिथे ‘अल्ला हो अकबर !’ हया आरोळीसरशी काफरांची गाळण उडवून दिली; कारण ते सर्व असंघटित होते. ईश्वराने तुम्हांस तुमची सर्व पापे क्षमा केली आहेत. कारण तुम्ही महान पुण्यकर्मे गेल्या तीन दिवसांत आचरलीत; कमीतकमी सहाशे घरांस आग लावून दिलीत; शेकडो काफर मुसलमान केलेत, दगडांच्या मूर्तीस पालथ्या घालून त्यावर लघुशंका केल्यात-थुंकलेत. ईश्वराने तुम्हांस हया हातीचे त्या हातीच पारितोषिकही दिले. स्वर्गात काळ्याभोर नेत्रांच्या अप्सरा मिळतील-कुराण शरीफ असे सांगते- त्या निराळ्याच ! पण ह्या लोकी आज तीन दिवस आमची भोगावयाची शक्ति थोडी पडावी इतक्या सुंदर, काळ्या नेत्रांच्या स्त्रिया आम्हास उपभोगावयास भोगावयास मिळाल्या. धन तर पाठीवर नेववत नाही इतके प्रत्येक धर्मयोद्ध्याच्या वाट्यास आले. पण आता त्या सर्व सुखासाठी ईश्वराशी आम्ही खरोखरच कृतज्ञ आहोत की नाही, हे पाहाण्याची खऱ्या परीक्षेची वेळ आली आहे. हया गावात त्या मागच्या सर्व गावांहून तुम्हांस जास्त झुंजावे लागेल. कारण सैतान स्वतः येथील एका कम्बू थिय्या नावाच्या मनुष्याच्या अंगात शिरला आहे. मी स्वतः सैतानास त्याच्या अंगात शिरताना पाहिले. हे अल्ला ! तू मी म्हणतो हे जाणतोस ! अल्ला समर्थ आहे ! म्हणून हया गावी आपण गुपचिप छापा घालूनच कार्य केले पाहिजे. हे धर्मवीरहो ! ध्यानात धरा की, हया ब्राह्मणांच्या बनात प्रत्येक घरी उभ्या मलबारमध्ये नसतील अशा सुंदर मुली, दहा-दहा पाच-पाच भरलेल्या आहेत. त्यातही मी येथे मोपल्यांची जी चार घरे आहेत त्यासही आपल्याकडे वळवून घेतले आहे. ते बहुतेक येथेच कोठे तरी येऊन मिळतील. कम्बूच्या टोळीस फसविण्याची मी अशी युक्ती केली आहे की, आपण ब्राह्मणवनात आलो नि जर आपल्याला काही अडथळा झाला तर त्वरित तिकडे थिय्यांच्या महारवाड्यास आग लावावी म्हणजे कम्बूचे साथीदार अर्थातच तिकडे आपल्या घरांच्या रक्षणाकरिता जातील नि हे ब्राह्मण नि नायर एकटे सापडतील.”

“पण हया गावी जर इतका विरोध होण्याचा संभव असेल तर पुढील गावी जाऊ या. सहज, न मरता धर्माचा प्रसार नि धन नि यश मिळते ते सोडून पेचात आपण होऊन हात घाला का ?” दोन-चार धर्मवीर जरा कचरून म्हणाले.

“पण हया गावातील ब्राह्मणांच्या नि नायरांच्या स्त्रियांसारख्या सुंदर स्त्रिया इतर गावी मिळणार आहेत का ? मुसलमानांनी धर्मासाठी संकटे सोसलीच पाहिजेत.” मौलवी रागावून म्हणाला.

तो हे बोलत आहे इतक्यात त्या मुसलमानी टोळीवर कम्बू थिय्यांच्या टोळीचा निकराचा हल्ला पडला. एकदम मोठी ओरड झाली. कम्बूस बातमी मिळाली होती त्यापेक्षा मोपल्यांची संख्या किती तरी मोठी होती. ते निदान दोनशेपर्यंत असावेत. पण कम्बूने पहिल्या धडाडीसरसा त्यास इतका धाक बसविला की, मौलवींच्या मंडळीत पळापळ होऊन तो मागे हटला. परंतु पूर्वसंकेताप्रमाणे मौलवीच्या लोकांनी महारवाड्यास त्याच वेळेस आग लावून दिली. तेव्हा तो भयंकर डोंब नि त्या बिचाऱ्या निद्रिस्त महारांच्या घरातील मंडळीची एकाएकी झालेली बोंब ऐकून

थिय्यांची काही मंडळी आपापल्या घरांचे रक्षण करण्यासाठी कम्बूचे न ऐकता धावून गेली. मौलवीने त्याच वेळेस एकएकी, आपला ब्राह्मणांच्या घरांवर रोख नसून श्रीरंगाच्या मंदिरावर आहे असे भासविले नि मुसलमानांची मोठी टोळी त्या देवळावर तुटून पडली. हे पाहाताच आपल्या घरादाराच्या रक्षणापेक्षा आपल्या देवळाचे रक्षण करणे हेच श्रेयस्कर आहे असे कंठरवाने सांगितले असताही जे थिय्या लोक त्यास सोडून गेले त्यांची पर्वा न करिता कम्बू आपल्या जवळ असलेल्या दहापंधरा लोकांनिशी श्रीरंगाच्या दारात जाऊन उभा राहिला. पण त्याच्या बरोबर तो त्याचा विश्वासू तरुण-दामोदर हा मात्र नव्हता. त्यास त्याने त्या निष्पाप नि अव्याज मनोहर कुमारिकेच्या रक्षणास धाडून दिले होते.

हा हा म्हणता कुट्टम गावात एकदम प्रलय झाला. त्या गावात राहाणाऱ्या त्या चार-पाच मोपल्यांच्या घरांतून छपवून ठेवलेली शस्त्रास्त्रे तेथील मोपला स्त्रिया मुसलमानास वाटताना दिसत होत्या. एक म्हातारी मोपला बाई हातात जळती चूड नि रॉकेलचा डबा घेऊन हिंदूंच्या घरांस आग लावीत धावत होती. हिंदू लोकांतून कोणी भाजले गेले, कोणी मारले गेले; कम्बू मात्र आपल्या थोड्या लोकांनिशी श्रीरंगाच्या द्वारात झुंजत होता. जिकडे तिकडे आग, आरोळ्या नि असावधपणात संकट गुदरले असता जी जनतेची भयंकर स्थिती होते ती झालेली दिसत होती. मुसलमानांनी आता देवळावर निकराचा हल्ला चढविला, पण त्यात मौलवी दिसत नव्हता.

कारण तो निवडक माणसे बरोबर घेऊन त्या श्रीरंगाच्या मूर्तीहूनही त्याच्या नेत्रांस अत्यंत रमणीय दिसणारी नि हृदयास लुब्ध करणारी ती दुसरी देवमूर्ती भग्न करण्यासाठी तिकडे त्या ब्राह्मणागारात-त्या कुमारिकेच्या शय्यागृहाकडे चालला होता.

त्याच्या आधीच दामोदर थिय्या ब्राह्मणवनात आलेला होता. त्या वनाच्या जवळ जी हिंदू-मुसलमानांची पहिली चकमक झाली नि जीत मुसलमानांना माघार घ्यावी लागली, तिच्या गलबल्याने ब्राह्मणबनातील कित्येक लोक दचकून उठलेले होते. त्या सर्वांस एकत्र करून नि मुसलमानांची ती पिछेहाट झाल्याने ते इतरत्र गेले असता, जो वेळ मिळाला त्या वेळाचा लाभ घेऊन त्या बनाच्या संरक्षणाचा काही संघटित प्रयत्न करावा म्हणून हरिहरशास्त्री नि दामू त्यांस घाईघाईने उत्तेजन देऊ लागले. रामशास्त्री, चिंतामणी नि इतर ब्राह्मण आपल्या घरातून मिळाली ती हत्यारे घेऊन बाहेर पडले. त्यांना बहुतेकांना आपण कम्बूने सांगितले तेव्हाच सावध झालो नाही हयाविषयी फार वाईट वाटले.

पण स्थूलेश्वरशास्त्री मात्र अजून शंकित होते - नव्हे त्यांस एक भयंकर संशयही आला. हा कम्बू - हा थिय्या -कोण जाणे हाच हया मुसलमानांस मिळालेला नसेल कशावरून ! त्यांनी तसे बोलून दाखविले, तेव्हा बहुतेकजण चिडून म्हणाले, “असेल असे गृहीत धरा. हे मोपले लोक छापा घालीत आहेत ! ही तुमची देवळे -हया तुमच्या स्त्रिया - हा तुमचा धर्म - कोणाकडूनही असो - ती भ्रष्ट होताहेत, त्यांचे संरक्षण करा, बस्स !”

"संरक्षण !" चिडून स्थूलेश्वरशास्त्री म्हणाले, "महारांना, ब्राह्मणांच्या गल्लीत आणले, त्यांची छाया तुम्ही घेतलीत, त्यांच्या खांद्याशी खांदा लावलात ! आता तुमचा धर्म राहिला कोठे, तर त्याचे मी रक्षण करू ? पण हे कोण ? अरे हे त्या महाराचे पोर ? दाम्या ! तू येथे माझ्या अंगणात ? ठार झाला धर्म ! हयाच्यापेक्षा मुसलमान आले असते तर अधिकच भ्रष्टाकार तो कोणता होता?"

"शांत व्हा ! स्थूलेश्वर!" चिंतामणी म्हणाले. "स्मृतीमध्ये आपत्प्रसंगी स्पृष्टास्पृष्टी मानू नये म्हणून लिहिले आहे. पुन्हा हा शूर थिय्या तरुण केवळ हिंदुत्वाच्या अभिमानाने येथे लढत आहे."

"पण ते आपत्प्रसंग पुराणही राहू द्या !" हरिहरशास्त्री रागाने म्हणाले. तो हिंदू आहे नि म्हणून तो माझ्या घरात आला पाहिजे. तो धर्मवीरासारखा मघा लढला; म्हणूनच मी त्याच्या चरणी वंदन करतो. त्याचे येणे आणि मुसलमानांचे ब्राह्मणबनात येणे सारखेच भ्रष्टाकारी आहे काय ? हाय हाय, थोड्याच वेळात ते सिद्ध होईल ! तो थिय्या, महार वा मांग येथे हातात तलवार धरून हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आला आहे. तो तुमच्या अंगणात उभा आहे, तरीही देव देव्हाऱ्यात आहेत. अग्नी अग्निकुंडात आहे, जानवी गळ्यात आहेत, जीव देहात आहेत. थोडे थांबा. संघटनाशिवाय असेच थांबा-आणि ते आलेच मुसलमान बघा. मग देव, अग्नी, यज्ञोपवीत, तुमच्या स्त्रिया नि तुमच्या वेदांच्या पोथ्या हयांचे काय होते ते, आणि घ्या आपली महार नि मुसलमान एकच की दोन ही शंका निवारून !"

रागारागाने हरिहरशास्त्री असे म्हणतात तोच मौलवीची टोळी वनापाशी येऊन थडकली. आता त्यास मोपल्यांच्या घरांत पूर्वीच लपवून ठेविलेल्या काही बंदुका नि दोन पिस्तुले मिळाली होती. नि कम्बूच्या टोळीची, काही देवळाच्या रक्षणार्थ नि काही महारवाड्याकडे मंडळी गेल्याने फाटाफूट झाली होती. मौलवी ब्राह्मणबनापाशी येताच उघडपणे, "मारो काफरको," म्हणून भयंकर गर्जना करून उठला. ती त्याच्या मागोमाग धावत आलेली म्हातारी-तिने आपली चूड पेटविली नि ब्राह्मणबनाच्या बाजूस असलेली दोन-तीन नायरांची घरे नि गंजी तिने पेटवून दिल्या. एक ढोलही भयाण ध्वनी काढीत भेसूरपणे वाजू लागला. "मारो काफरको !"

सुमतीस हरिहरशास्त्री यांनी कम्बूच्या बातमीची फारशी चाहूल लागू दिली नव्हती. ती रोजच्याप्रमाणेच आपण मघा पाहिली तशीच गाढ झोपेत निजलेली होती. तो चंद्रकिरण तिच्या वदनास निर्भयपणे पाहाता आले म्हणून धिटावून खाली सरकून आता तिच्या शंखासारख्या सुरेख कंठात कंठ्याप्रमाणे शोभू लागला. त्याचे हे धाडस वाढून तो चंद्रहारासारखे मनोहर दिसावे म्हणून, तिच्या वक्षस्थलावरही उतरेल की काय हया भयाने मधून-मधून वाऱ्याच्या झुळकेच्या विमानात बसून तिचा तो किंचित हलणारा पदर, त्या चंद्रकिरणावर चाल करून जात होता. सुमती गाढ झोपेत तशीच होती, तोवर त्या ब्राह्मणबनाच्या दूरच्या टोकास पहिली चकमक उडाली नव्हती. त्या चकमकीतील दूरच्या कोलाहलाने तिची निद्रा किंचित ढळली. स्वप्नात तिला वाटले की, संस्कृत श्लोकांच्या भेंड्या लावता लावता कालिदासाचा श्लोक म्हणून तिच्या भावाने पुन्हा

उपनिषदातला एक श्लोक म्हटला. तो उलटा तिच्याशी भांडू लागला. ती पुन्हा किंचित निजली. काही वेळाने पुन्हा मोठा गलबला होऊन ती चांगली दचकून उठली. डोळे उघडते तो समोर तो थिय्या तरुण उभा; क्षणभर तिला वाटले की, मी स्वप्नात आहे; नि त्या दिवशी बागेत फुले तोडीत होते त्या वेळेचे स्वप्नच अजून पाहात आहे; परंतु क्षणात तिला त्या दृश्याची भयंकर वास्तविकता कळली. तिचा पिता अत्यंत अस्वस्थ मुद्रेने म्हणाला, “बाळ सुमती, जागी हो; घाबरू नकोस. हे पाहा आपल्या ह्या ब्राह्मणबनावर क्रूर लुटारूंची मोठी धाड आलेली आहे.” हे अर्धवट वाक्य ऐकताच तिचे वदन एकदम खिन्न झाले. तिला शंका आली की, हा लुटारू त्या टोळीतीलच आहे. ती त्या तरुण थिय्याकडे दयार्ह दोष्याकडे पहावे तशी पाहू लागली. तिचा पिता पुढे म्हणाला, “अशा स्थितीत तुझे रक्षण करण्याचा एकच उपाय मला हा दिसतो की, तू आताच्या आता येथून निघून कोणत्या तरी मार्गाने तुझ्या मामाच्या गावी निघून जावे. तुझ्या रक्षणासाठी तुझा भाऊ नि हा माझ्या विश्वासाचा तरुण थिय्या दामोदर येत आहे.” हे ऐकताच तशा संकटमय स्थितीतही तिच्या वदनावर एक समाधानाची लकेर दिसून गेली. कारण अशा सुरेख आकृतीच्या हातून दुष्ट कृत्ये घडणार नाहीत, हा स्वभावसहज असणारा वेडा तर्क, तरुण दामोदर चोर नसून तिचा रक्षक होण्याइतका विश्वासू आहे हे कळल्याने पुन्हा एकदा खरा ठरला. एकाएकी ऐकलेला तो भयंकर वृत्तांत तिच्या चांगला ध्यानात उतरण्याच्या आधीच तिचा बाप म्हणाला,

“हं ऊठ बाळे, ऊठ ! वेडी ती पोर ! तिला अजून कळले नाही काय ते.”

तो तिकडे ढोलाचे, आगीचे, हाणामारीचे कोलाहल अधिकच जवळ अगदी जवळ ऐकू येऊ लागले. घाईघाईने सुमतीस शत्रूंनी ओढावी तशी ओढून तिच्या बापाने, भावाने नि त्या थिय्या तरुणाने मागच्या दाराने एक पुरुषाचा पायघोळ अंगरखा नि टोपी तिच्या अंगावर घालून रानात पळवीत नेली. हरिहरशास्त्री पुढील दाराशी येतात तो मौलवीचे लोक दहा फुटांवर येऊन ठेपलेले होते. शास्त्री यांचे घर पहाताच मौलवी ओरडला, “यही, यही वे काफर है. पकडो, मारो मत. पकडो.”

मोपले बंदुकांचे बार काढीत शास्त्री हयांच्या घरावर चालून आले. बंदुकांचे बार ऐकताच आजूबाजूच्या घरातील निःशस्त्र असल्याने घायाळ झालेली माणसे घरात जाऊन छपू लागली.

हरिहरशास्त्री यांनीही दारे बंद करून आतून विचारिले, “मौलवी, तुम्हांस काय पाहिजे आहे ? आम्हा निरपराध ब्राह्मणांच्या घरावर आपण चालून का आलात ? मोपले इंग्रजांच्या विरुद्ध बंड करून उठले असता ते नाहक आम्हांवरच का शस्त्रे उगारतात ?”

मौलवी म्हणाला, “तू जर तुझ्यापाशी असलेले सर्व द्रव्य आम्हांस देशील, नि तुझ्या घरातील सर्व मंडळींसह मुसलमान होशील तर आम्ही तुला आपलेच समजू. इतकेच नाही तर तुझ्या त्या सुंदर मुलीशी मी स्वतः लग्न लावून तुला हया खिलाफत राज्यात मोठा मानकरी करीन.”

त्याचे हे उद्दाम शब्द हलाहलाप्रमाणे कसेबसे गिळून टाकीत शास्त्री म्हणाला, “हा दिवस तुम्ही आम्हांस ह्या गोष्टीचा विचार करण्यास द्याल तर उद्या आम्ही तुमची गोष्ट मानू. माझी

मुलगी आजारी आहे. ती तुमच्या दांडगाईने घाबरून जाईल, तर तिचा आजार असह्य होईल," मौलवी म्हणाला, "मी एकटा आत येतो; दार उघड."

"पण तुम्ही मला फसविणार नाही म्हणून कशावरून ?"

"आमच्या शक्तीवरून ! तू दार न उघडलेस तर ते फोडून आम्ही आत येऊ शकू. परंतु एकदा जे मुसलमान होतील त्यास त्रास होऊ नये हा आमचा धर्म असल्याने जर तू तुझी कन्या आम्हास देशील तर आम्ही तुला फसविणार तरी कशासाठी ?"

"पण आज मला जर सोडून जाल तर उद्या मी सर्व ब्राह्मणांस मुसलमान होण्यास साग्रह विनवीन नि ते होतील. म्हणून आजच्या दिवस परत जा."

"छे ! छे ! तसे होणे नाही. सुखासमाधानाने दार उघडतोस की घरास आग लावू ? हे विचारण्याची सवलतही बोकडा! तुझ्यासाठी मिळालेली नाही, तर त्या तुझ्या कोमल अप्सरेसाठी होय !"

"आणि अप्सरेसारख्या माझ्या ह्या मुलीच्या रक्षणासाठी माझे प्राण आहेत तोवर मी झुंजल्याविना राहाणार नाही ! सुमती दार उघडू का ? नको ना! बस तर; उघडीत नाही जा !"

हरिहरशास्त्री उगाच सुमतीस मोठ्याने हाक मारल्यासारखे करून ही वाक्ये उच्चारीत होते. हे वाचकांस कळलेच असेल. त्या त्यांच्या बतावणीचा इष्ट तो परिणामही झाला. मौलवीस सुमती आत आहे, तेव्हा आग न लावता काम करून घेतले पाहिजे असे वाटून त्याने दरवाजे फोडण्याची आज्ञा दिली. क्षणार्धात कोणी खिडक्यांवर, कोणी कौलांवर पळण्यासाठी वेळ देता यावा म्हणून शक्य ते कालहरण करून आता अगदी निरूपाय झाला तेव्हा हरिहरशास्त्री आपल्या अग्न्यागाराच्या पुढच्या दाराशी तलवार घेऊन नि दार बंद करून बसला. त्या दारावरही कुऱ्हाडी पडल्या. जो मुसलमान पहिल्याने आत शिरला त्यास त्या शूर ब्राह्मणाने तलवारीने छाटून टाकले. दुसरा मोपला गर्दीत तसाच आत घुसताच त्यासही छाटून काढले. तेव्हा मोठी ओरड होऊन मोपले मागे सरले. ती म्हातारी मात्र पुढे सरसावून म्हणाली, "मी आग लावून देते या खोलीला ! आता मेला तडफडून बाहेर येईल."

पण तिला विनवीत मौलवी म्हणाला, "नही बुढी, ऐसा नही. या हिंदू लोकांत केव्हा केव्हा वाघासारखे शौर्य संचारत असते. बहुधा हा ब्राह्मण आपल्या मुलीस बरोबर घेऊन या घरात लढत असावा. आग लावलीस तर ते जिवंत जळतील पण आपल्या हाती सापडणार नाहीत. घर फोडले पाहिजे."

या वेळेस त्या ब्राह्मणाच्या घरात मोपले सर्वत्र पसरले होते. मशाली घेऊन लूटमार करीत ते सुमतीस हुडकीत होते. केवळ ते अग्न्यागार काय ते अजून पूर्णपणे पडले नव्हते. इतक्यात तेही पडले. कौलारावरून मोपले आत उतरले. अंधेरात त्यांपैकी दोन माणसांस ठार करून मागच्या दाराने हरिहरशास्त्री निसटणार तो स्वतः मौलवीच दुर्दैवाने तिथे उभा दिसला. उतावीळपणे मौलवी धावून तलवार उगारून गर्जला, "मुलगी कुठे आहे ?"

"ही बघ माझी मुलगी !" म्हणून त्या शूर ब्राह्मणाने आपली तलवार अशा सफाईने चालवून असा जोराचा वार केला की, मौलवीच्या खांद्यावरून तो खाली उतरला. ची ची करीत तो मागे हटला. तो ब्राह्मण आपल्या गृहाचे, आपल्या मंत्राग्नीचे नि आपल्या यानाचे शक्य तितके संरक्षण करून जे ब्राह्मणाचे घर समोरच दिसले त्या घराच्या रक्षणार्थ धावला-पण तोंडाने "सुमती ! शीर त्या घरात, येतोच मी !" असे ओरडत चालला.

त्या घरात जी भयंकर दुर्घटना चालली होती तिच्या पुढे हरिहर शास्त्रीबुवा हयांच्या घरची घटना काहीच नव्हे. तीन किंवा चार मोपले त्या घरात घुसलेले होते. त्याच्या बरोबर ती म्हातारीही मशाली पेटवून उभी होती. पहिल्या धडाक्यासच त्या मोपल्यांनी एका वारासरशी त्या घरचा धनी घायाळ करून खाली पाडला. तो प्रकार पहाताच एकच रडारड करीत नि त्या दुष्टांची करुणा भाकीत दोन म्हाताऱ्या, त्या धन्याची बायको नि दोन मुली पुढे घुसून त्या घायाळ गृहपतीस आपल्या अंगाखाली झाकून आकांत करीत पडल्या. तोवर घरभर सोने-नाणे काय होते ते लुटीत, फिरून ते मोपले त्या आकांत करणाऱ्या निराधार, विव्हळ, भयभीत नि निस्त्राण स्त्रियांस म्हणाले, "बायांनो तो काफर अजून मेला नाही. तो बरा होईल. शोक करू नको. आम्ही त्याची सर्व व्यवस्था ठेवितो. केवळ ए प्यारी! तू मला आपला म्हण. "नि तू मला." असे म्हणत त्यांपैकी त्या दोघांनी त्या तरुण मुलीस नि त्या तिसऱ्याने या मध्यम वयाच्या आईस कवटाळले. त्या शोकाकुल नि भयभीत स्त्रियांपैकी दोघी तर ओरडूसुद्धा शकल्या नाहीत. त्यातील जी धाकटी मुलगी मात्र ओढाताण करू लागली, ती आपल्या सासरहून बाळंत व्हावयासाठी पहिली खेप म्हणून आपल्या आईच्या घरी आली होती. तिला धडपड करताना पाहून मोपले रागावले. त्यांनी त्या तिघीस धरून त्यांची वस्त्रे सोडून दूर फेकून दिली. तेव्हा त्या धाकट्या मुलीने, "ह्या दुष्ट पशूंच्या हातून जीव नि मान रक्षण करा!" म्हणून मोठमोठ्याने हाका मारल्या. धडाधड, डोके भितीवर वा भूमीवर सापडेल तसे आदळले. पण त्या हाका मनुष्यास वा देवास कोणासच ऐकू गेल्या नाहीत. ते डोके त्या भूमीने नि भितीने कोणीच फोडून टाकले नाही. तेव्हा शेवटचा उपाय म्हणून ती कोमल सुंदरी त्या कठोर थेरडीच्या पायावर-मरी आईच्या पायांवर कमल पडावे तशी- पडली नि म्हणाली, "तू मुसलमान आहेस- पण स्त्री आहेस ! स्त्रियांच्या भावना तुला कळत असतील. हा माझा बाप. हे त्याचे हत्यारी!- त्याचे डोळ्यांदेखत हे कृत्य मी कसे सोसू !"

ती थेरडी विकट हास्य करून म्हणाली, "पोरी एक दिवस मीही असेच म्हणाले होते; पण ते कोणी ऐकले नाही. ते कोणी ऐकते तर क्वचित आज मी तुझे ऐकते. पण आता जितक्या माझ्यासारख्या होतील तितक्या मला पाहिजे आहेत. चल पड+++"

तिच्या त्या दुष्ट अपशब्दाने जळत त्या तरुणीने धाडदिशी पुन्हा आपले कपाळ भूमीवर आपटले. ते फुटले- रक्त भळभळ वाहू लागले. ती थेरडी जास्तच चिडली ! "मेल्यांनो, नपुंसक आहात की काय ?" तो ते कामोन्मत्त पशू त्या तिघा स्त्रियांशी लगटले. दोघी चूप राहिल्या. ती रक्तार्त गरोदर सुंदरी धडपड करीतच होती. इतक्यात आणखी एक-दोन मोपले आता घुसले.

“अच्छा, ती का धडपडते माहीत आहे काय?” त्यातील एक हुसेन नावाचा मनुष्य म्हणाला. “कळले, कळले”, हसून-तशाही स्थितीत हसून हसन म्हणाला. “तिचा काम एकट्याने शमला नाही!” तो दुसरा तिच्याशी बिलगला. ती त्यास एखाद्या पाय बांधून टाकलेल्या सिहीणीसारखी काडकन डसली. हसन “मारो साली को” म्हणत सुरी उपसून धावला. हुसेन म्हणाला, “अरे मुर्खा ! वास घेतल्याविनाच फूल चुरगळून टाकायचे काय ? अरसिक आहेस !” तिच्या तोंडात बोळा घातला गेला; नि पहिला मोपला दूर होताच, हुसेनने नि हुसेन दूर होताच हसनने त्या घायाळ, गरोदर, सुंदर तरुणीवर राक्षसाहूनही क्रूर बलात्कार केले. अशा भयंकर बलात्काराची प्रीती बहुधा ते पापकृत्य संपताच भयंकर द्वेषाचे स्वरूप धारण करते. याप्रमाणेच हसन उठताच ज्यास ती कडकडून चावली होती त्या हुसेनने सुरी उपसून ती त्या अत्यंत सुंदर नि निरपराधी कन्येच्या पोटात खुपसली. तिचे पोट चिरून ती सुरी तितक्याच जोराने परत उपसली, तो तीसह तो पोटातील गर्भही चेंदामेंदा झालेला बाहेर आला. हे सर्व कृत्य त्या घायाळ पित्याच्या साक्षीस, मात्र शक्ती असलेल्या नेत्रांसमोर झाले. हुसेन म्हणाला, “नीट बघ ! ए काफर ! नीट बघ. हिंदू लोकांत जन्म घेतल्याने काय दुर्दशा होते ती ! अल्ला काफरांवर इमानदारास (कुराण मानणारास)- असाच विजयी करतो!” असे म्हणून ते सर्व मोपले दुसऱ्या घरात घुसण्यासाठी लूट घेऊन बाहेर पडू लागले, तो पिसाळलेल्या वाघासारखा हरिहर शास्त्री तलवार चालवीत तिथे येऊन पोहोचला. तोंडाने “सुमती ! सुमती !” म्हणून तो ओरडत होता.

त्याच्या हया ओरडण्याने सुमती त्याच्या पुढे कुठे तरी त्या घरातच घुसली असावी असे समजून मौलवीचे लोकही मागोमाग धावत येत होते. परंतु त्याचे काही लोक त्या अग्न्यागारात त्याचे काहीतरी धन असावे म्हणून मशालीने शोधीत होते. तो त्यास एक खळगा आढळला. “सापडले रे सापडले !” म्हणून अब्राहिमने जो त्या खळग्यात हात खुपसला तो, तो मोठमोठ्याने बोंबलतच बाहेर काढला. हवनार्थ राखेखाली झाकून ठेवलेल्या ज्वलंत निखाऱ्याने तो वांग्यासारखा भाजून काढला ! त्याच्या अस्तनीनेही पेट घेतला. त्यास अर्धे अधिक भाजून काढीतो आग विझली नाही. ब्राह्मणाच्या यज्ञाग्नीने एकदा तरी यज्ञ-ध्वंसकास चटका दिला. भक्तांची सर्व दैवते इतकी जरी जाज्वल्य असती तरी !-

हरिहरशास्त्री देखील त्या त्याच्या हवनाग्नीसारखाच पेटत जो त्या दुसऱ्या घरातून निरपराध ब्राह्मण कन्यकांवर बलात्कार करून बाहेर पडणाऱ्या मोपल्यांत मिसळला तो हसनला नि हुसेनला तलवारीने छाटून वाट काढीतच आत घुसला. पाहातो तो ते ब्राह्मणाचे कुटुंब त्या अत्यंत विपन्न, करुणास्पद नि बीभत्स भयंकर स्थितीत पडलेले ! “हाय हाय ! स्थूलेश्वरशास्त्री !” हरिहर त्या घायाळ गृहपतीस म्हणाला- कारण तो गृहपती दुसरा कोणी नसून महारापेक्षा मुसलमान घरात येण्यात कमी भ्रष्टाकार होतो असे आग्रहाने प्रतिपादणारा स्थूलेश्वरशास्त्रीच होता-

“काय ही दशा ! ईश्वराचा हा केवढा कोप!” स्थूलेश्वरशास्त्री कळवळून म्हणाला,

"आणि एक प्रकारे आपल्या हिंदू जातीच्या दुष्ट आढ्यतेच्या पापाचे केवढे हे भयंकर फळ ! असो. अजून तरी बोला. मी त्या उरलेल्या तुमच्या मुलीस नि पत्नीस माझ्या आज्ञेत जे दोन थिय्या तरुण उरलेले आहेत त्यांच्या संरक्षणाखाली दुसरीकडे सुरक्षितपणे धाडण्याचा प्रयत्न करतो."

स्थूलेश्वरशास्त्री हूं म्हणेना ! प्रामाणिकपणे त्यांस थिय्याच्या हाती मुलीस-मुसलमानांनी भ्रष्ट केलेल्या मुलीस यापुढे तरी त्यांची विटंबना टळावी म्हणून देखील-देणे म्हणजे महत्पाप होय असे वाटत होते ! अशी रूढीची बेडी एकदा हृदयात रूतून गेली म्हणजे ते हृदय फोडून तोडून टाकल्याविना निघणे कठीण होते.

हरिहरशास्त्री यांनी एक क्षण सर्व देखावा पाहिला. "गेल्या संध्याकाळी शांतपणे निजावयास हे सर्व कुटुंब गेले होते. ह्या मोपल्यांचे काहीएक दिले घेतले नव्हते. हे मोपले आडरानचे. स्थूलेश्वरशास्त्री हयांनी नि त्यांच्या मंडळींनी हे ब्राह्मणवन आज दोन पिढ्यांत ओलांडले देखील नाही. शुचिर्भूतपणे श्रृतिस्मृतींचा अभ्यास करून संतोषात दिवस कंठणारे हे कुटुंब-संध्याकाळी प्रेमाने एकमेकांशी हसतखेळत झोपी गेले-आणि अजून सकाळ झाली नाही तो त्यांच्यावर हा कोण प्रसंग! घर, दार, मुली-पोटातला गर्भ-देखील मुसलमानी तलवारीस नि आगीस बळी पडलेला ! का? केवळ हे हिंदूचे कुटुंब म्हणून ! म्हणजे हिंदू समाज बलहीन नि असंघटितपणे राहातो म्हणून ! समाजाच्या शक्तिक्षयाचा, बऱ्यावाईट स्थितीचा परिणाम व्यक्तीस नि कुटुंबास, नको म्हटले तरी इतक्या निर्घृण उत्कंठतेने भोगावा लागतो ! व्यक्तीच्या नि समाजाच्या जीवनाचे धागेदोरे इतके गुंतागुंतीने विणलेले असतात. झाडाच्या फांद्याप्रमाणे वर फारसे एकात्मकत्व दिसत नसले तरी भूमीत मुळ्यांशी व्यक्तिजीवन नि समाजजीवन इतके निगडित झालेले असते. तू काही अपराध कर वा करू नकोस; तू हिंदू समाजात आहेस, म्हणून त्या समाजावर शत्रूचा आघात घडेल, तेव्हा तो तुझे शीर- तू थिय्या ऐस वा नंबुद्री ऐस, वा महार ऐस- तुझे डोके दुभंग केल्याविना रहाणार नाही. तुझे सामाजिक जीवन संकटात पडले असता तुझे जीवन हेच मुळी केवळ वैयक्तिक नसून वैयक्तिक-सामाजिक असे दोहींचे मिश्रण आहे !"

हे विचार हरिहरशास्त्री हयांच्या मनात मनाच्या वेगाने झटकन येऊन गेले. स्थूलेश्वराच्या मूर्ख हटवादीपणाने आली इतकी संकटे बस्स आहेत, आणि त्याचे अनुमोदन असो नसो; त्या स्त्रियांचे रक्षण करावयाचे असा निर्धार त्वरित करून हरिहराने त्या दोघी स्त्रियांस मागच्या दारातून आत बोलावून आणलेल्या दोघा थिय्यांच्या हाती सोपवून दिल्या नि आपण तेथून निसटून मौलवी जिकडे दिसला तिकडे धाव मारीत गेला.

हरिहरशास्त्री हयांच्या मागोमाग मौलवी स्थूलेश्वरशास्त्री हयांच्या घराकडे सुमतीसाठी येत असता मध्येच त्याच्या एका मोपल्याने "सुमती ! सुमती ! साली मिल गयी ! सापडली !" म्हणून पुकार केला. मौलवी लगेच हरिहरास सोडून तिकडे धावला. एका घराच्या मागील दारी गवताच्या गंजीत घुसून चिंतामणशास्त्री यांची मुलगी लक्ष्मी ही, त्यांच्या घरावर दीन दीन करून मोपले

तुटून पडताच, पळत पळत येऊन लपून बसलेली होती. ती सुमतीच्याच वयाची असून काहीशी तशीच दिसत होती खरी. मौलवीने प्रथम तिला पाहाताच अत्यंत हर्षभराने तिला त्या सर्व गर्दीतही आपल्या छातीशी कवटाळली. मौलवीच्या खांद्यावर हरिहरशास्त्री यांच्या लागलेल्या वारातून रक्त वाहणे जरी बंद झाले, तरी त्याच्या वेदना कमी झालेल्या नव्हत्या. पण त्या वेदना त्याला सुमती म्हणून लक्ष्मीला कवटाळण्यास मिळताच थंड झाल्यासारख्या झाल्या. ज्यासाठी आपण एवढा खटाटोप केला ते कार्य झाले असे वाटून त्यास फार बरे वाटले. त्याने आपल्या दोन विश्वासू मोपल्यांस, सुमतीला-लक्ष्मीला सांभाळून हरिहरशास्त्री हयांच्या घरीच घेऊन चला म्हणून सांगितले. आता रात्री तीन वाजत आले होते. तेव्हा आपल्या ब्राह्मणवनात असलेल्या पाच-सहा ब्राह्मण घरांतून आता एक ब्राह्मणाचे घर असे उरले नव्हते ! सर्व कन्या भ्रष्ट झालेल्या होत्या, सर्व पुरुष घायाळ बहुतेक न लढताच- झालेले होते! मौलवीची आज्ञा नव्हती म्हणून, नाही तर सर्व घरेदारे जळून राखही झाली असती. पण त्या टुमदार नि सुंदर घरासच त्यास आपली राजमंदिरे बनवावयाची होती, म्हणून ती मोपल्यांच्या खिलाफत सरकारच्या आगलाव्या विभागाचे (खात्याचे) अध्यक्ष असणाऱ्या त्या थेरडीच्या मशालीतून वाचली.

आपल्या लोकांस बोलावीत नि एकत्र करीत मौलवी एका दगडावर किंचित बसला. त्याचा खांदा दुखतच होता. "देखो; मी बोललो तसे झाले." पाहिले ना ? दहा गावे आपण उद्ध्वस्त करीत आलो. पण ह्या यःकश्चित ब्राह्मणवनातील चार घरे घेण्यासाठी आपणांस धर्मवीरांचे बळी द्यावे लागले, तिकडे देवळाकडे मारामारी चाललीच आहे. हे कुट्टम गाव घेण्यास जितका त्रास पडला तितका अरनाड तालुका घेण्यासही पडला नसेल. हे सारे हया कम्बूचे नि हरिहरचे काम. दोन काफर एकत्र झाले तर अशी सैतानीयत माजवितात. पण फळ आले-केलेल्या श्रमांचे चीज झाले." मौलवी म्हणाला.

"वा खानसाहेब ! सुमती मिळाली म्हणून तुमच्या श्रमाचे चीज झाले हे उघडच आहे. पण आमच्या ? आम्हा एक-दोघांच्या वाट्यास अजून काहीच नाही. हे पाहा आम्हांस काही मिळाले पाहिजे नाही तर कोणासच काही पचणार नाही अं!" अबदुल्ला तिरोला जरा तिरसटपणे म्हणाला.

"अबदुल्ला ! दम धर भाई. सकाळ होऊ दे-अल्ला इमानदारास बरकत देणारा समर्थ आहे. दोघांस एक नाही - एकेकास दोघी दोघी तरी उद्या वाटून देईन थांब. पण ते काफर जे धरलेत नि बंदी केलेत त्यांना समोरच्या घरात नीट कोंडून टाका ! अरे पण तो हरिहर कोठे सापडला का? नाही तर सारेच मुसळ केरात !"

"हा हरिहर पाहा." असे म्हणत महंमद वेडा पुढे झाला. तीन मोपल्यांनी धरलेला, तलवारीच्या वाराने एक पाय, सबंध वृक्षापासून शाखा छाटून करवतीने कापून टाकावी तसा, साफ उडून गेलेला, पण तरीही निर्दयपणे कधी फरफटत, एका पायावर अडखळत, चालवीत आणलेला, रक्ताने लाल लाल झालेला हरिहरशास्त्री मशालीच्या उजेडात स्पष्ट दिसू लागला.

“इस काफरने” महंमद वेडा पुढे म्हणाला, “इस काफरने मोठा घात केला आहे, त्याचे बक्षीस त्यास ह्या इस्लामी वीराने स्वतः हे दिले. मौलवी, आपण ज्या कन्येस सुमती समजून आमच्या स्वाधीन केली तीस आम्ही घेऊन जात असता हया काफराने आमच्यावर हल्ला चढविला. अंधेरातून एकाएकी माझ्या बरोबर असलेल्या कासम ठेंगण्याला ह्याने छाटून टाकले नि माझ्या हातून त्या कारटीस घेऊन निसटू लागला. अंधेरातून वार ! अंधेरात पळाला ! हया काफरास धर्मयुद्ध कसे करावे हे समजत नाही !

“पण ती कारटी कुठे आहे ? ती सुमती नाही म्हणून कशावरून म्हणतोस ? मौलवी रागाने उसळून म्हणाला.

“ती पळून गेली म्हणून ? नव्हे नव्हे खानसाहेब! ऐका तरी पुढे-” घाबरत महंमद वेडा म्हणाला, “हा काफर त्या पोरीस पाठीवर टाकून तो पुढे नि मी मागे असे आम्ही धावत सुटलो. चंद्राच्या उजेडात हा येताच मी तलवारीनेच तीन-चार घाव कुऱ्हाडीच्या घावासारखे ह्या त्याच्या एका पायावर मारून ह्यास खाली पाडले. पण मुलगी दिसेना ! तेव्हा याच्या पाठीची मी कसून झडती घेतली. पण मुलगी पाठीवर कुठेच आढळेना !”

“रे सैतान! आजूबाजूस लपलेली असेल. तेथे का नाही पाहिलीस !”

“पाहिली तर काय महाराज ! हयाच्या उजव्या बगलेत पाहिली, डाव्या बगलेत पाहिली. दूरवर पण जाऊन पाहिली. पण ह्यास कोण सांभाळतो ? हा दोन पायाने कसा धावत होता-आपण पाहिलाच आहात. त्याच्या अधांतरी एका पायाने सहज धावता नि तुम्हांस माझा पराक्रम, हा नि याचा हा पाय न सापडता, तर खरा देखील वाटला नसता.” असे म्हणत महंमद वेड्याने स्वतःच्या खांद्यावर आणलेला रक्त घोळत असलेला, तो ब्राह्मणवीराचा कापलेला पाय, एखाद्या हत्तीच्या कापलेल्या सोंडेसारखा, धाडकन भूमीवर आपटला.

६. लढत लढत मरण !

तिकडे सुमतीस घेऊन तिचा भाऊ नि तो तरुण थिय्या दामोदर जिकडे वाट फुटेल तिकडे चालत होती. थोड्याच वेळाने त्यांच्या रोधानेच स्थूलेश्वराची मुलगी नि पत्नी यांना घेऊन ते दुसरे दोन थिय्ये, ज्यांच्या हाती हरिहराने यास सोपविले होते; तेही येते झाले, तेव्हा ते तीन पुरुष नि तीन स्त्रिया लपत-छपत नि मधूनमधून मागे राहिलेल्या आपल्या प्रियजनांचे हाल चालले असतील, या शंकेने नि भोगलेल्या हालांच्या आठवणीने स्फुंदत एकसारख्या मार्ग काढीत कुठे तरी पण कुट्टमच्या शक्य तितके दूर चालल्या होत्या. परंतु त्या प्रलयात हरिहराच्या शौर्याने वाचलेली ती चवथी होती. ती तरुणी लक्ष्मी मात्र एकटीच एका कुंजामागे दडून बसली. हरिहराचा पाय तुटताच महंमद वेड्यास त्या ब्राह्मणवीराने बराच वेळ आपल्या पकडीत दाबून धरल्याने तिला पुढे निसटण्यास वेळ सापडला होता. ती काही वेळ पळत जाऊन मग त्या कुंजात येऊन बसली होती. ती जात्या धीट होती, तरी स्त्री तरुणकन्या- होती. त्या रानात दूर, केव्हा केव्हा अगदी जवळ कोल्हे, तरस नि वाघ हयांचे क्रूर आवाज तिच्या कानांवर जेव्हा पडत तेव्हा कधी सवय नसलेल्या हया तरुणीस इतके घाबरल्यासारखे होई की, त्या निर्जन रानापेक्षा भयंकर संकटात सापडलेले का होईना; परंतु कुट्टमच बरे असे तिला वाटावे ! सापाची नि अंधेराची भीती तिला एकसारखी भिववीत होती. कसे तरी माणसांत जावे असे तिला वाटे. त्या रानात तिच्या कुंजापाशी तसे म्हटले तर कोणीही भयप्रद जीवजंतू आलेले नव्हते. मोपल्यांहून भयप्रद जीवजंतू येणेही शक्य नव्हते; पण ते कोणीही जीवजंतूच्या जवळ नसणेच- ते निर्जीवन- निर्जनपणच आजन्म प्रियजनांच्या अंगाखांद्यावर वाढलेल्या त्या लक्ष्मीला अत्यंत भयप्रद नि दुर्धर वाटले. तथापि ती धीर धरून रात्रभर तेथेच राहिली. पहाटेच्या सुमारास जरा बरे वाटून तिने पुढे पळावयाचा निश्चयही केला. मैल दोन मैल जाताच तिला तिच्यासारख्याच दबत चाललेल्या आणखी दोन स्त्रिया दूर दिसल्या. ह्या क्वचित मुसलमानांच्या पक्षाच्याही असतील अशी शंका आली असतानाही निर्जनपणास अगदी कंटाळलेली ती तरुणी हो ना करता करता त्या स्त्रियांपाशी गेलीच. तुम्ही कोण म्हणून विचारताच त्या स्त्रियांनी लक्ष्मीला ओळखले, नि एकदम कंठ दाटून येऊन त्या म्हणाल्या, “बाया ! तू इकडे कुठे ! तुम्ही ब्राह्मणाच्या. तुमचे नख आम्हांस दिसणार नाही. देवाने हा कोण कोप केला ! कालच्या त्या मेल्या मुसंड्यांच्या दंग्यातूनच तुम्ही निसटल्या असाल. तुझ्या दाराशी तुझे अनेक वेळ उष्टे खाल्लेल्या आम्ही, तुझ्या कुट्टम गावच्याच दोघी मसकुनी आहोत, बाया.”

“बायांनो,” लक्ष्मी गहिवरून येऊन म्हणाली “तुम्ही इकडे कोठे जात आहात !”

“आम्हांवरही हया मेल्या मोपल्यांनी अत्याचार केले. बाई आमच्यापाशी पैसा नाही नि पै नाही. तरी त्यांनी आमच्या झोपडीस आग लावली. आमच्या पुरुषांस धराधरी केली नि आम्हा सर्वांस म्हणाले की, “मुसलमान व्हा, नाही तर मरा.” पण बाई, आम्ही आमची मसकुनी जाती कशी सोडावी? बाई, आम्ही म्हटले, “आम्ही ब्राह्मणींनी नव्हे. आमच्या का मागे लागता ?” तेव्हा

त्यांच्यातील एक थेरडी मशालीने आमची लुगडी पेटवून देत धावली नि म्हणाली, “पण तू हिंदू आहेस ना?” कुत्र्यांहून हिंदू तुम्हांस नीच समजतात; पण तुम्ही मसकुनी लोक मुसलमान होत नाही. तुम्ही ब्राह्मणांचे, क्षत्रियांचे नि वैश्यांचे पाय आहात. ते तुमच्यावर उभे आहेत. तुम्हांस कापले की ते खाली पडलेच.” त्या जाळपोळीतून बये, आम्ही कसे तरी वाचून पळत आहोत. पण आमचे काय ! आम्ही मसकुनीच. पण बया ! तुझे रानात कसे होईल ?” त्या मसकुनीचे डोळे डबडबून आले. मलबारात मसकुनी ही जाती अस्पृश्यांतही अस्पृश्य मानली जाते, थिय्या त्यांच्याशी व्यवहार करीत नाहीत. जसे महार डोंबांना नीच मानतात तशीच मसकुनी जाती ही थिय्याहूनही कनिष्ठ समजली जाते.

लक्ष्मी कळवळून म्हणाली, “तुम्ही बायांनो, तुमचे स्वतःचे दुःख विसरून माझी चिंता करता ना? देवानं तुम्हांस इतके उदार हृदय दिले आहे. तुम्ही मसकुनी माझ्यासारख्या ब्राह्मणीपेक्षा किती तरी उच्च जातीच्या हिंदू आहात. नको, नको, बाई, अशी मागे घेऊ नकोस. हे बघ मला किती वेळ तरी कोणाच्या तरी गळ्यात पडून पोटभर रडावेसे वाटत आहे. तू संकोच करू नकोस. मला छातीशी घे-क्षणभर तू माझी आई हो !” असे म्हणत लक्ष्मी त्या मसकुनी स्त्रीच्या गळ्यात पडली. दुसरी मसकुनी तशा स्थितीतही, ‘बामणीनीस’ आम्ही शिवलो म्हणून स्वतःस मनातल्या मनात दोष लावीत होती. पण ती मसकुनी स्त्री मात्र लक्ष्मीस छातीशी धरून न कचरताच तिचे सांत्वन करीत होती. थोड्याच वेळात त्या तिघींचाही दुःखी प्रेमाचा पहिला उमाळा ओसरला नि पुन्हा भीतीने त्या पुढे तरी जावे म्हणून लपत छपत चालल्या. थोड्याच वेळात त्यांस आणखी एक त्यांच्याच गावचा मनुष्य- विष्णू नायर दुरून जाताना दिसला. तेव्हा देवानेच आपल्या साहाय्यास धाडले असे त्या भयभीत स्त्रियांस होऊन त्या अतिशय आशेने त्याच्याकडे गेल्या. त्यास पाहाताच विष्णू नायराने कपाळास आठ्याच घातल्या, मी स्वतःच जीव घेऊन कसाबसा पळत असता हे लचांड कुठले गळ्यात पडू पाहाते असे होऊन तो त्यास वसकून अंगावर येऊन म्हणाला, “मजकडे काय आहे ? इकडे कशाला येता ?” “महाराज !” ती मसकुनी वृद्ध स्त्री हात जोडून म्हणाली, “महाराज, आपण नायर लोक क्षत्रिय म्हणविता. अबला आम्ही. आम्हांस दुसरे काही नको. हया बामणीनीच्या मावशीचे गाव येथून दोन कोसांवर आहे. तेथपर्यंत तीस पोचवून द्यावे. मोपल्यांनी मार्ग रोखले आहेत म्हणून आम्हांस भीती वाटते.”

“पण तुझी जात कोण ?” नायर म्हणाला.

“मसकुनी-डोम, बाबा !”

“आणि तू माझ्याजवळ दोनशे फुटांच्या आत येऊन बोलतेस ? राक्षसिणी, माझा धर्म बुडवितेस ? माहीत नाही आम्ही क्षत्रिय, धर्मासाठी प्राणाचीही पर्वा करीत नाही ते !” असे म्हणत त्या स्त्रीची छाया पडल्याचा खरोखरीच राग येऊन त्या क्षत्रियाने त्या अस्पृश्य वृद्धेच्या ताडकन तोंडात मारली ! तिची मुलगी एकदम रडू लागली, तेव्हा लक्ष्मी रागाने नि दयेने लाल नि कंपित होऊन म्हणाली, “अरे विष्णू!!! ह्या बिचाऱ्या अस्पृश्यापुढे जो तू पराक्रम दाखविलास तो ते तुझे

बाप-ते मुसलमान मोपले तुझ्या घरातील स्त्रियांवर नि देवळातील देवांवर अत्याचार करीत आहेत त्यास का दाखवीत नाहीस? त्यांच्या भयाने एखाद्या नपुंसकासारखा जीव घेऊन पळत आहेस; त्या कृत्याने तुझा क्षत्रिय धर्म भ्रष्टला नाही. पण ह्या बिचाऱ्या अस्पृश्य म्हातारीच्या सावलीने तो भ्रष्टला ना ? मुसलमान त्यांस हिंदू म्हणून ठार मारीत आहोत- हिंदू त्यास मसकुनी अस्पृश्य म्हणून मारीत आहेत, हुसकून देत आहेत. त्यांनी आता जावे कुठे?"

"लक्ष्मी," तो नायर जरा ओशाळून म्हणाला, "तू पाहिजे तर चल मजबरोबर-जरी ह्या प्रसंगात तुझ्यासारखी सुंदर, तरुण मुलगी बरोबर घेणे म्हणजे मोपल्यांचे संकट बोलावून आणणे होय, तरीही माझ्या गावच्या ब्राह्मणाची तू, चल, तुला पोचवितो. पण ह्या मसकुनी स्त्रिया माझ्याबरोबर घेईन तर क्षत्रिय मला जातीबाहेर काढतील !"

"का नाही काढणार ?" लक्ष्मी तिरस्काराने म्हणाली, "अबलांचे परधर्मीयांपासून रक्षण केले तर मग क्षत्रियत्व ते कुठे राहिले ? पण तू तसे काही एक पाप केले नाहीस. हिंदू धर्मावर नि हिंदू जातीवर भयंकर अत्याचार चालले असता त्या अत्याचार करणाऱ्या विधर्मीयांशी तू सन्मुख लढत नाहीस. जीव घेऊन पळत आहेस. मुसलमानांनी तुमची बायका-पोरे काल बाटविली असता तुझा धर्म बुडाला असे तुला वाटत नाही. पण हिंदू अस्पृश्याची नुसती छाया पडली तर तुझा धर्म बाटतो! तेव्हा तू खराखरा धर्मत्राता क्षत्रिय आहेस यात काही संशय नाही ! मी तुझ्या बरोबर येत नाही. ह्या माझ्या मसकुनी बहिणीबरोबरच मी राहाणार. डोंबांच्या स्त्रियांचे जे सुख-दुःख, तेच आपले सुखदुःख ! हिंदुत्वावर संकट आले असता डोंब, महार, मांग, ब्राह्मण हे डोंब, महार, मांग नसून केवळ हिंदूच आहेत असे मानणारे नि तसे आचरणारे आत्मे ब्राह्मणात निघतात हे सिद्ध करण्यास मी या मसकुनी बरोबरच राहणार तू जा !"

लक्ष्मी हे म्हणत होती तोच तो नायर क्षत्रिय निघूनही गेला होता. थोडा वेळ त्या स्त्रिया आणखी पुढे गेल्या. त्यास दुरून काही ओरड ऐकू आल्यासारखी झाली. त्या तिघीही भ्याल्या. आश्रयार्थ एका वडाच्या झाडाखाली, करवंदीच्या जाळ्या होत्या. त्यांच्यामागे काही वेळ छपून काढावा म्हणून तिथे गेल्या, तो त्यास सुमती नि स्थूलेश्वर शास्त्री यांच्या दोन स्त्रिया दडलेल्या भेटल्या. कोण तो दुःखावेग ! कोण ती भीती ! मागे काय झाले ते सांगण्याची कोण ती आतुरता! त्या सर्व मनोविकारांच्या कैचीतून अखेर एकच प्रश्न सुमतीच्या मुखातून निसटू शकला.

"तुला माझे बाबा मागे भेटले का ?" एकच उत्तर लक्ष्मी देऊ शकली,

"त्यांनीच माझा जीव नि धर्म वाचविला, पण त्या युद्धात शत्रूने त्यांचा पायचा पाय कुऱ्हाडीने तोडून काढला नि त्यास बंदिवान करून नेले."

"अगबाई !" म्हणून एकदम उंच किंकाळी सुमतीने फोडली. "हे मुली, उगी, उगी, उगी आता. कोणी कोणासाठी रडावे ?" म्हणून स्थूलेश्वराची पत्नी तिचे सांत्वन करू लागली. पण भीतीने तिचे रडणे आधीच बंद केले होते. कारण ते तीन-चार थिय्ये नि तिचा भाऊ ओरड कसली ते ऐकावयास दूर जाताना, त्या स्त्रियांस त्या झाडीमागे अगदी हूं का चूं न करता बसा म्हणून

सांगून गेले होते. ते आपल्या किकाळीने संकटात पडतील की काय हया भीतीने सुमती चूप बसली.

आता सकाळचे दहा वाजले असावे. रात्रभर वाट चालत, भीत, पळत, दुःखाच्या वणव्यात जळत त्या सर्व स्त्रिया नि पुरुषांचे जीव सुकून गेले होते. पाणी तोंडात एक थेंब देखील पडले नव्हते. काल दहा वाजता हयाच वेळेस शांत नि रमणीय कुट्टम गावात हरिहर अग्नीस आहुती देऊन उठत होते. सुमती तोडलेल्या फुलांची माळ करीत असता तिच्या भावाने येऊन तिचे डोळे गुपचूप झाकून धरले होते. लक्ष्मी तुळशीस प्रदक्षिणा घालीत होती नि मधूनमधून पारिजातकावर बुलबुल बसत त्यास हातच्या माळेने विनोदात उडवीत होती. ते पुन्हा बसत होते. ती मसकुनी तरुण कन्यका आपल्या लहान बहिणीस गाणे म्हणत होती, “फणी घे फणी घे, वेणी घाल वेणी घाल, मालतीचे फूल घालीत सासरास चाल.” आणि ती स्थूलेश्वर शास्त्री यांची मुलगी आपल्या माहेरी पहिल्या खेपेस आलेल्या प्रिय बहिणीच्या डोहाळे जेवणास “काय करू ग, काय करू ग ताई?” म्हणून तिला प्रेमाने चिडवीत होती ! ती वृद्ध मसकुनी तिच्या लहानशा अंगणात भाजीपाल्यातून काही निवडीत मनात म्हणत होती, “ही भाजी माझ्या मुलीला आवडते. नाही ! ती उद्या माहेरास येईल; ही उद्याच तोडीन !”

चोवीस तास झाले असतील नसतील- तो आज दहा वाजता-त्या आज काय करीत आहेत ? हे भयंकर - कल्पित नव्हे - अनुभूत स्थित्यंतर ! हे जाच, हे अत्याचार नि पीडा त्यास सहन करावी लागावी, असे त्यांनी काय पाप, कोणाचा अपराध केला होता ?

एवढाच की ते हिंदू समाजात जन्मास आले होते ! नि ते हिंदूच राहू इच्छित होते ! व्यक्तिशः इतकाच, एवढाच-

पण सामाजिकतः केवढा ! - केवढा अपराध की स्वतःचा हिंदू समाज त्यांनी इतका असंघटित, असहाययुक्त- वाळूच्या कणासारखा ठेवावा. वाळूच्या कणासारखा नुसता एकढीग, एकराशी;- समाज नव्हे ! केवळ पूर्वजांच्या पुण्याईच्या अवशिष्ट अंशाने काय तो तगलेला ! परंतु अवशिष्ट पापाने प्रतिक्षणी भंगू पाहणारा- छिन्नभिन्न होऊ पाहणारा !

ओरड कसली आहे ते पाहण्यास गेलेले ते पुरुष परत आले. ओरड शत्रूंचीच होती; कारण त्याच मार्गाने मोपल्यांची दुसरी एक मोठी टोळी हिंदूंची मृगया करीत येत होती. त्या संकटात ते पुरुष देखील आता काय होईल हया भीतीने कापू लागले होते. एका भयंकर संकटाशी तोंड देऊन त्यांचा पाडाव करण्यात त्यांची सर्व शक्ती खर्च झालेली होती. त्यांची तोंडे पाण्याविना सुकलेली, स्नायू विश्रामाविना शिथिल झालेले, मन उत्साहाविना म्लान नि धैर्य आशेविना गलित झाले होते. तरीही तो ब्राह्मणकुमार नि ते थिय्या जर अजून पायावर उभे नि हातात शस्त्र धरून असतील तर ते एका दामूच्या अदम्य धैर्याने नि निश्चयाने होय.

“शेवटपर्यंत लढावयाचे, धर्मासाठी मरावयाचे. मलबारात हिंदू लढू शकतात-निदान आपण तरी आपले कर्तव्य केले, बस्स !” असे काही इतरांस, काही स्वतःस तो तुटके बोलला. सुमती आवेशाने

पुढे झाली. म्हणाली, “मला एक सुरी द्या, मी एक तरी हिंदूद्वेषी मारून मरेन.” दामूने एक सुरी तिला दिली नि म्हटले, “देवी ! मी जिवंत आहे तोवर आपल्या हातातील सुरी मी आहे. मी पडल्यावर-पडल्यानंतर- ही !” तरुण-तरुणींचे अपूर्व साहस नि उत्साह पाहून ती मसकुनी जातीची अस्पृश्य पोरगी मालती आवेशात येऊन म्हणाली, “मला पण एक सुरी द्यावी. हिंदू धर्मासाठी मीपण लढून मरेन.” दामूने दुसरी एक सुरी तिला दिली- पण ती त्या सुरीला त्याच्या हातून घेईना. “खाली ठेवा. मी उचलून घेते. मी मसकुनी जातीची आहे. तुम्ही थिय्या. मी तुम्हांस गावात नेहमी पाहाते. तुम्हांस आवडेल न आवडेल. आपणास माझा विटाळ होईल !” दामू हसला. “ब्राह्मणांशी बरोबरी करू इच्छिणे असेल नि ब्राह्मणांनी आम्हास शिवावे म्हणून म्हणण्याचा अधिकार पाहिजे असेल तर महारांनी प्रथमतः डोंबास तो अधिकार दिला पाहिजे. तू मसकुनी अस. तू हिंदू आहेस. मी हिंदू आहे. माझ्या हातूनच ही सुरी घे. मुसलमानाचा विटाळ जर मला चालतो तर तुझा हिंदूचा चालणार नाही ? हिंदू धर्मासाठी मरण्याचा आवेश तुझ्यात उत्पन्न झालेला - आता तू ब्राह्मणांनाही पूज्य आहेस! घे सुरी नि जो पहिला धर्मशत्रू दिसेल त्यावर- जर तो आततायी असेल तर- कर हिचा वार !” मालतीने ती सुरी दामूच्या हातातून घेतली. दैवाची काय इच्छा ती पाहात ते सर्व त्या झाडीच्या आड लपले.

थोड्याच वेळात मोठमोठ्याने “दीन दीन,” “अल्ला हो अकबर,” अशा क्रूर आरोळ्या मारीत मुसलमानांची दीडशे-दोनशे लोकांची टोळी अगदी जवळ आली. हया बंडात आजूबाजूच्या दहा-बारा गावांतील मोपले एकत्र होऊन एक हिरव्या फडक्याची ध्वजा तुर्कांचा ध्वज म्हणून उभारीत नि हिंदूंची लूटमार करीत चालू लागत. जो मुसलमान जितका निरुद्योगी वा बदमाष असेल तितका तो प्रखरतर धर्मवीर बने. कारण धर्मयुद्धासारखा धंदा दुसरा कोठेही मिळणे त्यास शक्य नव्हते. ते राक्षस ओरडत ओरडत बाजूने फिरत शोधीत जात. कारण हिंदूंच्या पळापळीने लोक जीव घेऊन आजूबाजूस लपलेले अधिक सापडत. ते आले. दुर्दैवाने त्या जाळीकडे त्यांच्यातील काहींचा रोख गेला. “काफर” “काफर” म्हणून एकच ध्वनी झाला. जे पहिले दहा-पाच आले ते मोपले त्या तरुण थिय्याच्या नि त्याच्या सहाय्यकांच्या तलवारीने ठार झाले. पण त्या सगळ्या टोळीची धाड तिकडे वळली. दामूपाशी सुऱ्यादेखील अधिक नव्हत्या; नाही तर तो त्या स्त्रियांनाही प्रत्येकीस एकेक देता. निराशा मूर्तिमंत त्याच्यापुढे उभी होती. ती धाड त्यावर आली. बायकांत तलवारी पाहून एकच किकाळी उठली. कचाकच तलवारी चालू लागल्या. तीन-चार मुसलमान ठार होऊन पडले. इतक्यात हरिहराचा मुलगा जो शूरपणाने शत्रूस आपल्या हिंदू स्त्रियांपासून दूर राखीत होता, त्यावर तीन-चार तलवारी एकदम पडून तुकडे तुकडे होऊन त्याचा देह खर्ची पडला. एका काठीचा आघात बसून त्या म्हाताऱ्या मसकुनीचे डोके नारळासारखे ताडकन फुटून गेले. आपल्या भावाचा वध झालेला पहात सुमती एखाद्या वाघिणीसारखी त्या वध करणाऱ्या मुसलमानावर तुटून पडली. दोघांची पोटे चिरून काढली होती, तोच तिच्या हातून पाठीकडून मोपल्यांनी कवळून तिच्या हातातील सुरी हिसकून घेतली. ते तिच्याशी लडिवाळपणा करू लागतात इतक्यात, “व्हा; दूर व्हा!”

म्हणून अधिकारी आज्ञा झाल्या. तेव्हा ते मोपले हिरमुसल्यासारखे होऊन मागे झाले नि त्या टोळीचा मुख्य पुढारी म्हणाला, "हया छोकरीला अगदी त्रास न देता पण हिचे हात बांधून मजबरोबर घेऊन चला." डोळे मिचकावीत ते मोपले सुमतीस बांधून पुढे घेऊन चालले. मार्गाला लागेपर्यंत सुमती साधारणतः शुद्धीवरच नव्हती. तिथे तिच्यापासून पुढेच तो तरुण थिय्या घावांनी विव्हळ नि विकल झालेला पहाऱ्यात बांधून चालविलेला होता. ती मसकुनी-मालती, लक्ष्मी नि हरिहरशास्त्री ह्यांच्या बायका कोणी मोपल्यांनी उडविल्या किंवा त्या गर्दीत ठार झाल्या हे तिला काहीच कळेना. थोडे पुढे जाताच एक गाडी दिसली. तो त्या टोळीचा मुख्य म्हणाला, "ये छोकरीको ह्या गाडीत बसवा." सुमती त्या गाडीत उचलून ठेविली गेली. तो मुख्यही त्या गाडीत बसला आणि ती गाडी दामू थिय्यास नेले जात होते त्याच्या उलट दिशेने निघाली. आता मात्र कठीणात कठीण, भयंकरात भयंकर म्हणून जे कोणते संकट तिच्यावर गुजरण्यासारखे होते ते सुमतीवर गुजरले ! आता मात्र तो अंतरला ! आता मात्र ती एकटी उरली !

तिचा धैर्यमेरू ढळला. ती धायदाय रडू लागली ! दामू ! दामू म्हणून, तिने आजपर्यंत कोणासही कळवळून मारल्या नसतील अशा विव्हल, पण वेड्या हाका, मोठमोठ्याने मारल्या. पण गाडी वेगाने धावत चालली. दामू दिसेनासा झाला ! त्या निराधार स्थितीत त्या पोरीच्या मनास त्या वियोगाच्या होणाऱ्या दशेच्या वेदनांचे वर्णन काय करावे ? खरोखरच ती पाण्यातून काढलेल्या माशासारखी तळमळू, तडफडू लागली. आणि दामू?- गेले दोन दिवस त्याच्या सर्व भावना, त्याचे विचार, त्याचे विकार, त्याच्या रक्तबिदूतील प्रत्येक स्पंदन सुमतीविषयक होते. अंती तिच्या रक्षणार्थ आपण अपूर्ण पडलो-आणि जिवंत उरलो ! ती आता दिसेनाशी झाली. दामू-तो अठरा वर्षांचा कोवळा तरुण-ते पोर-तेही त्या पोरीसाठी धायधाय रडू लागले.

सुमतीस त्या मुख्याने जरा दटावून, जरा दया दाखवून विचारले,

"छोकरी ! रडशील, ओरडशील तर आहेस त्यातूनही अधिक कष्टात पडशील. कोणा माझ्या हुजऱ्याच्या पदरात टाकली जाशील. पण तू अशी वेडी नाहीस, मला माहीत आहे. हे बघ, मी हया टोळीचा मुख्य आहे. हया तालुक्याचा कलेक्टर आहे. माझे नाव तू ऐकले असशील. हया खिलाफती राज्यात अली मुसेलियरच्या जोडीने माझा अधिकार चालतो. खलीफाने मला कलेक्टरी दिल्याने कुट्टमचा मौलवीदेखील माझ्या हाताखाली आला आहे; नि तुझ्यावर माझे प्रेम नि विश्वास बसला आहे म्हणून सांगतो, माझे नाव खरंच का नाही माहीत तुला ? माझे नाव ऐटखान आहे."

आपणच प्रश्न विचारीत नि आपणच उत्तर देत तो मोपला ऐटखान ज्यास आपण त्या सभेत कालिकतला पाहिला होता-सुमतीचे मनोरंजन करीत होता ! पाण्यातून काढलेल्या त्या जाळ्यात तडफडणाऱ्या माशाचे, चांगला मासा हाती लागला म्हणून आनंदाने गायले जाणारे कोळ्याचे गाणे जितके मनोरंजन करते तितके त्या मोपल्याचे बोलणेही सुमतीचे मनोरंजन करीत होते.

गोपूर गाव लवकरच आले. सुमतीस त्या ऐटखानाने एका सत्रंजी आंथरलेल्या, मातीच्या सारवलेल्या भितीच्या खोलीत नेऊन नि तिच्या पुढे काही अन्न ठेवून. पण तिच्यावर सक्त पहारा

बसवून, म्हटले, “मैत्रिणी ! तू शांत होईतोपर्यंत माझ्या हया बंगल्यात रहा. शांत हो, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. मी उद्या येथील ब्राह्मणांस ठार मारून त्यांच्या बंगल्यातच ठाणे देणार आहे. आजचा दिवस येथे काढ. मी संध्याकाळी येईन.” असे म्हणून तो मोपला निघून गेला. सुमती अर्थातच तडफडत होती. अन्न दूरच-पाण्याचा थेंबसुद्धा तिने घेतला नाही. बाबा ! दामू ! भाऊ !” असे म्हणत, आता पुढे काय करावे त्याच्या अशक्य योजना करीत नि त्या अशक्य आहेत असे ध्यानात येताच ग्लान होत, ती संध्याकाळपर्यंत चरफडत बसली.

पण मनाच्या दुःखास दैवाने नैसर्गिक मर्यादा घालून दिलेली आहे. आज दोन दिवसांच्या असह्य घटनांच्या भाराने बधिर झालेले तिचे शरीर नि मन इतके बधिर होत आले की, एकेक मज्जापिड नि एकेक रक्तपिड निश्चेतन होत चालला. अंती झोप म्हणा वा मूर्च्छा म्हणा-तिला आली नि ती निश्चल होऊन निर्वेदन होऊन पडली.

रात्री तो ऐटखान पुन्हा वर आला. तिला गाढ झोप लागली हे पाहून त्याला एक प्रकारचा आनंद झाला. कारण तिचे रडणे, ओरडणे ऐकून त्याचा रसभंग होत असे, तो आता होणार नव्हता. त्याने तिला पोटभरून पाहून घेतले. “ती ब्राह्मण कुलातील, शुचिर्भूत सुंदर-माझ्या सारख्याच्या पिढ्यानपिढ्या पुण्य केले तरी पदरी न पडणारी-कनकलतिका आज माझ्या अगदी हातात आहे ! कितीतरी तिचा ओठ गोड असेल !” असे भावीत तो लवला. त्याने मनसोक्त तिचे मुके घेतले. ‘बरे झाले अशी गाढ झोपेत आहे तेच ! नाहीतर कोण लाथाळी करती !’ असे हसून त्याने तिच्या शेजारी आपला देह पसरला. तिला उराशी घट्ट घेतले. ‘या अल्ला ! तू माझ्या धर्मवीरत्वाचे श्रेय दिलेस ! अल्ला! ही परी मला दिलीस. निःसंशय कुराण ईश्वरप्रणीत आहे. त्यातील वचने सत्य आहेत. इमानदारांस परी मिळेल हे वचन अल्ला ! तू सत्य केलेस ! किती मृदुल हा देह ! असे तो ‘इमानदार’ मोपला भावीत भावीत कामोन्मत्त झाला. त्याने सुमतीला पुन्हा इतके छातीशी लगटून धरले की चिखलात रुतलेल्या कमलिनीसारखी ती दिसेनाशी झाली. रात्रभर अशी रहा-गोड पोरी- जागी होऊच नकोस! असे म्हणून तो तिच्या पदरास सारू लागला. सूर्याच्या किरणानेही न पाहिलेली तिची प्रत्यंगे त्याला दिसू लागली. उत्कट कामाने तो अधिर होऊन त्यासं स्पर्श करू लागला.

तोच “तोबा! तोबा” म्हणून त्याने किकाळी फोडली. पण एकांतात ती कोणी ऐकली नाही. तो दिवा उचलू लागला तो तो कोलमडून खाली पडला...

रात्र संपली. सकाळ झाली. गावात दुसरी एक मोपल्यांची टोळी येऊन दंगा करू लागली. ऐटखानाच्या लोकांनी घाबरून ऐटखानास ही चिंताकारक वार्ता कळविण्यासाठी दार ठोठावले- फोडले- पाहातात काय ? ऐटखान मेलेला पडला आहे नि एक भयंकर नाग आपली फणा सुमतीच्या डोक्यावर छत्राप्रमाणे धरून धरून डुलत आहे. ऐटखानाच्या अंगावर सर्पाचे भयंकर दंश इतके झालेले आहेत की, त्याच्या रंध्रारंध्रांतून विषाने दूषित झालेले रक्त स्त्रवत आहे !

'नाग !', 'नाग !' म्हणून जिकडे तिकडे बोंब झाली. सुमती त्या दार ठोठावण्यापसूनच आपल्या कालनिद्रेतून थोडी थोडी दचकत होती, ती आता चांगली जागी झाली. पाहाते तो नाग तिच्या पायाला चुटूचुटू चाटीत आहे. " फणींद्र, माझा फणींद्र !" म्हणून सुमतीने त्याच्या अंगावरून हात फिरविला नि तिचे ते गाणे, जे त्या नागास आवडत असे, ते एकदम म्हणू लागली. प्रगाढ झोपेतून उठल्याने तिला वाटले की, आपण आपल्या फुलबागेतच नेहमीप्रमाणे सकाळी फणींद्राशी खेळत आहोत !

इतक्यात ऐटखानास आणि त्याच्यापाशी पडलेल्या त्याच्या सुरीस पाहून आता तिची परिस्थिती तिला पूर्ण आठवल्यामुळे, आपल्या रक्षणासाठी हा फणींद्र-हा-साप-प्यायलेल्या दुधाचे उपकार स्मरून, पाळत ठेवीत माझ्यामागे आला नि अंती जेव्हा मी अगदी निराधार स्थितीत होते तेव्हा या दुष्ट ऐटखानाच्या स्पर्शाने माझे कौमार्य भंग होण्याच्या आधीच माझा सूड घेऊन ऐटखानास त्याने दंश करून ठार मारले. खरोखर सर्पाच्या रूपाने परमेश्वर माझा त्राता झाला; द्रौपदीची लाज ज्याने राखली त्याने माझीही राखिली; तो सर्वदा भक्ताची लाज अशीच राखतो, असा विचार विजेसारखा एकदम सुमतीच्या मनात चमकून गेला !

पण वेडे पोरी जरा थांब ! आपल्या न्यायाच्या कल्पनेला जुळतील तेवढ्याच घटना स्मरणात ठेवून परमेश्वर हा नेहमी न्यायाचा वाली असतो, अन्याय आणि अपाप यांचे रक्षण नि लज्जागोपन तो सर्वदा करतोच करतो, हया मानवी, खुळ्या पण सोयीस्कर समजुतीस इतक्यातच बळी पडू नकोस. अंती परमेश्वर लज्जा रक्षण करीलच करील, हया समजुतीपेक्षा त्या तुझ्या कमरेला खोचलेल्या सुरीवर तू अधिक अवलंबून राहा. वेळेवर ती नुसत्या समजुतीपेक्षा क्वचित अधिक उपयोगी पडेल ! कारण ऐटखान मेला-पण मोपले अजून जिवंत आहेत !

सुमतीच्या मनात वरील विचार विजेसारखा येऊन गेला नाही तोच मोपले खोलीत घुसले होते. तो नाग एखाद्या बेफाम वीरासारखा तुटून त्यावर पडला. दोन-तीन मिनिटांत दोन-तीन मोपल्यांस कडकडून चावून दोन-तीन तलवारीच्या आघातानी तो तुकडे तुकडे होऊन पडला. मोपले सुमतीस बिलगले. तिने सुरी उपसली नि एका कोपऱ्याचा आश्रय घेऊन तिने त्या गडबडीत दोघा तिघा मोपल्यांची पोटे चिरून त्यांस भूमीवर ठार करून पाडिले. आणि स्वतःच्या पोटात ती सुरी खुपसावी म्हणून तिने हात पुढे केलाही - तोच तो धरला गेला. तिने निराश धडपड केली की कसेतरी स्वतःस मारून घ्यावे; पण तिला मरू कोण देतो ? केवळ तेवढ्यातल्या तेवढ्यात तिने एका बिलगलेल्या मोपल्याच्या तलवारीवर डोके मारून घेतले होते, तेव्हा कपाळावर घाव घालून ते थोडे चिरले होते. त्या रक्ताचे ओघळ तिच्या तोंडावर वाहात होते. त्या ठार झालेल्या मोपल्यांच्या पोटातील रक्ताचा चिखल त्या खोलीत झाला होता. त्यातच त्या सर्पाचे तुकडे तळपत होते. किंचित वळवळत होते. जे पाच-सहा मोपले आत घुसून सुमतीस धरून उभे होते, त्यांनी फुलासारखी तिला उचलून, कवळून, तिची सुरी हातातून काढून घेऊन तिला त्या तशा परिस्थितीत त्या रक्ताच्या चिखलातच खाली निजविली !

“फजल ! देखना क्या !” एक मोपला सुमतीचे हात ताणून धरून पायाशी उभे असणाऱ्या आपल्या जोडीदारास म्हणाला. “अरे काल त्या झाडीतच हे पाखरू आपल्या हाती पडावयाचे; पण ऐटखानाने मध्येच घात केला. आता पाहतोस काय? नाही तर त्या मौलवीच्या टोळीचे लोक एकदा का इथे आले की ह्या छबेलीचे हे पेढ्याहून गोड मुके मौलवीच्या ताटात जाऊन पडतील नि आपण पुन्हा मिटक्या मारीत बसू !” असे म्हणत रक्ताचे ओघळ ज्यावरून वाहात आहेत अशा त्या सुमतीच्या गालाचे तो उन्मत्त मुके घेऊ लागला. “अरे यार मेरे वास्ते तो रख !” “माझ्यासाठी ठेव.” असा उच्छृंखल विनोद करीत ते पाच-सहा पशू अत्यंत कामोद्दीप्त होऊन त्या घायाळ कन्येला बिलगले.

समाजाच्या सुव्यवस्थित अवस्थेत त्यांचे मनोविकार मर्यादित दाबात ठेवलेले असतात, म्हणूनच ते बहुधा असंतुष्ट असतात. ज्या राक्षसी प्रवृत्तीच्या माणसांत हे मनोविकार अत्यंत उत्कट असतात त्यांची असंतुष्टताही उत्कटच असते. अशा पाशवी मनुष्यास समाजावर जेव्हा एखादा भयंकर विप्लव गुजरतो, तेव्हा माजणाऱ्या अव्यवस्थेत आपले ते दुष्ट नि तामसी मनोविकार तृप्त करणे सहजच सुलभ होते. नि म्हणूनच भयंकर बीभत्सता नि उच्छृंखल भीषणता हे त्यांच्या ह्या कामी मनोविकारास शामक न होता उलट उत्तेजक, पौष्टिकच होते. त्या रक्ताच्या चिखलात पाडलेल्या, बळाने अवयव दाबून धरलेल्या, घावातून वाहणाऱ्या रक्ताने माखलेल्या त्या निरपराध कन्यकेस भयंकर हाणाहाणी नि मारामारी चालली असता बिलगण्यात त्यांच्या उग्र कामवासना नि इंद्रियोन्माद विरस होण्याच्या स्थळी अत्युत्कटपणे प्रकट होऊ लागला. “अरे यार ! ह्या ह्या सालीने दोन मुसलमान इथे मारून पाडले आहेत. हिचा चांगलाच सूड उगविला पाहिजे ! हं उगव सूड !” असे खो खो हसत नि बीभत्स विनोद करीत त्या नरपशूंनी त्या कन्यकेशी भयंकर बलात्कार करण्यास आरंभ केला. एक-दोन-तीन एकामागून एक ते नरराक्षस ‘उगव सूड!’ ‘उगव सूड !’ म्हणून खिदळत नि ताल धरीत अघोर उपभोग घेऊ लागले. त्या अमानुष भीषणतेने त्यांचे कामविकार अमानुष समाधान पावू लागले.

मनुष्य जातीस केव्हा केव्हा जी बीभत्स कृत्ये करताना लाज वाटत नाही, त्यांची कहाणी मात्र ऐकताना मोठी लाज वाटते ! म्हणून इतकेच सांगणे पुरे की नऊ-दहा नरपशूंनी, पशूंना सुचतही नसतील अशा बीभत्स प्रकारांनी आपल्या इंद्रियोन्मादास त्या कन्येच्या देहाचा नि लज्जेचा बळी घेत बलात्कारावर बलात्कार चालविला.

परंतु आता तो बलात्कार त्या निष्पाप नि निरपराध कन्येवर नव्हता. तर तो त्या तिच्या प्रेतावर होता. कारण ती पोर त्या भयंकर नि क्रूर यातनांनी केव्हाच गतप्राण झालेली होती.

गतप्राण- पण ती पोर एखाद्या धर्मवीराप्रमाणे ‘मारिता मारिता’ गतप्राण झालेली होती. परवा ह्याच वेळेला फुलांच्या माळा गुंफून ती त्या श्रीरंगाच्या मूर्तीस घालण्यासाठी, स्नान करून स्तोत्रे म्हणत जात होती. देवपूजेच्या फुलासारखी पवित्र, सुकुमार नि सुगंधी अशी ती कन्या त्या मार्गाने तशी जात असता तिच्या अंगास स्पर्श करण्यास वायूही संकोच करीत मनात म्हणत होता की,

“अतर्क्य पुण्याचे फल ज्याच्या गाठी असेल अशा कोणा भाग्यशाली युवकास ही स्पर्शाने धन्य करील ते करो!”

परंतु हया एका दिवसरात्रीच्या आत तिच्या दैवी हे कोण भयंकर स्थित्यंतर भोगणे पडले ! आणि का ? तिचा काय अपराध ? कोणाचे तिने काय वाईट केले होते ? हया मोपल्यांचेच राहो-पण तिने हया जगतात कोणाचे काय वाईट केले होते ? सापावर देखील ती प्रेम करीत होती ! सर्पास देखील ती- ज्या हिंदू जातीत जन्माला आली त्या हिंदू जातीसारखी पाळीत होती.

आणि हाच तिचा अपराध-की ती हिंदू जातीतील होती. केवळ इतकाच ! म्हणूनच हा प्रसंग ! तथापि ती मात्र त्या प्रसंगातही न डगमगता हिंदुत्वास पारखी झाली नाही. एखाद्या हिंदू धर्मवीरासारखी हिंदू धर्माच्या नि हिंदू राष्ट्राच्या शत्रूंशी लढत लढत ती मेली. तिच्या त्या सोवळ्या पवित्रतेने, त्या मंजुळ स्तोत्रांनी नि त्या फुलांच्या माळांनी श्रीरंग जितका संतुष्ट झाला नसता त्याच्या शतसहस्त्रपट तिच्या आजच्या हया अशुद्धाने लडबडलेल्या, घावांनी घायाळ झालेल्या, पारोशा बलात्काराने बाटलेल्या बीभत्स अपवित्रतेने तो संतुष्ट होईल. देवालयात शांत निर्विघ्न कालात गोमुखीत हात घालून जे जप करतात, केवळ घंटेच्याच मंजुळ आवाजाहून ज्यांच्या शांततेचा भंग होत नाही अशा निस्तब्ध देवाच्या गाभाऱ्यात डोळे मिटून पंचपक्वान्नांचा नैवेद्य- जो लवकरच स्वतःच्या तोंडात जाणारा आहे तो- जे दाखवितात असे भक्त नि पूजक पुष्कळ आहेत. त्यांची पूजाही परमेश्वरास मान्य होईलच; परंतु त्या जप करणाऱ्या कोणत्याही हिंदू साधूपेक्षा हिंदू धर्मावर नि हिंदू राष्ट्रावर भयंकर आपत्ती कोसळली असता नि कोसळत्या घातक तलवारीच्या गाभाऱ्यात हिंदुधर्माशी एकनिष्ठ राहून शत्रूंशी लढून पडलेली नि बलात्काराच्या बीभत्स घाणीने लडबडलेली ही हिंदू कन्यका कमी पवित्र नाही. छे ! छे ! हिची ही अशुद्धाने लडबडलेली पूजा अधिक शुद्ध आहे. देवास निश्चयाने ती अधिक मान्य आहेर असली पाहिजे. कारण अशा आपत्प्रसंगी, भयंकर राक्षसी अत्याचारात, देवांगणातील पद्मासनापेक्षा रणांगणातील पराक्रमच वेदांचे, देवांचे सतींचे नि धर्माचे रक्षण अधिकच यशस्वीपणे करीत आलेले आहेतर करणारे आहेत. हवनांच्या पिष्ट बलिदानापेक्षा हौतात्म्याचे प्राणबलिदानच देवास कधी कधी अधिक प्रिय असते !

७. एकाच म्हातारीचे दोन नातू कम्बू नि मौलवी!

गेल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे गोपूर गावी सुमतीचा सूड तिच्या पाळलेल्या भयंकर नागाने उगवून तो ऐटखानास दंश करून ठार मारीत असता मौलवीच्या टोळीचे लोक सुमतीचा शोध करीत त्याच गावी येऊन पोचले होते. ऐटखानाची नि मौलवीची अधिकारासंबंधी चुरस लागली होती. दोघेही आपणास खलिफाने कलेक्टर नेमून कुट्टम नि गोपूर हया दोन्ही तालुक्यांवर नेमलेले आहे, असे सांगत. त्यातही हिंदूंना बाटविताना ऐटखान हा शिया पंथाची दीक्षा देई; पण मौलवी सुन्नी पंथाचा असून मुसलमानातील पंथात असलेला परंपरागत भयंकर द्वेष त्याच्या रोमरोमात भरलेला होता. त्याला हिंदू लोक काफर असूनही एकवेळ क्षम्य वाटत; पण शिया त्याला डोळ्यांसमोरही पहावत नसत. शिया हे अलीच्या पुढच्या खलिफास मुळीच मानीत नसल्याने ऐटखान हा खिलाफत राज्याशी कधीही प्रामाणिक राजनिष्ठा धरू शकणार नाही, असे मौलवी म्हणे.

स्वराज्य म्हणजे खिलाफत राज्य नि एकी म्हणजे सर्व हिंदूंस बाटवून सर्वांची एक मुसलमान जाती करणे अशी जी व्याख्या केली, तिचीच पुढची आवृत्ती मौलवीने काढून खिलाफती राज्य म्हणजे सुनी मुसलमानांचे राज्य नि एकी म्हणजे सर्व हिंदूसच नव्हे तर सर्व शिया मुसलमानांना काफर नि दांभिक म्हणून नामशेष करून एक सुन्नी मुसलमान तेवढा अस्तित्वात ठेवणे अशी नवीन व्याख्या केली. कुट्टम गावाचा अधिकार त्या रात्री त्याच्या हाती येताच त्यास सुमती गोपूर गावच्या मार्गाने पळाल्याची बातमी लागली. तेव्हा ऐटखानाविषयी त्याच्या मनात धुमसत असलेल्या द्वेषाग्नीत तिसरी नि अत्यंत ज्वालाग्राही अशा मत्सराच्या दारूची आहुती पडून त्याने ऐटखानाचा सत्यानाश करण्याची सिद्धता केली. त्याच्या अधिकाराशी स्पर्धा करणारा, शिया असून खिलाफत राज्यात अधिकारी होऊ इच्छिणाऱ्या काफरास शिया पंथाचे मुसलमान बलात्काराने करून खिलाफतीचे शत्रू वाढविणारा नि सर्वांत अक्षम्य अपराध म्हणजे सुमतीस आपल्या तावडीतून निसटून जात असता स्वतःच मध्ये गडप करण्याचे धाडस करण्यास न चुकणारा हा ऐटखान नि त्याचे अनुयायी हयांचा नाश करण्यास कुट्टम गावाहून निघून मौलवीची टोळी गोपूरावर एकाएकी येऊन आदळली. ऐटखानास त्या सुमतीच्या प्रामाणिक सर्पाने ठार करून टाकल्याने मौलवीला फारसा अडथळा न होता तो मारीत, कापीत, वाट काढीत मुख्य ठाण्यास म्हणजे ऐटखानाने सुमतीस ज्या खोलीत ठेवले होते तिथे येऊन पोचला. तो आल्याची बातमी येताच ते ऐटखानाच्या टोळीतील फाजल नि इतर नरराक्षस सुमतीच्या प्रेतास त्या अधम भीषणतेत तसेच टाकून पळून गेले. देव पूजेच्या फुलमाळेसारिख्या पवित्र, सुकुमार नि देवार्ह अशा त्या सुंदर कन्येचा तो देह त्या बीभत्स नि अतिघोर अत्याचारास बळी पडलेला पाहून मौलवीसही त्या पापी मोपल्यांचा तिटकारा आला. मानवी स्वभावाचे निरीक्षण करणारास ही गोष्ट माहीत आहे, की मनुष्य स्वतः अनेक वेळा जे पाप सहज करतो ते दुसऱ्याने केलेले पाहिले किंवा ऐकले म्हणजे तो त्या कृत्याचा मनापासून घोर निषेध करण्यास प्रवृत्त होतो. त्यातही फाजल इत्यादी

मोपल्यांच्या त्या बलात्कारास इतर सर्व बलात्काराहून घोरतम ठरणारी जी मुख्य गोष्ट होती ती ही, की, तो बलात्कार मौलवीने केलेला किंवा अनुमोदिलेला नव्हता, आणि त्यातही त्यास सुमती बळी पडलेली ! की जिच्या प्राप्तीच्या आशेने मौलवीचा मोपल्यांच्या बंडातील अर्धा अधिक भाग उत्तेजित झालेला होता ! तेव्हा साहजिकच मौलवीचा कोप अनावर होऊन तो आपल्या टोळीतील प्रमुखांपैकी हसनला म्हणाला, "हसन ! हा केवढा सैतानीपणा की असले नरराक्षस बरोबर घेऊन हा ऐटखान खिलाफती राज्याच्या निष्कलंक कीर्तीस, मला वाटते, हेतूपुरस्सर काळिमा लावीत फिरत होता !"

"सरकार, हा या पवित्र ब्राह्मण छोकरीवरील अत्याचार इतका भयंकर आहे की, मला वाटते कोणताही खरा मुसलमान असले भयंकर कृत्य करणार नाही."

वजीर की ज्याने कुट्टमला झालेल्या दंग्यात एका रात्रीपूर्वी स्थूलेश्वरशास्त्र्यांच्या मुलीवर नि बायकोवर त्यांच्या आईबापादेखत इतकाच घोर बलात्कार केलेला होता, तो म्हणाला, "छे ! जो असले पापकर्म करितो तो जातिवंत मुसलमान नव्हे!"

"अगदी बरोबर !" एक मध्येच घुसून त्या दाटीत उभा राहिलेला फकिरासारखा मुसलमान म्हणाला, "वजीर हे तत्व जर तुला कुट्टमच्या दंग्याच्या रात्री कळले असते तर मलबारात आजकाल उतास आलेली जातिवंत मुसलमानांची संख्या एका आकड्याने आणखी कमी होती."

"हा ऐटखानाच्या टोळीतील मुसलमान असावा ! पाजी कुठला," हसन रागाने फुत्कारला.

"हा शिया मुसलमान असावा." अब्दुलने आक्षेपिले.

"हा मुसलमानच नसावा," महंमद वेडा म्हणाला.

"मी ऐटखानाच्या टोळीतील नाही नि मी मौलवीच्या टोळीतीलही नाही. मी शिया मुसलमानही नाही नि तुम्ही समजता त्या अर्थाने सुन्नी पण नाही. आणि तुम्ही हया बंडाच्या आरंभापासून जी अमानुष कृत्ये आचरिता आहा तीच जर मुसलमानी धर्माची शिकवण असेल तर मी मुसलमानही नाही. मी त्या टोळीतील आहे की जिचे मुख्य पैगंबर महम्मद (ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती नि धन्यता देवो !) हे आहेत, जी कुराणास पवित्र पुस्तक मानीत असताही मानव जातीवर ती शिकवण बलात्काराने लादणे पाप समजते नि जी मनुष्य मुसलमान आहे की हिंदू आहे हे पाहाण्याच्या आधी तो मनुष्य आहे की नाही हेच परमेश्वर पाहील असे मानते ! हिंदू लोकही मनुष्यच आहेत. त्यांच्यावर हा बलात्कार- हे अत्याचार !"

"हा काफराच्या वतीने बोलतो, हे काफर हिंदू लोक इंग्रजांची नौकरी करीतात!"

"इंग्रजांची नौकरी मुसलमानही करीतात! तुर्कांच्या विरुद्ध हजारो मुसलमान लढले. मग जर हिंदू इंग्रजांची नौकरी करीतात म्हणूनच केवळ त्यास तारता नि देवळे पाडता तर मग मुसलमानांच्या मशिदीही का पाडीत नाही ? अहो ! पहिल्याने हे सांगा की, इंग्रजांची नौकरी करण्यापासून हिंदूस परावृत्त करण्याचे कार्य साधण्याकरिता का तुम्ही त्यांच्या निरपराध नि निष्पाप कन्यांच्या पातिव्रत्याचा आपल्या कामाग्नीस बळी देता ? तुम्हास अल्लाची शपथ आहे !

सांगा, ह्या अत्याचारांची अल्ला तुम्हास क्षमा करील काय ? मी मुसलमान आहे म्हणून मी तुम्हास विचारतो, तुमचे कुराण हेच शिकविते की काय ?"

"अर्थात रे बेवकूफ ! अल्ला इमानदारांचे हजार अपराध क्षमा करील. अल्ला बडा रहीमदील आहे ! पण तू कुराणाचे तोंडही पाहिले नसावेस. नाही तर हया जिहादीतल्या धर्मयुद्धातल्या कृत्यास पाप म्हटले नसतेस ! मूर्खा ! जिहादीत अमुसलमानी सर्व सत्ता- घरे, दारे, बायका, मुले- ही मुसलमानांची धर्मसंपत्ती होते. अध्याय चवथा आयत ५ काय सांगते ? एक तू कुराण वाचले नाहीस, नाही तर तू कोणी तरी सूफी किंवा बाबी किंवा अशाच कोणा तरी मुसलमान म्हणवून घेणाऱ्या दांभिक पक्षातील असावास. नाही तर तू शिया तर आहेसच !"

"तू शिया आहेस ! तू बाबी आहेस ! तू सुफी आहेस !" अशी मौलवींच्या टोळीतून एकच आरोळी उसळून दगडमार सुरू झाली. ऐटखानाच्या टोळीतील जे शिया होते त्यांना हा अपमान सहन न होऊन तेही मौलवीच्या लोकांवर तुटून पडले. घटकाभर मुसलमानांच्या त्या दोन पक्षात खूपच चढाई जुंपून कित्येक मोपले ठार झाले, कित्येक घायाळ होऊन विव्हळू लागले. ऐटखानाच्या मूत्यूने त्यांची शिया टोळी विस्कळीत झाली असल्याने ती लवकरच दशदिशास जीव घेऊन पळू लागली. दगडाच्या वर्षावाखाली तो फकीर घायाळ होऊन पडला. पण मारामारीच्या अवसानात पुन्हा एकदा उठून उभा राहिला नि आपल्या उंच गंभीर आवाजाने तशाही स्थितीत सर्वत्रांची चित्ते आकर्षण करून म्हणाला, "बंधूनो ! मुसलमानीं धर्मावर तुमची ही आततायी कृत्ये जो काळिमा आणीत आहेत, त्यांचा शक्य तितका प्रतिकार करीत असता तुम्ही मला काफराचा वकील म्हणून टोमणे मारलेत! निरपराध हिंदूंच्या मानेवर चालविण्यासाठी जी आततायीपणाची तलवार तुम्ही मी नको नको म्हणत असता उपसलीत तिनेच आता तुम्हीही एकमेकास मारू लागलात ! आततायीपणाची तलवार जो दुसऱ्यावर उगारतो तो स्वतःच तिच्या वाराने मारिला जातो ! अजून तरी हे ध्यानात धरा की, रामरहीम एक आहे- अजून तरी"

हे शब्द तो मुसलमान साधू उच्चारतो आहे तोच "हरामी ! ए हरामी, सैतान और अल्लाको यह बदमाष एक समझता है !"

"अल्ला रहिमको सरकतदार, जोडीदार बनाता है ! मारो !" असा एकच गलबला उठला नि दोन-तीन दगड एकदम त्याच्या कानशिलात बसून त्याचे डोके नारळासारखे ताडकन फुटले. त्याचा मज्जा बाहेर पडला नि तो मुसलमान साधू ठार होऊन खाली कोसळला.

"अल्ला हो अकबर !" म्हणून मौलवीने गर्जना केली.

"अल्ला हो अकबर !" म्हणून मोपल्यांनी साथ दिली.

ऐटखानाच्या टोळीची वाताहात झाली. गोपूर गावचा- नव्हे खिलाफती राज्याच्या परिभाषेत गोपूर तालुक्याचा अधिकार आपल्याकडे घेऊन मौलवी परत कुट्टमकडे येण्यास परतला. परंतु सुमती गेल्याने त्याच्या हृदयास खिन्नता आली होती. इतकेच नव्हे; तर त्या बंडातील सर्व

अद्भुतरम्यता मावळून ते एक रुक्ष कर्तव्य झाले आहे असे त्यास उदास वाटू लागले. इतक्यात अर्ध्या मार्गावरच महंमद वेडा पुन्हा धापा टाकीत येऊन म्हणाला, " सरकार, सुमती जिवंत आहे!"

"मूर्खा," मौलवी त्रासून म्हणाला, "ती मेलेली मी आता प्रत्यक्ष पाहिली."

"सरकार, तर मग ती जिवंत झाली आहे ! अल्लाची शपथ ती मरून जिवंत झाली आहे ! ती पहा त्या दरीत आहे-"

पण हा म्हणतो तरी काय ! न जाणो क्वचित भलतीच आशा मनात येऊनही ती प्रदर्शित केल्याने ती खोटी ठरली असता होणाऱ्या उपहासाने भीतीमुळे मौलवी मनातही तिचा उच्चार न करता म्हणाला- "अरे, बघा तरी, वेडा कोणा पोरीस पाहून हे बडबडत आहे !"

दरीकडे काही लोक गेले. मौलवी पहात राहिला. तो "हे काय खरोखरच सुमती की काय ?" त्याच्या हृदयात चर्र झाले. ते लोक दरीत दडून बसलेली ती पोर पुढे पुढे ढकलीत जो जो जवळ आले तो तो ती सुमती नसावी असे मौलवीस वाटू लागले. पण आता त्याची निराशा मुळीच तीव्र नव्हती. हया पोरीच्या तोंडवळ्यात नि अंगलटीत असे काही आकर्षण होते की, त्याने सुमतीच्या इच्छेची बरीच तृप्ती होऊ शकावी. जवळ येताच महंमद वेडा खो-खो हसून म्हणाला, "सरकार ! अहो, ही ती लक्ष्मी ! हरिहराचा पाय तोडून जिला मी पकडणार होतो ती ही. पकडलीच की नाही अखेर!"

"चूप बैस मूर्खा ! हिला तू सुमति म्हणून समजण्यास काय कारण झाले ?" मौलवी राग दाखवून म्हणाला.

थरथर कापलेसे दाखवून महंमद म्हणाला, "ज्या कारणाने तुम्ही हिला कुट्टम गावी सुमती म्हणून रात्री समजलेत त्याच कारणाने मीही हिला गोपूर गावी दिवसाउजेडी सुमति म्हणून समजलो."

लक्ष्मी खरोखरच सुमतीची जवळ जवळ प्रतिमाच असल्यासारखी दिसे. चारी वेद मुखोद्गत असणाऱ्या चिंतामणशास्त्री हयांच्या पवित्र कुळात तिचा जन्म असल्याने, उंच असलेले फळ उडी मारून तोडता आले म्हणजे ठेंगू मनुष्यास जसे सहजच एक प्रकारचे मत्सरी समाधान वाटते, तसे सुमतीसारख्या ब्राह्मण कन्येस भ्रष्टवून स्वतःच्या उपभोगासाठी ठेवण्याचा मौलवीचा जो एक हेतू. तोही लक्ष्मीच्या प्रीतीने पूर्ण होताच, मौलवीस समाधान वाटले नि त्यायोगे मौलवीची उदासीनता बरीच कमी झाली. धर्मवेडेपणाचा अघोरी उत्साह त्याच्या मनात पुन्हा सळसळू लागला. त्याने त्या दीन नि संकटामधून संकटे सोशीत वनवासात, अपमानात नि निराशेत त्राही त्राही झालेल्या कन्येस हाताने धरून तिच्या हनुवटीस स्पर्श करून, "तू निर्भय हो ! मी तुझ्या मनात जे काय असेल तशी व्यवस्था लावून देईन !" असे आश्वासित तिला त्याने आपल्या गाडीत बसवून घेतले. क्षीणशक्ती, भग्नाशेने जिच्या अंगात प्रतिकार करण्याचे सामर्थ्य लवलेशही उरले नव्हते; अशी ती म्लान कुसुमासारखी दिसणारी कन्यका गुपचूप तिथे बसून राहिली. आणि तशा स्थितीत मोठा दसहत्यारी धर्मवीर असता तरी आणखी काय काय करणार होता ?

मौलवी आपल्या टोळीसह कुट्टमला आला. अवघ्या तीनचार दिवसांत हया कुट्टमचे हे केवढे स्थित्यंतर! त्या नारळी-पोफळीच्या बनात जी घरे होती त्यांतून आता मंजुळ घोष ऐकू येत नव्हते. त्या रात्रीच्या मारामारीत पडलेले रक्त अजून घरातील वाटेवरील भूमीवरून पुसले गेले नव्हते. हरिहरशास्त्री हयांच्या घरात मौलवीने आपले सरकारी मुख्य ठाणे दिल्याने त्यास कलेक्टरचा बंगला म्हणण्यात येऊ लागले. स्थलेश्वरशास्त्री-ज्यांना अंगणात अस्पृश्य हिंदू आला असता, मुसलमान आला तर अधिक भ्रष्टाकार तो काय होणार, म्हणून वाटत असे, त्या स्थूलेश्वरशास्त्री हयांच्या घरात मौलवीच्या अधिकाऱ्यांसाठी नि सेनेसाठी मासाचे स्वयंपाकगृह उघडण्यात आले होते. चिंतामणशास्त्री हयांची ती पवित्र वेदशाळा- जेथून चारी वेदांचे अस्खलित पठण ऐकू येई, तेथे आता कसायाच्या तलवारी पाहून थरथर कापणाऱ्या गाईचे मुत्यूसमयीचे हंबरडे ऐकू येऊ लागले. ज्या पेल्यात पाणी घेऊन ब्राह्मणांनी काल संध्या केली, त्याच पेल्यातून आज मोपला लोक दारू पीत होते. तिकडे श्रीरंगाच्या देवळात सर्व रात्रभर लढत ज्या धर्मवीराने त्या देवळाचे संरक्षण केले होते, तो कम्बू सकाळी भयंकर घाव लागून शत्रूच्या हाती पडल्याने ते देऊळ मौलवीच्या हाती आले होते. त्यातील श्रीरंगाची सुंदर मूर्ती काढून टाकून तिथे मुसलमानी मशिदीप्रमाणे तीन पायऱ्या घातल्या होत्या. त्या देवळावरील हिंदू ध्वज उपटून हिरवा नि तुर्की ध्वज तिथे लावला होता. ते भ्रष्ट काफरांचे देऊळ “इमानदार” सत्यधर्म हयांच्या प्रार्थनेस योग्य व्हावे म्हणून एक तरुण, गाय मारून तिचे रक्त त्या देवळात जिकडे तिकडे, मूर्ख काफर गंगोदक शिपडतात तसे शिपडून शुद्ध करीत होता. हया शेवटच्या संस्कारानंतर हे सांगावयास नकोच की, मौलवीच्या स्वतःच्या प्रार्थनेस जितकी पवित्र असली पाहिजे तितकी ती मशीद पवित्र झालेली होती. सर्व गावातून हिंदूंच्या घरांची तीन दिवस लूट होऊन ते सर्व सामान धर्म-युद्धातील (?) गनीमत म्हणजे न्याय्य लूट म्हणून मोपला वीरात वाटली जात होती. ब्राह्मणांच्या, नायरांच्या नि वाण्यांच्या घरातील उत्तम घरे मोपल्यांतील सरदारास पारितोषके म्हणून देण्यात येऊन तेथील ते पूर्वीचे काफर धनी चोरासारखे सर्व एका बंदिगृहात नेऊन कोंडलेले होते; ज्या पाण्याच्या तलावाच्या दीडशे फुटाच्या आत हिंदू कम्बू-महार येऊ शकत नव्हता, त्या तलावात, तो कम्बू हिंदू धर्मसंरक्षणासाठी लढून घायाळ होऊन पडला असता, त्याच्या काठावरून जे मुसलमान गेले असता तो विटाळत नसे, त्या मुसलमानांनी गायींच्या रक्ताचा सडा शिपला, त्यातील जलाशयाला खिलाफत राज्याच्या अधिकाऱ्यांनी पिण्यास पात्र केले होते. जे हिंदू लोक बंदिगृहात होते, त्यास हेच पाणी पुरविण्यात येई. आणि ते वाटण्याच्या कामावर कोण नेमले गेले होते? - श्रीयुत क्षत्रियकुलावतंस सीताराम नायर ! की ज्यांनी तलावाच्या दीडशे फुटांच्या आत आल्याच्या संशायावरून कम्बूस धोंडा मारला होता !’

कुट्टमचे असे भयंकर स्थित्यंतर झाले होते. परंतु त्या स्थित्यंतरावर भीषणतम कळस तर अजून चढावयाचाच होता. त्या स्थित्यंतराचे मर्म तर अजून व्यक्त व्हावयाचे होते.

तो कळस आज चढणार ! ते मर्म आज व्यक्त होणार ! कारण आज त्या सर्व बंदिवानांचा न्याय होणार आहे. ते हिंदू म्हणून जगले नि मुसलमान मोपल्यांनी खिलाफत राज्य स्थापन केल्यानंतर ते मागतील ती वस्तू त्यास न पुरविता, आपल्या घरास, बायकोस नि मत्तेस आपलीच समजून अजूनही हिंदू म्हणूनच जगत आहेत ह्या घोर अपराधाचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता.

देवपूजेसाठी जिथे बसून सुमती माळ ओवीत असे, त्या बागेच्या मैदानात एका उंच आसनावर मौलवी बसला. पाय टेकण्यास एक पायपीठ होते, ते कशाचे ? तर त्या श्रीरंगाच्या सुंदर मूर्तीस छिन्नविछिन्न करून पालथी पाडून तीवर घातलेल्या एका मऊ गादीचे. त्या पायपीठावर पाय ठेवून मौलवीने "न्यायास सुरुवात करा" म्हणून सांगितले.

न्यायासाठी त्या प्रांतात प्रख्यात असलेला मोपल्यांचा जो पुरोहित वर्ग आहे नि ज्यांस ते थंगल म्हणतात त्यापैकी एकास आणविले होते. मौलवीची आज्ञा होताच बंदिगृहातील हिंदू बंदिवानांच्या झुंडी तेथे आणण्यात आल्या. थंगल म्हणाला, "अल्लाच्या भक्तांचा जयजयकार असो! मलबार मध्ये खिलाफत राज्य स्थापन झालेले आहे. लवकरच ते सर्व पृथ्वीवर स्थापन होणार आहे. हया राज्यात सर्व पाखंड मूर्तिपूजा नि महंमद पैगंबर (अल्ला त्यांच्या आत्म्यास शांती नि धन्यता देवो.) हयांच्या वचनास न मानणाऱ्या नास्तिक त्रयीचे बीज देखील उरू देऊ नको, म्हणून कालच मला अल्लाचा दृष्टान्त झाला आहे. अहो अविश्वासीहो ! जरा वर बघा ! बघा बघा, आकाशाच्या मध्यावर काळीशी रेघ ! ते फाटले ! -या अल्ला ! क्या खुबसुरती !' असे म्हणत तो थंगल आकाशावर दृष्टी रोखून हसत हसत निश्चल नि तन्मग्न होऊन बसला. सर्व सभा चकित झाली. जो तो आकाशाकडे बघू लागला. इतक्यात वेडा महंमद म्हणाला,

"ओहो ! आकाशाच्या बरोबर मध्यावर केवढी तरी ही फट !"

डोळे आश्चर्याने विस्फारित करून थंगल म्हणाला, "काय तुला दिसली ती फट ? मौलवी ! हा पुण्यवान मनुष्य आहे ! ह्यास एका बाजूला काढा! बरे ! त्या फटीतून तुला कशी कोणती सुंदर वस्तू डोकावताना दिसते आहे?"

महंमद झटकन म्हणाला, "अंधःकार !" तितक्याच झटकन स्वतःस सावरून थंगल म्हणाला, "मौलवी हा पापी मनुष्य आहे. हयास बाहेर घालवा. हयाला प्रथम पुण्याईने थोडीशी दिव्य दृष्टी येताच गर्व झाला म्हणून अल्लाने त्याच्या डोळ्यांवर अंधेरी आणली ! अल्ला समर्थ आहे !"

"ओहो ! ओहो ! क्या खुबसुरती !" थंगल अत्यंत गंभीर आनंदाने नि तन्मय मुद्रेने पुन्हा पुन्हा आकाशाकडे पाहात म्हणाला. कोणाचीही, "कुठे काय ते ? आम्हांस तर दिसत नाही." असे म्हणण्याची छाती होईना. थोड्या वेळाने "अल्ला तू धर्मवीरांवर किती प्रसन्न आहेस," असे भक्तिभराने म्हणून थंगल पुढे बोलू लागला.

"आता जो दृष्टान्त मला झाला तोच हे मुसलमानहो, तुम्हा सर्वांस होऊ शकेल. मला काय दिसले माहीत आहे ?"

अत्यंत उत्सुकतेने ते विश्वासनिष्ठ शेकडो मोपले म्हणाले,

"नाही आचार्य !"

"सांगू तुम्हाला ?"

अत्यंत अधीरतेने ते चमत्कारलोलुप मोपले म्हणाले, "सांगावे ! आम्ही पाया पडतो; सांगावे आचार्य !"

"मला परी दिसल्या ! त्यांच्या हाती काय होते? स्वर्गफुलांच्या माळा ! त्यांचे डोळे कसे होते?

हया कुराण शरीफच्या अध्यायात सांगितले आहे तसे; काळेभोर नि लांब भिवया. त्या माळा, त्या परी मोपला वीरांच्या गळ्यात घालण्यास आलेल्या आहेत. धर्मयुद्धात जे मरतील त्यांच्या गळ्यात आजच हया माळा पडतील. धर्मयुद्धात जे जिकतील त्यांच्या गळ्यात भोगाच्या माळा हया जगात आणि परीच्या आलिंगनाच्या माळा त्या जगात ! हे धर्मवीरास फळ आणि काफरास ? तोबा तोबा !"

"तोबा ! तोबा !" अंगावर शहारे उठून मोपले उद्‌गारले.

"ईश्वरावर नि पैगंबरावर जे विश्वास ठेवणार नाहीत ते काफर-ह्यांत सांगितल्याप्रमाणे त्यास काय फळ ? भयंकर नरकाग्नी तापलेला, त्यात निवास ! पू नि दुर्गंधी, सडलेले पदार्थ ज्यात मिसळले आहेत-तो पू पिण्यास ! केस धरून फरफटत नेण्यात येईल. मग ते पश्चात्ताप करितील; पण ईश्वर त्यांचे तोंडसुद्धा बघणार नाही; मग, पश्चात्ताप मान्य होणार नाही ! कुराण शरीफमध्ये हे स्पष्ट सांगितले आहे ! तोबा, तोबा ! म्हणून हे काफरहो, हे बंदिवानहो, मी तुम्हांस अल्लाच्या हुकमाने सांगतो की, तुम्ही जर हया नरकाग्नीपासून स्वतःचा बचाव करू इच्छित असाल तर आतांच्या आतां मुसलमानी धर्म स्वीकारा नाही तर मरण हया जागी नि नरकाग्नी त्या जगी ! हेच तुमचे पारितोषिक- बोला; काय ते ?- आज न्यायाचा शेवटचा दिवस आहे ! आज संध्याकाळच्या आत खिलाफती राज्यात एकही काफर जिवंत राहणार नाही. हया खिलाफती राज्यात संध्याकाळच्या आत सर्व देश मुसलमानामय झाला पाहिजे ! हं ! आणा पहिली टोळी !"

पन्नास नंग्या तलवारी घेतलेले मोपल्यांचे वर्तुळ उभे राहिले. ते एका बाजूस थोडेसे उघडले; पंचवीस हिंदू बंदिवानांची टोळी त्यात शिरली. ते वर्तुळ पुनः बंद झाले.

दीन नि स्फुंदून स्फुंदून रडणाऱ्या म्हाताऱ्या; नीच अधमांच्या दांडगाईने ज्यांची लुगडी फाटून गेली आहेत, ज्यांची लज्जा हरण केली गेली आहे, अशा अधोवदन कुमारिका; आपल्या बापादेखत त्या निलर्ज्ज अवस्थेत अर्धनग्न, अर्धभ्रष्ट स्थितीत रहावे लागल्याने मेल्याहून मेल्यासारखे झालेल्या मुली नि आपल्या मुलीच्या नि स्त्रियांच्या मानाचे नि जीवनाचे आपल्या डोळ्यांदेखत मातेरे झालेले पहावे लागल्याने आपल्या पुरुषत्वाची किळस वाटून वर बघण्यासही संकोचणारे बाप; स्तनांशी मुले धरून उभ्या स्त्रिया नि वृद्ध आजाआजींचे हात धरून उभी राहिलेली मुले; सर्व थरथर कापत त्या तलवारीच्या वर्तुळात, कसाईखान्यात गायी जातात, त्याप्रमाणे, रडत, ओरडत, स्फुंदत ढकलली गेली.

“बोला, मुसलमान होता की नाही ?”चार दिवसपर्यंत ज्यांस बंदिखान्यात खाण्यापिण्याविषयी त्रास देत देत सतावून सोडलेले होते. क्षीणशक्ती, क्षीणभक्ती अशा त्या लोकांतून उत्तर काहीच उठले नाही. “बोला, मुसलमान होता की मरता ?” एक नि सर्वांचे प्रथम उत्तर आले “मरतो.”

तो कोण ? तो कम्बू होता. श्रीरंगाच्या देवळासाठी अखेरपर्यंत लढून तो घायाळ होऊन बंदिवान झालेला होता.

त्या टोळीत तो एक नि सर्वांच्या प्रथम म्हणाला, “मरतो !”

त्या टोळीत तो एक नि सर्वांच्या प्रथम ठार मारला गेला.

त्याचे मरतो म्हणून उत्तर येताच इतरांस हिंदू धर्म न सोडल्यास काय भयंकर प्रसंग गुदरतोय याचे प्रत्यक्ष उदाहरण दाखविण्यासाठी थंगलाने त्यास एकदम बाहेर आणविले. शेजारीच एक विस्तीर्ण विहीर होती. हिच्या पाण्यातूनच पाणी काढून सुमती आपल्या फुलझाडांस घालीत असे- त्या विहिरीच्या काठावर त्यास आणिले; मुसलमान होत नाही असे म्हणत असताही त्याच्या डोक्याचे सर्व केस काढण्यात आले. त्यास फरफटत इकडे तिकडे ओढून तलवारीने चिरण्यात आले. नि त्याचे प्रेत-धड नि अर्धे तुटलेले शीर-विहिरीत ढकलून “अल्ला हो अकबर” म्हणून धर्मवीरांनी एकच गर्जना केली !

कम्बूचा तो भयंकर शेवट पाहून त्या टोळीतील इतर कोणीही हो ना काहीच केले नाही. तेव्हा मुक्या पशूंप्रमाणे त्यास विहिरीच्या काठावर नेण्यात आले, त्यांचे मुंडण करून त्यास शिखाभ्रष्ट करण्यात आले नि मुसलमान झाल्याची खूण म्हणून गोमांस देण्यात आले. कोणी त्यास हात लावीना. तेव्हा थंगल शांतपणे म्हणाला, “कोंबा ते त्यांच्या तोंडात. अज्ञान्यांस, पाप्यांस नि मुलांस बलात्कारानेही ज्ञान, पावित्र्य नि औषधी पाजली जावी. मग त्या सर्वांचे कपडे उतरवून त्यात जे पुरुष नि मुलगे होते त्यांना समोर तलवारी रोखून, चूप बसवून, आपापली गुह्यांगे उघडण्यास सांगितले गेले. क्रूर मौलवी हातात तीक्ष्ण सुरी घेऊन पुढे झाला. दुसरा कुराण घेऊन पुढे आला. कुराणाचे मंत्र वाचले गेले नि सपासप त्या दीन दुबळ्या हिंदूंच्या गुह्यागांची कातडी जशी सापडली तशी त्या सुरीने चरचर कापण्यात आली. “हाय हाय” म्हणून आगीने नि घावाने चरफडणाऱ्या त्या टोळीस सांगण्यात आले, “अल्लास प्रिय असणाऱ्या पैगंबराच्या आज्ञेनुसार तुमची आता सुंता झाली आहे! आता तुम्ही मुसलमान झाला आहात. आता धर्माने चला. स्वर्ग तुमचा आहे. पण जर का पुन्हा हिंदूंत मिसळू पहाल किंवा त्यांच्याशी संबंध ठेवाल तर मुसलमानी धर्मापासून तुम्ही पदभ्रष्ट झालात असे समजून तुम्हास धर्माज्ञेप्रमाणे ठार मारण्यात येईल.” नंतर त्या सर्वांस मोपले लोकांची खूण म्हणून, स्त्रियांस नि पुरुषांस तदनुरूप मोपला वस्त्रे देण्यात आली नि पुरुषांस नि स्त्रियांस वेगवेगळे करून उभे करण्यात आले.

“दुसरी टोळी !” थंगल गर्जला.

लगेच त्या तलवारीच्या वर्तुळात दुसरी पंचवीस-तीस हिंदूंची टोळी आणविण्यात आली; नि कोंडली गेली. तीत एक थिय्या एकदम रागावून शेजारच्या एका म्हातारीस दूर ढकलून म्हणाला,

"थेरडे, तू जातीची मसकुनि डोंब ना ? नि मला महाराला शिवतेस ? दूर !" हे पाहून ती मशाल घेऊन हिंदूंची घरे जाळीत फिरणारी मोपला कृत्या खो-खो हसून म्हणाली, "मेल्यांनो, अजून तुमचे डोळे उघडत नाहीत ? अरे तुम्हा हिंदूस दिसावे म्हणून मी ही मशाल दिवसादेखील पेटवून फिरते, पण तुम्हांस अजून दिसत नाही ! मेल्यांनो, मुसलमानांच्या बंदिगृहात, राज्यात, लाथेखाली तुडविले गेलेत, गार्यींच्या रक्ताने भरलेले माझे हात मी त्या तलावात धुऊन ते पाणी तुम्हांस पाजविले, तुमचा विटाळ नि शिवाशिव अजून गेली नाही ! महाराला डोंबांचा विटाळ ना ? अरे, जिवंत असताना तर तुम्ही हिंदू म्हणून कधीही एक जाती म्हणून एकत्र झाला नाहीतच-पण मेल्यांनो, आता हिंदू म्हणून सर्व एकत्रच मरणाच्या तोंडात चिरडले जाता आहां तरी देखील-तेवढ्यापुरते देखील एकत्र होत नाही ना ? मरा मेल्यांनो."

"मुसलमान होता की मरता ?" थंगलने विचारले.

"मी मरतो", "मी मरतो", "मीही पण", "मीही मरतो," दहा-बारा स्वर उठले. थंगल चकित झाला. "काढा त्यांना टोळीबाहेर." म्हणून म्हणाला, त्यात एकजण कण्हत, एकाच पायावर कसा तरी चालत, ज्याला दुसरा पाय मांडीपासून तुटून गेला आहे, त्या घावाने ते क्षत औषधाभावी वर पोटापर्यंत चिडत गेले आहे नि पुवाच्या नि रक्ताच्या ओघळातच ज्याला आज तीनचार दिवस भयंकर वेदना सहन करीत लोळावे लागल्याने अंगास दुर्गंधी सुटली आहे, असा पुरुष प्रथम पुढे आला. तो हरिहरशास्त्री होता. "राम राम" म्हणून तो तोंडाने म्हणत होता.

त्यास पाहाताच आपली मशाल त्यास खिजविण्याकरिता त्याच्या अगदी डोळ्यास चटका बसेल इतकी जवळ नेऊन ती मोपला थेरडी म्हणाली, "रे मूर्ख ब्राह्मणा, कोण ही तुझी नि तुझ्या हिंदू जातीची दुर्दशा ! बघ जिवंतपणी तू पुवात, रक्तात नि नरकात लोळत पडलासर का ? तर मूर्खा, तू आम्हांसारखे कोणतेही अत्याचार, बलात्कार, आग लावणे इत्यादी घोर कर्म केले नाहीस म्हणून ! नुसते वेद घोकलेसर नुसते पुण्य केलेस. पाप असे काही देखील केले नाहीस. म्हणून जिवंतपणी ह्या जगी नरकयातना भोगल्यास. अंगास किडे की रे पडले तुझ्या ! आणि ही मी बघ-हा मौलवी बघ-हा थंगल बघ. कसे धष्टपुष्ट गाद्यागिर्द्यांत लोळत आहो. ह्या जगी-अल्ला नि पैगंबर ह्यावर माझा विश्वास आहे इतके म्हटल्याने स्वर्गसुख भोगणार-पुढील जगीं ! अजून तरी केवळ पुण्याने, केवळ तितिक्षेने, केवळ पोथीच्या पानांवर जगात पोट भरेलच, पुण्याचा वाली परमेश्वर, न्यायाचा जय अंती स्वतः सिद्ध ठेवलेला, इत्यादी खुळ्या कल्पना डोक्यातून गेल्या का? मेल्या, पापावाचून जगात जिवंत राहता येत नाही. दिसलं का हे तुला असे म्हणत त्या थेरडीने ती मशाल पुनः त्याच्या डोळ्यांत खुपसली. हरिहर तो चटका बसल्याने व्याकूळ होऊन पुनः म्हणाला, "राम ! राम ! राम !"

"आता रामच म्हण मेल्या एकदाचा," म्हणून ती निष्ठुर थेरडी खो-खो हसली.

त्या वीर ब्राह्मणास त्याच्या शरीरिक वेदनांहूनही ह्या अपमानाच्या मानसिक वेदना असह्य झाल्या. त्याच्या मागोमाग चिंतामणशास्त्री होता. त्याच्या मागोमाग कम्बूच्या टोळीतील दोघे-तीघे

तरुण थिय्ये होते. कृष्ण नायर वैद्य- जो श्रीरंगाच्या संरक्षणार्थ लढताना घायाळ झालेला होता, तो त्यांच्या मागे होता. त्या तरुण थिय्यास थंगलने हटकून म्हटले- “हे तरुणांनो, ह्या ब्राह्मणांच्या, ह्या क्षत्रियांच्या नादास लागून तुम्ही का विनाकारण मरता? तुम्ही मुसलमान व्हा. ह्या आता बाटविलेल्या हिंदू स्त्रीयांमधून हवी ती तुम्हांस देतो. सुखाने संसार करा - तुम्हांस -” पण त्याचे ते शब्द पुरे होण्याच्या आधीच ते महार तरुण म्हणाले, “चूप रे मूर्खा - आम्हांस एकच बाप होता. तो हिंदू होता. म्हणून आम्हीही हिंदू आहोत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, महार, मांग- आम्ही सर्व हिंदू एकाच बापाची मुले आहोत- आमच्या बापाचे नाव महादेव ! आम्ही सर्व हिंदू एकाच आईची लेकुरे आहोत. आमच्या आईचे नाव हिंदू जाती !”

आणि सर्व एकमेकांच्या गळ्यात हात टाकून नि त्या घायाळ ब्राह्मण वीरास मध्ये घालून “हर हर महादेव” म्हणून गर्जना करून उठले. ब्राह्मण, क्षत्रिय, महार, डोंब सर्व जातगोत विसरून एकच जयजयकार करिते झाले. “हिंदू जातीकी जय ! जय हिंदू जातीकी जय !”

त्या अकस्मात प्रदीप्त झालेल्या हौतात्म्याच्या दीप्तीने अकस्मात गाढ अंधःकारात वीज चमकावी त्याप्रमाणे मोपल्यांसही क्षणमात्र दिपवून सोडले. ती मोपला कृत्या जरा तिरस्कारपूर्ण हसून नि नको असताही तिच्या मनात वाटणाऱ्या समाधानाची कुचेष्टा करून गुरगुरली, “शिकले मेले अखेर एकत्र मरायला ! पण हिंदुजातीचा जय नुसते मरताना एकत्र मरून होणार नाही. जसे आता एकत्र मरण्यास शिकला आहा; तसे, जेव्हा हिंदू एकत्र जगावयास शिकाल; तेव्हा मग जयाची गर्जना करा. मरताना जयाची गर्जना, मेल्यांनो, तुमची विटंबना मात्र करीत आहे.”

“नाही,” हरिहरशास्त्री गर्जून म्हणाला, “विटंबना नाही. तू म्हणतेस ते राक्षसी सत्य आहे; परंतु हे आमचे एकत्र मरणच हिंदू जातीस एकत्र जगावयास शिकवील; एकत्र जिंकावयास शिकवील.”

“जानकीजीवन, राम ! राम ! पतितपावन राम राम ! । राम ! ते वीर ताल धरून भजन करू लागले. त्यांस त्या विहिरीवर नेण्यात आले. ते तलवारी उपसलेले मोपले त्या निःशस्त्र बंदिवानांवर तुटून पडले. कचाकच तलवारीचे घाव चालले, जिथे पडेल तसा पडेल. हरिहरशास्त्री यांचे अर्धे मस्तक चिरून खाली पडले.

“जानकीजीवन राम ! राम ! पतितपावन राम! राम !”

अर्धे मस्तक अर्ध्या कंठनालावर तसेच लटकत राहिले. भयंकर रक्ताचे पूर कोसळले. “जानकीजीवन राम ! राम ! पतितपावन राम ! राम!”

ते थिय्या तरुणांचे हात तलवारीच्या वाराने उडून हरिहराच्या रक्तात तरंगत पडले. म्हाताऱ्या मसकुनीचे दोन तुकडे होऊन एक कृष्णनायर वैद्याच्या अंगावर पडला. तिचाच दुसरा तुकडा पायांनी धरून काठीसारखा करून कृष्णानायरास एक मोपला विनोदाने झोडू लागला. रक्त, मांस, नसा, सटासट त्या अंगांतून निसटून कृष्ण नायराच्या तोंडात, नाकात, डोळ्यात, कोंबल्या जाऊ लागल्या. तोच कचकन एक तलवारीचे टोक त्याच्या डोळ्यात घुसले- बाहेर हिसडले गेले !

कृष्णनायराच्या डोळ्यातून जे भोक पडले ते मज्जा, कवटी फोडून डोक्याच्या पाठीमागे उघडून आले. कर्कश किकाळी फोडून कृष्णनायर खाली पडला. किकाळ्या ! वेदना ! विव्हळणे ! मारो ! मत मारो ! एकच बीभत्स गोंधळ ! कोणी हिंदू वीर मेले; कोणी मरत आहेत.

"पतितपावन राम राम ! जानकीजीवन राम ! राम !"

त्या सर्व मेलेल्या, मरणाऱ्या, तुटणाऱ्या आणि अखंड देहांस, प्राणांस, केसांस, रक्तांस, मांसास, अस्थीस, तडफडणाऱ्या तनुखंडास, त्या मोपल्यांनी तसेच हातांनी नि लाथांनी उचलून नि ढकलून दिले. त्या विहिरीतील मृत्यूच्या एकाच जबड्यात एकत्र!

पतितपावन राम राम ! जानकीजीवन राम ! राम!

ते भजन स्तब्ध झाले. बाकी हिंदू जे डरले त्यांना पूर्वीप्रमाणेच केस मुंडून नि सुंता करून मोपल्यांचे कपडे देण्यात आले.

"तिसरी टोळी" थंगल ओरडला.

तिसरी टोळी आली तशीच त्या सशस्त्र वर्तुळात कोंडली गेली. तसेच जे मुसलमान होतो म्हणाले ते जगले. जे मरतो म्हणाले त्यांचा तसाच घोर वध वा अर्धवध होऊन त्या विहिरीत ते ढकलले गेले. ज्या तरुण मुली होत्या त्या मात्र कत्तलीत न मारल्या जाता कत्तलीतून मानिनीस अधिक कष्टतर अशा दास्यासाठी राखून ठेवण्यात आल्या.

"चवथी टोळी" म्हणून थंगल गर्जला. पण इतक्यातः "ते आले ! सरकार, ते आले" म्हणून एक मोपला घोडा भरधाव फेकीत तिथे येऊन म्हणाला.

मोठ्या आनंदाने उसळून थंगल म्हणाला, "अल्लाची प्रशंसा असो ! कोण ? अनवर पाशाची सेना आली ? ते मोपल्यांच्या साह्यास दहा हजार तुर्क, वीस हजार कुर्द नि बावन हजार अरब घेऊन येणार होते."

"अनवर पाशा गाजी आहे ! बावन हजार अरब लोक आले" सभेत एकच जयघोष झाला.

"नव्हे, नव्हे, अनवर पाशा नव्हे" अडखळत तो घोडेस्वार म्हणतो तोच मौलवी म्हणाला, "तर मग कोण आले ? अफगाणिस्थानचे अमीर ? दिल्ली मुसलमानी वीरांनी कधीच घेतली होती. अमीर इस्लामचा खड्ग आहे."

"अमीर इस्लामचा खड्ग आहे ! पण सरकार अमीर नाही आला-"

घोडेस्वार इतके म्हणत आहे तोच ती कृत्या मशाल उंच धरून नि समुद्राकडे निरीक्षून ओरडली, "मग कोण आले ? अरबस्थानातून समुद्राच्या मार्गाने खलिफा जी शस्त्रास्त्रे धाडणार होता नि ज्याच्यासाठी कुट्टमच्या खिलाफत मंडळाने तीन लाख रुपये धाडले होते ती शस्त्रास्त्रे भरून आरमार आले की काय ?"

"चूप, थेरडे" त्याचा राग, निराशा नि साचलेला क्रोध तिच्यावरच शेवटी काढून तो घोडेस्वार म्हणाला, "सरकार ! ते अनवर पाशा, तो अमीर, ती शस्त्रास्त्रांनी भरलेली अरबी गलबते नि ते बावन हजार तुर्क कधी येतील ते येवोत; पण सध्या जे आले आहेत ते त्यापैकी कोणी नसून आले

आहेत केवळ गुरखे लोक ! हिंदूंच्या छळाच्या कहाण्या ऐकून नि पाहून, चिडून, गेलेले नि देवमंदिरांच्या पडलेल्या कळसांवर नि भंगिलेल्या मूर्तीपुढे त्याचा सूड उगविण्याच्या शपथा घेऊन ते भयंकर 'खुरकी' धारण करणारे गुरखे जो जो सशस्त्र मोपला मिळेल त्यास बंदिवान करीत खिलाफती राज्यावर चालून येत आहेत."

"येऊ देत ! काय चिंता आहे !" थंगल उठून दंड थोपटून एखाद्या पिसाळलेल्या वाघासारखा म्हणाला, "मुसलमानांचा केस देखील काफर वाकडा करू शकणार नाहीत ! हे विश्वासनिष्ठ इस्लाम वीरहो ! ह्या आकाशाची शपथ ! अबब ! ओहो ! हे मी काय पाहात आहे ! थवेच्या थवे ! कोणाचे ! माझे डोळे मिटून जात आहेत ! माझे डोळे मी तरी उघडतो ! अबबब ! काय हे तेज ! केवढी ही तलवार ! हा हा, कळले, कळले, विश्वासनिष्ठहो. जेब्रिल आपल्या देवदूतासह उतरत आहे ! या अल्ला !"

"या अल्ला ! जेब्रिल आपल्या देवदूतासह उतरत आहे !" मोपले उत्तेजित होऊन ओरडले.

"आता गुरख्यांची काय कथा ! त्यांच्या किरिटास तीन तारे लटकत आहेत ! हीच विजयाची खूण !"

"हीच विजयाची खूण !" सभा प्रतिध्वनिली.

"कशावरून ?" थंगल म्हणाला.

"कशावरून ?" सभा प्रतिध्वनिली.

"कारण की बेदरच्या लढाईत जेव्हा पैगंबराबरोबर काफरांच्या सैन्यांनी मोठा अनर्थ गुदरविला तेव्हा ह्याच सेनापतीच्या- जेब्रिलच्या हाताखाली दोन हजारांची सेना अल्लाने धाडली होती. त्या वेळी त्याच्या किरीटास तीनच तारे होते. आताही तीनच आहोत ! अहो, काय तेज !"

"अहो, काय हे तेज ! आम्हांस बघवत देखील नाही !"

"पण ते तुम्हास- तुम्हासही बघवेल !"

"केव्हा? केव्हा आचार्य, केव्हा ? ह्या पाप्यांस जेब्रिलच्या किरीटचे तीन तारे केव्हा दिसतील?"

"काफरांशी लढता लढता तुम्ही मेल्याबरोबर! मरताच दिसतील- आणि पऱ्या-काळ्या काळ्या डोळ्यांच्या ! नि सुंदर किशोर तुमच्यापाशी हसत उभे की जसे जतन केलेले मोती ! "सुल तुत्तूर" या अध्यायात सांगितलेली सर्व वचने खरी होतील. तर बोला, गुरख्यांची काही कथा आहे काय ?"

"देवदूतापुढे गुरखे ?" "सिहापुढे मशक" सभा प्रतिध्वनिली.

"तर मग आजच्या आज गुरख्यांवर छापा घालावयाचा ना ? काफरांच्या बंदुकांची तोंडे मोपल्यांचे रिकामे हात जाऊन दाबून धरतील. काफरांची दारू उडेनाशी होईल- मोपल्यांस गोळीच लागणार नाही."

"मग आजच आम्ही लढणार ! अल्ला हो अकबर ! दीन, दीन !"

“ठरले तर मग.” मौलवी मध्येच उठून म्हणाला, “गुरख्यांवर छापा घालावयाचा. परंतु प्रथमतः आपल्या घरातील सर्पास-शत्रूस पार मातीस मिळवून टाकून नंतर चला. थंगल, हे बाकीचे जे काफर बंदिवान आहेत त्यास एकसहाच विचारा-नाही तर विचारू नका. केवळ बायकांत रुचेल ती निवडा नि बाकी त्वरित कत्तल करून टाका. हे शत्रू जिवंत राहिले तर ते काफर गुरखे येताच त्यास मिळतील नि आमच्या नाशास कारण होतील. मारा मारा ! सरसहा फेकून द्या.”

हे क्रूर शब्द ऐकताच उरलेल्या शेदोनशे हिंदू बंदिवानांतून एकच दुःखाचा एकच टाहो फुटला. म्हाताऱ्या बाया, कोवळी मुले, तरुण, बाल, वृद्ध स्त्रिया, पुरुष-एका शब्दात ह्या त्या मौलवीच्या एका क्रूर निःश्वासासह त्या सर्वांचा जीव गेल्यासारखा झाला. “मारू नका, निदान माझ्या मुलास ! माझ्या आईस, माझ्या बापास, माझ्या भावास - मारू नका ! मारा; मी मुसलमान होत नाही! मारू नका, मी मुसलमान होतो.” अनेक ध्वनी, अनेक वेदना, भयंकर कल्लोळ झाला- एका क्रूर मौलवीच्या एका कठोर शब्दासाठी.

त्या क्रूर मौलवीच्या एका कठोर शब्दासरशी सर्व मोपले एकदम त्या निःशस्त्र, भयभीत, दीन बंदिवानांवर तुटून पडले. आपण कणसे कापतो तशी, तलवार जिथे जशी पडली तशी कचाकच कापू लागली. शिरे, हात, पाय, कवट्या, मांस, रक्त, नसा, फाडलेली पोटे, ओढून काढलेली आतडी-केवळ कापाकापी होऊन तो सर्व रेंदा- मनुष्याच्या जीवनाचा रेंदा- त्या विहिरीत फावड्यांनी मातीचा रेंदा ढकलावा तसा ढकलून देण्यात आला.

मौलवीने थंगलला विचारले, “काय आचार्य, सर्व न्यायकर्म संपले ?” थंगल म्हणाला, “सर्व.” मौलवी गंभीरपणे उभा राहून नि आजूबाजूस जितके दिसू शकले तितक्या दूर अंतरावर पाहून म्हणाला, “इमानदारहो ! अल्लाचा विजय असो ! आज हया क्षणी मी माझ्या आयुष्याच्या अती उच्च शिखरावर उभा राहून ईश्वरास अनेक धन्यवाद देत सांगतो की, माझ्या हाताखाली हया कुट्टम नि गोपूर तालुक्यात एकही हिंदू जिवंत राहिला नाही. माझ्या राज्यात हया क्षणी एकही देऊळ नि मूर्ती अस्तित्वात नाही. लोक मुसलमान केले, शेकडो काफर कत्तल केले. शेकडो दगडांच्या काफरांचे नि नास्तिकपणाचे बीज मी पार खणून काढिले आहे. शेकडो देवांस पालथे घातले. बस्स. आता केवळ विश्वासू, सत्यधर्मी पैगंबराचा नि त्या अल्लाचा घोष काय तो माझ्या राज्यात ऐकू येईल. हया खिलाफतीराज्यात अन्यायी, पापी, मूर्तीपूजक, अधर्मी नि अत्याचारी असा कोणीही उरला नाही!”

मौलवी “आपल्या राज्यात” असे जे म्हणत होता ते नि ज्या प्रौढीने तो थंगलाचे किमपिही महत्व न दाखविता बोलत होता ती पद्धत, हे, थंगलास मनातून रुचले नव्हते. तथापि उघड विरोध न दाखविता पण काहीतरी स्वतःचे महत्व स्पष्ट व्हावे म्हणून मध्येच थंगल म्हणाला-

“परंतु आता गुरखे आल्याची जी बातमी आली आहे तिचा प्रतिकार प्रथम केला नाही तर हे यश कदाचित अल्ला आपणापासून हिरावून नेईल. त्यातही जेब्रिलच्या देवदूतांचे सैन्य-अल्ला त्यांना विजय देवो ! -हे जवळ येत चाललेले आहे. तेव्हा आता आजचे उरलेले अत्यंत आवश्यक

काम म्हणजे ज्यांनी ज्यांनी हया खिलाफती राज्याच्या प्रस्थापनेसाठी कष्ट सोसले त्यांस त्यांस यथोचित पारितोषिके देणे. हे शक्य तितके लवकर उरकून आपण शत्रूंच्या सैन्याचा धुव्वा उडविण्यास जाऊ. हे राज्य सर्वांनी कमावलेले आहे. हे खिलाफत राज्य आहे. येथील संपत्ती सर्वांची सामाइक आहे.”

“संपत्ती सर्वांची आहे ! सामाइक आहे.” सभा गर्जली.

“आणि मृत्यूही ! सर्वांचा सामाइक आहे.” ती थेरडी खो-खो हसली.

मौलवीच्याही छातीस धस्स झाले; पण मोपल्यांची मने त्वरित उत्तेजित करण्यासाठी तो झटकन म्हणाला, “हा, चला आणा त्या काफरांच्या कन्या सगळ्या मजपुढे !”

त्या सगळ्या तरुण मुली, ज्यास न मारिता - तसेच लुटीचा एक पदार्थ म्हणून ठेविले होते, त्यांना आणून हारीने उभे करण्यात आले. थंगल म्हणाला, “छोकरींनो, ज्या तुमच्यापैकी मुसलमान होतील त्यांच्याशी मोपले सरदार लग्ने लावून त्यांस विधियुक्त अर्धांगीपणाचे सर्व अधिकार देतील. पण ज्या मुसलमानी धर्म स्वीकारणार नाहीत त्यांस बळाने दासी म्हणून मोपल्या सैनिकास वाटण्यात येईल.”

“पण मी मरण्यास सिद्ध आहे.” “मी मी” “आणि मी” पाचसहा तरुण वीरकन्यका त्या रांगेतून निर्भयपणे गर्जल्या, पण ती थेरडी त्यातील एकीच्या तोंडास कुरवाळून नि आपले हिडिस तोंड तिच्या गालास बळे बळे लावून म्हणाली, “माझी छकुली, ती अजून कळी आहे. मरायचे सगळ्यांनाच आहे. पण पोरी, थोडे जगून तरी पाहशील की नाही. तुला वाटेल तो मोपला घे, मग तर झाले. अग हिंदूंपेक्षा मोपला फार चांगला. मी अनुभवाची गोष्ट सांगते ऐक.” “जळलं रांडे तुझं तोंड.” म्हणून त्या पाणीदार मुलीने त्या थेरडीच्या तोंडात उडविली. पण त्यायोगे त्या विक्षिप्त म्हातारीस समाधान वाटल्यासारखे होऊन ती म्हणाली,

“अहाहा ! जर हिंदू पुरुष असे दुसऱ्याच्या तोंडात चटदिशी मारावयास शिकले तर माझ्या छकुले, मीही तुझ्याबरोबर मरण्यास सिद्ध होते ! पण त्या मेल्यांना तोडात खाण्यातच साधूपणा वाटतो ! म्हणून तर मी त्यांच्या तोंडात एकसारख्या मारीत आले आहे ! कधी त्यांचे पोट भरेल तोडात खाऊन! त्या दिवशी मी मरेन !”

तिची ही विक्षिप्त टकळी चालली असता तिकडे घाईघाईने मौलवीने त्या हिंदूंच्या मुलीतून आपआपल्यास रुचेल ती निवडून घेण्यास मोपल्यांस सांगितले. प्रथम मोठे सरदार नि मग धाकटे नि मग सैनिक, अशांनी निवड करावयाचे ठरले. सर्वांत प्रथम वेडा महंमद म्हणाला, “मला लक्ष्मी हवी,” हे ऐकताच मौलवीच्या कपाळावर आठ्या दिसू लागल्या. तेव्हा लगेच सावरून महंमद म्हणाला, “मला लक्ष्मी हवी ! मी ती पाडाव केली आहे नि आपणा सर्वांत अत्यंत श्रेष्ठ नि प्रथम मानाचे अधिकारी जे मौलवी त्यांना मी ती अर्पण करणार !” “ठीक ! ठीक !” सर्व म्हणाले. पण थंगल चूप राहिला. त्यास वाटले मौलवीने आपला जाणूनबुजून अपमान करविला. नंतर अब्राहिम म्हणाला, “मौलवीनंतर निवडणूक करण्याचा हक्क माझा आहे.” पण अब्दुल रागाने म्हणाला,

“माझा ?” तेव्हा अब्राहिम म्हणाला, “मी तीन देवळे मातीस मिळविली. दहा ते वीस मुली नि बायकांस पकडून आणिले. त्यांच्या बापास, भावास नि नवऱ्यास ठार मारिले किंवा घायाळ केले किंवा मुसलमान बनविले म्हणून मी श्रेष्ठ. खिलाफत राज्यात धर्मप्रचार नि शत्रूदमन माझ्या इतके कोणी केले ?”

“अब्दुल्लाने” अब्दुल म्हणाला, “मी कुट्टमच्या ब्राह्मण बनातील काफरांच्या सर्व पुस्तकांस आग लावून दिली. सुमतीचा पाठलाग मी केला. हिंदूंवर दया करा म्हणून म्हणणाऱ्या, आमच्या धर्मवीरांच्या धैर्यास- कृत्यास अत्याचार समजणाऱ्या खिलाफत राज्याच्या द्वेष्ट्या अशा त्या शिया मुसलमान फकीरास शेवटचा दगड-की-ज्याने त्याचे कानशिल नारळासारखे ताडकन फुटून चेंदामेंदा झाले-तो प्राणघातक दगड मी मारिला. मी अफगाणचे अमीरसाहेब दिल्लीस आले ही आनंदाची बातमी आणली. मी अली मुसेलियरच्या समक्ष माधव नायराच्या पोटात सुरी भोसकली. कारण त्याने खिलाफतच्या चिटणिसाचे काम करीत असूनही दहा हजार रुपयेच मोपला बंडासाठी हिंदूंपासून जमविले नि दहा लाख जमविले नाहीत. मी शिपायांस लुटले. मी काफरांच्या देवांशी लढलो. मी काफरांच्या शेकडो पुरुषांशी लढलो. मी काफरांच्या शेकडो स्त्रियांशी लढलो.”

तो थेरडी गर्जली, “तर मग तूच सर्वांस शूर नि धर्मनिष्ठ आहेस हे निश्चित. पण मी ? मी एकसारखी तीनचार दिवसरात्र काफरांच्या घरास आगी लावीत आहे. अर्धे मलबार मी जाळले. पण अजून जळले नाही. माझे काय कोणाशी भांडण होते? केवळ मुसलमानी धर्माचा अभिमान म्हणून, त्याचा काफरास दरारा बसून हिंदू होण्यात केवढी हानी आहे हे त्यांच्या लक्षात यावे म्हणून, मी हे कार्य करीत आले. माझा धर्माचा अभिमान नि देशसेवा काय तुम्हांहून कमी आहे ? कानामागून आले नि मेले तिखट झाले ! दोन काफरांच्या मुलीस तर होरपळूनच काढले ! अल्लाची शपथ ! नि कित्येकीस बळेबळे मोपल्यांच्या...”

हा वाद थांबवून मौलवी म्हणाला, “वीरहो, अब्राहिम, अबदुल्ला, बुढ्ढी अम्मा ! तुमची नि इतर अनेक वीरांची कृत्ये ही निःसंशय तुम्हांस हया लोकात यश नि सुख नि परलोकी स्वर्ग साधण्यास कारणीभूत होतील इतकी उज्ज्वल आहेत. तुमच्या पराक्रमानेच आज हया राज्यपीठावरून गर्वाने सांगता येत आहे की, हया माझ्या राज्यात आज एकही काफर जिवंत उरला नाही. आज हया खिलाफती राज्यात केवळ परमेश्वर नि पैगंबर यांच्या आज्ञेस मानणारे सद्धर्मनिष्ठ, इमानदार मुसलमानच रहात आहेत. न्यायपरायण इस्लामी कायद्यानेच काय तो इथे राज्यकारभार चालत असल्याने अन्यायाचे येथे नावसुद्धा ऐकू येत नाही. आणि म्हणूनच माझी अशी आज्ञा आहे की, हया धर्मयुद्धात मिळालेली लूटही आपण पवित्र कुराणाच्या आज्ञेप्रमाणेच वाटून घ्यावी. आठव्या अध्यायाच्या पहिल्या आयनात कुराण शरीफ सांगते की, “हे विश्वासनिष्ठ मुसलमानहो, तुम्ही काफरांशी लढून मिळविलेल्या लुटीविषयी भांडू नये. निःसंशय सर्व लूट परमेश्वर नि पैगंबर यांचीच आहे. ते देतील, करतील त्यास नि तसे सर्वांनी मानावे. आता परमेश्वर सप्तस्वर्गाहून उंच विराजमान असल्याने त्याने पृथ्वीवरील लुटीचा हक्क पैगंबरासच

दिला. पैगंबराने तो खलिफास दिला. अर्थात खलिफाने ज्या वेळेस हया तालुक्यातील खिलाफती राज्याचे प्रतिनिधित्व मजकडे दिले, त्या वेळेस त्या देणगीमुळेच तो हक्क मजकडे आला. म्हणून सर्व लूट ही धर्मतः प्रथम माझी आहे. हया लुटीस मी तुम्हा धर्मवीरांत जे वाटून देऊ इच्छितो ते केवळ माझ्या औदार्याने नि धार्मिक प्रवृत्तीने होय. म्हणून तुम्ही मी लुटीविषयी जी वाटणी करीन ती वादविवाद न करता वाटून घ्यावी." असे बोलून त्याने त्या मुलीतून जी ज्यास वाटली ती त्यास देऊन टाकली. नंतर मध्यम वयाच्या बायकांस वाटण्यात आले. त्यातील एक साध्वी स्फुंदतस्फुंदत पुनः पुनः म्हणाली की, "दया करा मी विवाहित आहे. मला माझ्या पतीकडे धाडून द्या. नाहीतर मला ठार तरी मारा !"

थंगल म्हणाला, "स्त्रिये तू जोवर मुसलमान झालेली नाहीस तोवर तुझा पती असणे शक्यच नाही. कारण कुराण शरीफच्या चवथ्या अध्यायाच्या पंचविसाव्या आयनाप्रमाणे हस्तगत झालेल्या नास्तिकांच्या स्त्रिया त्यांची पूर्वी लग्ने झालेली असोत नसोत, मुसलमानांची मत्ता होतात. आणि कुराण शरीफच्या दुसऱ्या अध्यायाच्या दोनशेविसाव्या आयनाप्रमाणे काफरांची स्त्री कितीही भली का असेना तिच्यापेक्षा मुसलमानी दासी ही श्रेष्ठ होय असे आज्ञापिले आहे! तेव्हा तुला पतीचे अधिकार मुसलमान होईतो मिळणार नाहीत. काफर पतीशास्त्र मानीत नाहीत. मुसलमान पती, मुसलमानी धर्म स्वीकारीतो तुला मिळू शकत नाही. म्हणून केवळ बटिक होऊनच, तुला, राहिले पाहिजे."

"पण मला ठार मारावयास तर शास्त्र विरूद्ध नाही ना ? ज्या शास्त्राने कोवळी मुले नि वृद्ध पुरुष मारता येतात, अस्पृश्य कुमारिका भ्रष्ट करिता येतात नि देवमूर्ती फोडता येतात, त्या शास्त्रात माझ्यासारख्या निरुपयोगी यःकश्चित स्त्रीस मारून टाकण्यास काही तरी आधार सापडणार नाही हे शक्यच नाही. मला मारा ! मी हिंदू म्हणून मला मारा!"

थंगल म्हणाला, "ए स्त्रिये परंतु हे पहा-" तोच रागावून ती मोपला कृत्या ओरडली, "ए थंगल तू त्या यःकश्चित बटकीची समजूत ती काय घालीत बसला आहेस ! तू मुसलमान नाहीस वाटते! अध्याय सात आयन एकशेअठ्ठावन्नमध्ये काय सांगितले आहे ? सर्व कुराणात मी ते आयन पाठ केले आहे नि त्या एका आयनाने माझ्या आत्म्यास हया मशाली इतके स्पष्ट दिसू लागले आहे. मुसलमानांनो त्या आयानांत सांगितल्याप्रमाणे "विश्वास ठेवा ! निरक्षर ईशप्रेषित महंमदावर विश्वास ठेवा ! बुद्धिवाद कसला करतोस ? जो बुद्धिवाद करतो तो मुसलमान कसला ?"

इतक्यात एका मोपल्याने आणखी एका स्त्रीला पकडून आणले. "एक काफराणी बाया खिलाफत राज्यात अजून जिवंत आहे."

"आण तिला पुढे" ती थेरडी म्हणाली. आणि ती पुढे येताच खो खो हसून म्हणाली, "अरेरे ही तर माझ्याहून कुरूप. हिला कोण पोसणार? मला देखील एखादा नवरा मिळेल," मोपल्यांतील अनेक लोक खदाखदा हसून म्हणाले, "आम्ही सगळे मिळू-एखादा का !"

“पण हया म्हशीला कोणी घेता का ?” मोपले ओरडले. “फुकट देखील नको”, “तर मग मर रांडे” ती थेरडी म्हणाली. तेव्हा अगदी विव्हळपणे ती भयभीत झालेली स्त्री म्हणाली, “पाहिजे तर मारा- पण आज नका मारू, मी पाया पडते. मी गर्भवती आहे. दोन महिन्यांनी हे मूल जन्मले म्हणजे मग मला सुखाने मारा. पण आता माझ्यासाठी हा माझ्या गर्भातील निरपराधी जीव मारू नका ! मी गर्भवती आहे.”

“हातिच्या ! बरे तू गर्भवती आहेस ना ! तर मग नरकात बाळंतिणीच्या स्वतंत्र खोल्या असतात. तू मर, त्या खोलीतील एक तुला मिळेल. इतकेच नव्हे तर मी स्वतः तुझे बाळंतपण करावयास दोन महिन्यांच्या आत तुझ्या मागोमाग नरकात येते आहे. तर मर; भिऊ नकोस !” ती असे म्हणत असताना तिच्या हया बीभत्स नि भीषण विनोदाने सर्व मोपले मोठ्या मोठ्याने एकच हंशा पिकविते झाले. त्या हंशानेच जास्त उत्तेजित होऊन आपल्या विनोदाच्या बेशुद्ध भरात त्या थेरडीने आपली सुरी त्या स्त्रियेच्या पोटात हसत हसत अकस्मात खुपसली. ती स्त्री ठार झाली. तो गर्भ चिरून गेला.

“ही घोडशाळेच्या गंजीपाशी राहाणारी म्हातारी. अरे, ही कशी इतका वेळ वाचली ! अरे हिला मी बायको करतो ! नव्हे मी करतो !” असा मोपल्या सैनिकांत पुनः हशा सुरू झाला. कारण एका म्हाताऱ्या जख्खड हिंदू स्त्रीस तिच्या गावातील तिच्या गंजीपुढच्या एका जीर्ण झोपडीतून हुडकून धरून आणलेली होती. जो कुणी मोपला, पुरुष वा स्त्री, हिंदूंतील कोणत्याही मनुष्यास पकडून आणील त्यास पारितोषिक मिळेल अशी दवंडी खिलाफती राज्याच्या प्रथम दिवशीच पुकारली गेली असल्याने हिंदूंची मृगया करण्याकरिता जो तो मोपला फिरत असे. परंतु हया जख्खड म्हातारीसही काही मोल आहे हे कोणासही खरे न वाटल्याने तिकडे कोणीही लक्ष दिले नव्हते. त्यातही ती आज इतके दिवस त्या कुट्टम गावात त्या घोडशाळेपाशी इतकी गुपचूप पडलेली असे की, त्या झोपडीपाशी पडलेल्या जुन्या एका वडाच्या मोडकळलेल्या पाराप्रमाणेच ती कशातच जमा नसे. ती इतकी म्हातारी होती की, त्या गावातील म्हाताऱ्यांतील म्हाताऱ्या माणसांनाही ती तरुण असलेली अशी कधी आठवत नसे. ती फारशी कधी कोणाशी बोललेली माहीत नसे. पण जे काय दोन-चार शब्द ती बोले, ते तिरसट नि तीव्र असत. तिची पूर्वपीठिका कोणासच माहीत नसे. तिच्याकडे कुणी कधी येत नसे. ती कोणाकडे सहसा जात नसे. तिचे नावदेखील कोणास माहीत नव्हते. सांप्रत तिला “गंजीपासली म्हातारी” इतकेच सर्व म्हणत. अशा त्या जख्खड म्हातारीसही पारितोषिकाच्या आशेने एका मोपला मुसलमानिणीने जेव्हा धरून आणिली तेव्हा अर्थातच सर्वत्र हशा पिकला. कोणी म्हणाले, “या जखिणीस पकडण्याकरिता त्या बिबिअम्माला सबंध दोन कवड्या द्या.” “वा इतके का या गंजीपासल्या म्हातारीचे मोल कमी आहे ? हिला धरण्यासाठी सबंध एक कवडी नि अर्धी फुटकी असे दीड कवडी पारितोषिक मिळाले.” “मी तुला दीड सोडून दीडशे कवड्या देतो - हिला तू बायको करतोस ?” “अरे ती बायको आहेच ! तिला आता पुरुष केले पाहिजे.” “कशावरून हे ? कशावरून ती बायको आहे ? हा लेकाचा तिची सांगोपाग परीक्षा

घेत असतो वाटते केव्हा केव्हा ?" अशा नाना प्रकारच्या स्वस्त नि गुंडगिरीला सहज अशा कोट्या त्या मोपल्यांच्या जमावातून उठत मोठमोठ्याने हशा पिकवीत होत्या. त्या विनोदाने उत्तेजित होऊन ती कृत्यापण आपली मशाल घेऊन त्या गंजीपासल्या म्हातारीपाशी धावली नि म्हणाली, "ए अप्सरे, तुझ्याहूनही म्हातारी हया जगात कोण आहे ?"

"तुझा बाप." म्हातारी उपरोधिक हसली.

"तुझे मोल खरेच का ह्या माझ्या फुटक्या कवडीइतके आहे ?"

"नव्हे तुझ्या फुटक्या कवडी इतके नसून तुझ्या फुटक्या कवटी इतके आहे."

"ठीक आहे तर !" जरा दचकून ती कृत्या मागे सरली. तिचे तोंड उतरले. आणि ती कोणास काही ओळख पटावी तशा एक-दोनदा माना वेळून म्हणाली,

"ठीक तर ! सांग आता तू सगळे. जे पहावयाचे होते ते दिसले, आता घे, ही विझवली मी आपली मशाल !"

असे विचित्रपणे बोलून त्या कृत्येने ती मशाल धुळीत घुसडून विझवून टाकिली. तिचे हे कृत्य तिचा नेहमीचा उदंड विक्षिप्तपणा माहीत असलेल्यांनाही जरा अपूर्वच वाटले. ती कृत्या पुनः म्हणाली, "सांग, काय ते बोल-"

परंतु मौलवी म्हणाला, "ही काय गडबड मांडली आहेस ! हया यःकश्चित थेरडीच्या गप्पा ऐकावयाची का ही वेळ आहे, बुढ्ढी अम्मा ?"

मौलवीच्या अहंमन्येतेने नि काय आज्ञा ती तोच देणारा अशा त्याच्या शेखीच्या वर्तनाने चिरडून गेलेला थंगल मौलवीचा पाणउतारा करण्याची वेळ पहातच होता. आता बुढ्ढी अम्मा- ती कृत्याही त्याच्या बाजूसच होण्याचा संभव असल्याने नि जमावाची जिज्ञासाही त्यास थोडीशी साहाय्य देईल हेही स्पष्ट झाल्याने मौलवीच्या काही का होईना पण विरुद्ध आज्ञा ठोठावावयाची इतक्याच बुद्धिने थंगल म्हणाला, "बुढ्ढि अम्मा! तुम्ही म्हणता तेच बरोबर आहे, तुम्हांलाही जर योग्य वाटते आहे की, तिने काय ते सांगावे तर ते महत्त्वाचे, निदान मनोवेधक असलेच पाहिजे. सांग, ए गंजीपासले म्हातारे, सांग काय ते ?"

मौलवी म्हणाला, "हा वेळेचा अपव्यय होतो आहे, कळत नाही एवढे ?" थंगल म्हणाला, "वेळेचा अपव्यय कोणता हे तुम्हा आम्हांपेक्षा धर्मशास्त्रास अधिक कळत असले पाहिजे हे उघड आहे. ही थेरडी झाली तरी तीस आत्मा आहे. तिला मारण्याच्या वा इतर कोणतीही शिक्षा देण्याच्या आधी तिचे काय म्हणणे ते ऐकून घेतले पाहिजे. इस्लामी कायदा कोणासही अन्यायाने दंड देत नाही. खिलाफती राज्यात आरोपीचे म्हणणे ऐकल्याविना कोणासही शिक्षा वा पारितोषिक मिळत नाही. खिलाफती राज्य हे न्यायाचे नि धर्माचे राज्य आहे."

"खिलाफती राज्य हे न्यायाचे राज्य आहे, अन्यायाने आम्ही कोणासही दंड देत नाही ! इस्लामी कायदा छळ कधीही करीत नाही" जमावातून गर्वाचे प्रतिध्वनी उठले. "सांग ! गंजीपासले म्हातारडे, सांग काय ते !' म्हणून शेकडो आवाज उठले.

“सांग, नाही-मी जे सांगणार आहे ते व्यंग आहे !” ती म्हातारी दात नसलेल्या तोंडाने शब्द चघळू लागली, “माझे आता थोडे दिवस उरले आहेत ते मी माझ्या हिंदू धर्माप्रमाणे आचरण ठेवून काढावे नि हिंदू म्हणून मरावे अशी माझी इच्छा होती. मी हया मोपला बाईचे ती जेव्हा मला पकडण्यास आली तेव्हा पाय देखील धरले की, मला कशाला नेतेस ? देवांच्या मूर्ती फोडणे असेल तर माझ्या देव्हाऱ्यात एकही देवमूर्ती उरली नाही. कुमारीची लज्जाहरण करणे असेल तर माझ्या कौमार्याच्या उसाच्या चोखून फेकलेल्या चोयट्यांच्या आगीत माझी लज्जा कधीच राख झालेली आहे. सुतवतीच्या मुलास पाजणाऱ्या स्तनांवर बोथटलेली तलवार चालवून तिला धार द्यावयाची असेल तर माझ्या स्तनांतील दुग्ध साप पिऊन गेल्याने झरा सुकलेल्या खडकासारखी ही माझी छाती रुक्ष नि उग्र दिसत आहे. सारांश, जिहाद-धर्मयुद्ध-करणाऱ्या हया मोपल्या धर्मवीरांच्या कोणत्याही धार्मिक कृत्यास उपयोगी पडण्यासारखी सामग्री मजपाशी उरलेली नाही. म्हणून मी म्हटले होते की मला कशास धरतेस ? पण हया मोपला मुसलमानिणीने अखेर मला धरून आणलेच. आता एक तर मी आपला हिंदू धर्म सोडीत नाही नि दुसरे की मला नीट बघून घ्या जिच्या स्तनांतील दूध पिऊन माणसे साप झाली अशी म्हातारी हया मलबारात मी मेल्यावर पुनः तुम्हांस दिसणार नाही. मी माझ्या हया स्तनांवर ज्या मुलांना पाजले त्यापैकी जे साप झाले ते मी आपल्या घरात बाळगले. जी माणसे राहिली त्यांना मी घरापासून दीडशे फुटांवरही फिरकू देत नाही.”

“ए, थेरडे काय बहकतेस आहेस काय !” थंगलच्या मघाच्या भाषणाचा राग तिच्यावर काढीत नि तिला कसेबसे बोलताना बंद करून थंगलची आज्ञा फिष्फळ करावी म्हणून मौलवी ओरडला, “कोण ? माणूस कोण ? बहकतेस काय ! साप कोण ? आटप लवकर.”

“साप तू ! नि माणूस ! तो ठार मारला गेलेला कम्बू ! थिय्या ! आटपते घे. मी मरते. पण इतकेच सांगून मरते; की, माझ्या स्तनांतील दुधाची धार तुझ्या आईच्या स्तनांतून तुझ्या तोंडात पडलेली आहे. माझ्या गर्भातील जीवनाची धार तुझ्या आईच्या गर्भातून वाहात तुझ्या हृदयात उतरली आहे.”

“चुप रहो ! साली, क्या बकती है ? हा मौलवी महंमद पैगंबराच्या रक्ताचे रक्त आहे समजलीस ! पैगंबराच्या मावशीच्या जावयाच्या बहिणीचा जो सख्खा शेजारी त्याच्या प्रत्यक्ष भाचीचा जो मुलगा तो माझा पूर्वज आहे समजलीस! रांड कुठली ! मी सय्यद आहे ! मी अरब आहे ! मी कोरेश आहे !”

मौलवीच्या हया रागाचे कारण उघड होते. खिलाफती राज्यात मुख्य अधिकार अरबांच्या नि त्यातही पैगंबराच्या जातीत उत्पन्न झालेल्या अस्सल मुसलमानांच्या हाती असावा अशी परंपरा असल्याने आपले पूर्वज अस्सल कोरेश आहेत असे मौलवी नेहमी हट्टाहासाने सांगत असे. परंतु त्या म्हातारीच्या ह्या वाक्यांनी त्यांच्या अगदी मर्मावरच घाव घातल्यासारखे केले होते. परंतु मौलवीस तिच्या हया वाक्याचा जितका राग आला तितकाच संतोष त्याच वाक्यांनी थंगलला

होऊन तो मनात अत्यंत उत्सुक झाला नि त्या म्हातारीच्या तोंडून काहीतरी अद्भुत बातमी बाहेर पडणार नि मग हया मौलवीचा तोरा एका क्षणार्धात नष्ट करिता येणार अशा आशेने तो थंगल त्या म्हातारीस म्हणाला "बाई घाबरू नका, काय सांगावयाचे ते सांगा; परंतु निर्भीड, निर्भयपणे सत्य तेच स्पष्ट सांगा."

"ऐका तर ! स्पष्ट ऐका मी तालापुत्तर हया गावच्या रतन कनीसनची मुलगी आहे. मला तीन मुले झाली. दोन मुलगे नि एक सर्वांत धाकटी मुलगी. आमची कनीसनची जात थिय्यांहूनही नीच समजली जात असल्याने आमचे घर आमच्या गावच्या अगदी दूर एका खोलगटात असे. आमचे शेजारी एका जवळच्या शेतात काम करणाऱ्या एका मोपला कुटुंबाची झोपडी काय ती असे. त्या साली फार मोठा दुष्काळ पडला. पण मी त्या मोपला कुटुंबातील सर्व लोकांस आपल्या भाकरीतून भाकरी नि भाजीतून भाजी देऊन दयेने पोसले. ते मला "अल्ला तेरा भला करे ! तू हमारी मा हय !" असे जेव्हा डोळ्यात अश्रू आणून म्हणत तेव्हा दया येऊन मी मनात म्हणे, "मी यांना पुत्राप्रमाणे मानीन. हे मला जीव गेला तरी अंतर करणार नाहीत." दुष्काळ संपला. ते मोपला कुटुंब खाऊनपिऊन लठ्ठ झाले. इतक्यात मोपल्यांचा एक दंगा अरनाड तालुक्याच्या बाजूस झाला असल्याची वदंता आली. वदंतेमागोमाग दीन दीन करीत त्या बंडखोरांच्या टोळ्याही आल्या. मी नि माझा पती रतन थरथर कापत आमची ती दोन मुले घेऊन त्या मोपला कुटुंबास घराकडे बघावयास सांगून रानात जाऊन लपलो. परंतु त्या दंगेखोरांस आमचा सुगावा लागून ते दुसऱ्या दिवशी आम्हांस धरावयास आले. त्या सर्वांच्या पुढे आमचा सुगावा काढीत नि मार्ग दाखवीत कोण आले होते ? त्या आम्ही दुष्काळात पोसलेल्या मोपला मुसलमानी कुटुंबातील बायकांनी आम्हांस धरून माझ्या पतीस बाटविण्यासाठी पकडून नेले नि ठार मारले. मला नागवी करून माझी लज्जा हरण केली. कोणी ? त्या आम्ही दुष्काळात पोसलेल्या मोपला कुटुंबातील मुसलमानांनी ! आमची अशी त्रेधा उडाली असताही माझ्या धाकट्या मुलीला घेऊन माझा मोठा मुलगा पळून लपत छपत आमच्या तालापुत्तर गावात जाऊन कोणीतरी आश्रय द्यावा म्हणून विनवू लागला. बंडखोर चोहोकडून येतच होते. पण आम्ही कनीसन जातीचे ! त्या माझ्या मुलीला गावाच्या आसपास कोणी फिरकू देईना. माझी मुले एका ब्राह्मणास पदर पसरून म्हणाली- "महाराज ! आम्हांस बलात्काराने मुसलमान करीत आहेत.आपण सर्व हिंदूंचे गुरू ! आमचे रक्षण करा!" तो ब्राह्मण म्हणाला- "होईनास तू मुसलमान ! त्यात माझे काय जाते ?" तेव्हा माझी मुले भयभीत होऊन एका मंदिरात रात्री लपून बसली. पण तितक्यात एका नायर क्षत्रियाने ते पाहून एकच ओरड केली. त्या देवळाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर कुत्री सुखाने निजली होती. पण माझ्या मुलांस मारीत मारीत त्या क्षत्रियाने देवळाबाहेर हुसकून दिले. मुलांनी त्याची किती गयावया केली की, "महाराज आपण क्षत्रिय- सर्व हिंदूंचे रक्षक. आम्हांस मुसलमान बलात्काराने गांजताहेत. मुसलमान करताहेत. मारा- पण तुम्ही आम्हांस हिंदूधर्म भ्रष्ट होऊ देऊ नका." तो म्हणाला. "मुसलमान तुला बाटवितात म्हणून तू देऊळ बाटवितोस ? बाट, नाही तर मर ! तुझा धर्म

तुझ्यापाशी. माझा माझ्यापाशी. मला त्याचे काय ?" तेव्हा माझी मुले दीन होऊन महारवाड्यात थिय्या लोकांच्या गवताच्या गंज्या होत्या त्यात जाऊन लपली. तो ते थिय्या लोक एकच बोंब करून ओरडले ! कनीसन जातीची मुले गंजीस शिवली! आम्हा महारास विटाळ झाला." माझी मुले म्हणाली, "हात जोडतो महाराज ! तुम्ही महार- आम्ही कनीसन डोंब. तुमच्याहून नीच आहोत. पण मुसलमान आम्हांला हिंदू धर्म सोडा नाहीतर मरा असे म्हणून पाठीस लागले आहेत. तर आश्रय द्या. तुम्ही महार-थिय्ये ! तुम्ही जेव्हा वाणी, सुतार, तेली यांच्या जवळ जाता नि ते तुम्हांला दूर व्हा म्हणून झिडकारतात तेव्हा तुम्हांला तो अन्याय वाटतो. अहो-महार महाराज ! पण तोच अन्याय आज तुम्ही आम्हांवर करता आहा ! निदान आज तरी आम्हास आश्रय द्या आम्हास मुसलमानांनी हिंदूंचे मुसलमान केले तर तुमचाच हिंदू धर्म क्षय पावेल ना ? ते महार थिय्ये रागावून हसले. "गाढवांनो हिंदू धर्म काही तुमच्यावरच जिवंत राहिला आहे की काय ? आणि तुम्ही मुसलमान झालात तर बरे की वाईट ? तुम्हा कनीसन हिंदूंना आम्ही महार शिवत नाही, पण मुसलमान असता तर तो आम्हांस शिवू शकता ! जा, बाटा नाही तर बाटू नका; आम्हांस त्याचे काय?" महारांचे हे बोलणे होते आहे तोच त्या गावावर ती मोपल्यांची धाड पडली. परंतु पोलीस आल्याने मोपले पळून गेले. केवळ माझी मुलगी परत त्यांच्या हाती सापडली. ती दीन गायीसारखी ओरडत होती, पण कोणी हिंदू तिचे रक्षण करीना. जो तो आपापल्या ऐटीत वा चिंतेत, "मला त्याचे काय !" असे म्हणत राहिला. माझ्या मुलीवर मुसलमानांनी भयंकर अत्याचार केले. अखेरीस एक मोपला तिला आपली बटिक म्हणून घेऊन गेला. थोड्याच दिवसांत तिला एक प्रकारची मेंदूची व्यथा झाली. ती पुढे काही दिवस मला भेटे. पण वेड्यासारखी म्हणत असे "मला त्याचे काय ? हया मेल्या हिंदूंना कोणीतरी चांगले शिकविले पाहिजे की, त्यांना त्याचे काही तरी आहे !" नंतर ती कुठेशी नाहीशी झाली, पण मी ऐकत असे की ती ज्या त्या हिंदूला पाहून वेड्यासारखी विचारीत ओरडे, "मला त्याचे काय?" शिकवीन तुला मी "तुला त्याचे काय ते !" माझी दोन्ही मुले धरली जाऊन बाटली गेली. त्यातील मोठा जो त्या मुलीस घेऊन पळाला तो मजपाशीच राहिला. पण जो लहान होता त्यावर लहानपणीच एका मोपल्या थंगलाची पापदृष्टी पडून तो त्याने मजपासून बळाने हिरावून नेला. त्यास त्याने मुसलमानी शाळांतून कुराण तोंडपाठ शिकविले. तो अगदी मुसलमान झाला. इतका की, एकदा स्वतः मला नि त्याच्या मोठ्या भावाला मुसलमानी धर्माप्रमाणे निमाज पढत नाही म्हणून ठार मारण्यास उद्युक्त झाला होता. आम्ही दोघे बाटविले गेलो होतो; पण आम्ही दोघे बाटलो नव्हतो म्हणून आम्ही तालापुत्तरच्या सर्व हिंदू बंधूस आम्हांला परत हिंदू धर्माचे म्हणून समजावे अशी करुणा भाकली; पण ते सगळे खो खो हसत नि म्हणत, "हिंदू मुसलमान होऊ शकतो. पण मुसलमान कधी हिंदू होऊ शकतो का ?" "तुला हिंदू धर्माचे" हक्क मिळणार नाहीत. तू मूळची कनीसन जातीची बाई, आता मुसलमानांनी बाटविलेली आहेस. आता तुला आम्ही शिवणार, तुला पाण्याच्या विहिरीच्या नि देवळाच्या अगदी जवळून जाऊ देणार. तू गायीचे मांस खाल्लेस तर तुला हसणार नाही. तू रामास नि कृष्णास

शिव्या दिल्यास तर तो तुझा धर्मच आहे असे समजून रागावणार नाही. कनीसन जातीला आम्ही उपभोगू देतो ते हिंदू धर्माचे हक्क तुला परत कसे देऊ? देवळाच्या वा आमच्या घराच्या दीडशे फुटांच्या आत न येण्याचा अधिकार तुला परत उपभोगू देता येणार नाही !"

माझा नवरा तर मारलाच गेला होता. मी नि तो माझा मुलगा दोघे काय ती घरी. काही दिवस तसेच लोक मुसलमान म्हणत असता स्वतःस हिंदू समजून काढले. एक दिवस आम्ही दोघे रामनवमीचा उत्सव संपवून भजन करीत रामाचे नाव भक्तिभराने घेत होतो, तोच हातात सुरा घेऊन एक भयंकर मारेकरी माझ्या घरात घुसला नि म्हणाला, "मुसलमान केले असताही तू अजून काफरांचाच धर्म पाळतेस ? जो मुसलमान परत काफर होईल त्यास ठार मारावे अशी आम्हांस धर्माज्ञा आहे." असे म्हणत तो चांडाळ आम्हांस ठार मारण्यास धावून आला. पण माझ्या शूर मुलाने कुऱ्हाड उचलून त्याच्या कंबरेत अशी जोराने नि कौशल्याने मारिली की तो "अल्ला ! या अल्ला !" म्हणून एक दोनदा ओरडत खाली तूटून पडून गतप्राण झाला. आम्ही जवळ येऊन पाहातो तो आपला मारेकरी दुसरा कोणी नसून तो दुष्काळातील दयेने पोसलेला नि मला आई म्हणणारा माझा शेजारचा मोपला मुसलमान ! सुमतीने दूध पाजलेल्या सापाने त्या दुधाची क्रिया तशी पाळली, मी माझ्या तोंडचा घास चारून पाळलेल्या मोपल्याने-मनुष्याने-माझी फेड अशी केली!

कारण साप किती जरी विषारी झाला तरी त्याच्या विषास कोण्या एखाद्या धर्मपुस्तकातील मंत्राने भारलेले नसते. म्हणून ते विष धर्मवेडाच्या मानवी विषाहून कमी उग्र असते.

त्या मारेकऱ्याच्या हातून आम्ही सुटलो. पण त्या वधाचा खटला आम्हावर होईल नि मुसलमान पुढे मागे आम्हांस हिंदू धर्म न त्यागिल्याविषयी पुन्हा मारण्यास येतील या भीतीने आम्ही ते गाव सोडून जाण्याचा निश्चय केला. माझा मुलगा आपण थिय्या जातीचे आहोत असा बहाणा करून निघाला तो हया कुट्टम गावात येऊन राहिला. मीही पण येथेच येऊन पण अगदी स्वतंत्रपणे नि जातगोत ना विचारता, ना सांगता कोणाशी फारसा संबंधही न ठेवता येऊन राहिले. काही दिवसांनी माझ्या मुलाचे एका थिय्या मुलीशी लग्न झाले. त्यास एक मुलगा झाला; तो माझा नातू लहानपणापासूनच मला प्राणांपेक्षा प्रिय असे. पण त्याला मी शेतात काय ते कोणी नसताना जाऊन भेटे. तो माझा नातू म्हणजे श्रीरंगन्च्या मंदिराचे रक्षण करिता करिता घायाळ झालेला नि हिंदू जातीस जागृत करता करता ठार मारला गेलेला हुतात्मा-हिंदू हुतात्मा कम्बू हा होय.

हा हिंदू हुतात्मा कम्बू हा माझा एक नातू आणि दुसरा तो माझा मुसलमानांनी लहानपणापासून नेल्याने नि लहानपणापासून त्यांच्याच शिक्षणाने वाढल्याने पक्का मुसलमान झालेला, इतका पक्का की मलाही काफर म्हणून मारावयास जो पाही, त्या माझ्या दुसऱ्या मुलास, अशाच एका हिंदू चांभाराच्या बाटविलेल्या मुलीशी लग्न होऊन जो मुलगा झाला तो - तो माझा दुसरा नातू होय. त्यास जन्मापासून माझ्या दुधाची ओळख झालेली नाही. पण म्हणून त्याच्या

रक्तात माझे दूध नाही असे नाही. तो लहानपणापासून मुसलमानी धर्मशास्त्र शिकत मोठा मौलवी झालेला आहे. तो माझा दुसरा नातू दुसरा कोणी नसून हा घियासुद्दीन- हा हया श्रीरंगाच्या मूर्तीस पालथी घालून तिच्या पादपीठावर पाय देऊन उभा असलेला, खिलाफत राज्यातील तुमचा कलेक्टर 'मौलवी' होय!"

"चूप ! रांड कुठली ! अहो हया वेडीचे काय ऐकता! तुमच्या पुढाऱ्यावर नरकाचे शितोडे फेकण्यासाठी काफरांनी हिला जाणूनबुजून धाडिली आहे ! पाहाता काय ! मारा !" मौलवी गर्जला.

"काफरांनी नाही !" ती म्हातारी बोलू लागली.

"तर मग सैतानांनी असेल !" मौलवी गर्जून, उठून चवताळून तिच्यावर धावला. थंगल म्हणाला, "मी मध्ये आहे. मी काजी आहे. मी थंगल आहे. आपला अपमान आपण तितक्याच शांतपणे गिळला पाहिजे- जितका मी माझा मघा गिळला." म्हातारी बोलू लागली,

"आता मला अधिक काही सांगावयाचे नाही. केवळ एकच वाक्य; नि एकच नाव. वाक्य हे, की हा कम्बू नि हा धियासुद्दीन; दोघेही माझे नातू माझ्या एक स्तनाचे दूध कम्बूच्या नि माझ्या दुसऱ्या स्तनाचे दूध धियासुद्दीनच्या रक्तात रूपांतरित झालेले आहे. पण कम्बू व धियासुद्दीन - एक हिंदू हुतात्मा नि दुसरा मोपला मौलवी कसे झाले ? रक्ताचा रंग लाल म्हणतात, रक्तास रक्त आकर्षिते म्हणतात. पण मला वाटते की रक्तास रंगच नाही; रक्ताचा रंग जवळ जवळ पाण्यासारखा; जे शिक्षण त्यात मिसळले जाईल त्या शिक्षणाच्या रंगाचा रंग घेते. हे झाले वाक्य नि आता ऐका ते उरलेले नाव. ती माझी मुलगी ! जिला वेड लागून "मला काय त्याचे? शिकवीन या मेल्यांस तुम्हांला काय त्याचे ते!" असे म्हणत हिडे नि जी मध्यंतरी हरवली होती नि जी आज मला पुन्हा सापडली- ती माझी मुलगी म्हणजे- ही कृत्या ! ही मशाल म्हातारी ! !"

"होय ! होय ! मीच ती !" एखाद्या अंगात भरलेले भूत उतरून गेल्यानंतर शांतपणे बोलणाऱ्या मनुष्याप्रमाणे धिम्मेपणाने ती मशाल म्हातारी म्हणाली, 'मीच ती !' माझ्या आईने सांगितलेली सर्व कथा खरी आहे. आणि हेही खरे आहे; की, मी थोडीशी वेडी झालेली होत्ये. पण माझ्या वेडात एक शहाणा अर्थ भरलेला होता. तो अर्थ लोकांस दिसावा म्हणून मी मशाल पेटवून हिडत असे. मी माझ्या अंगातील धमनीतील सर्व वायू ओढून घेऊन आकाश फाटेल अशी किकाळी फोडून विचारिते की हिंदूंनो, तुमच्यातील कोणत्याही उपजातीतील एक मुलगी, किंवा एक मुलगा बाटला; परधर्मीयातील दुष्टांच्या हाती पडला; तर, तुमचे सर्वांचे त्यात काय जाते हे तुमच्या ध्यानात, माझ्या नि माझ्या भावाच्या मुलाच्या उदाहरणावरून तरी आले आहे काय ? जर माझ्या लहानपणी माझे आणि माझ्या भावाचे तालापुत्तरास त्या हिंदूंनी रक्षण केले असते- नि किती सहज करता आले असते - तर मी आज त्या कम्बूसारखे श्रीरंगाच्या रक्षणार्थ झगडले असते, हा मौलवी कम्बूसारखा हिंदू धर्माच्या नि हिंदू कुमारिकांच्या पावित्र्याच्या परित्राणार्थ हुतात्मा झाला असता. पण मजसाखा डोंबाच्या एका यःकश्चित कुमारीस यःकश्चित समजून तुम्ही लज्जाभ्रष्ट होऊ दिलीत, मी मुसलमानांच्या हाती पडत असता मला रात्रभर कुत्रे निजते तिथे देखील निजू

देऊन माझे रक्षण केले नाहीत; एक यःकश्चित डोम्बाची पोरगी वा पोर बाटली तर त्याचे आम्हांस काय ? म्हणून माझा उपमर्द केलात- त्याचे हे फळ भोगलेत का? माझ्या एकटीच्या मशालीने शेकडो हिंदूंची घरे जळली आहेत. मी ओरडत होते तसेच- तसाच बलात्कार होत असता हालहाल होऊन जेव्हा हिंदू कन्यका ओरडल्या तेव्हां मी ते प्रसन्न मनाने दहादा ऐकले आहे; मी देवांच्या मूर्तीवर शंभरदा मोजून नाचले आहे. मी शेकडो हिंदूंना मरेमरेतो मारून विचारले आहे की, "कळले का तुला काय त्याचे ते? यःकश्चित डोंबाची मुलगी जरी हिंदू धर्मातून मुसलमानांनी धर्मवेडाने पळवून नेली तरी प्रत्येक हिंदूचे त्यात काय जाते हे कळले का तुला आता तरी ? तुझा धर्म तुझ्यापाशी नि माझा माझ्यापाशी हे वाक्य पुन्हा उच्चारशील का ? का घोटू तुझा गळा? माझा धर्म माझ्यापासून गेला की तुझा प्राणही तुझ्यापासून निघून गेल्याविना राहणार नाही हे सत्य अजून तरी दिसले का तुला स्पष्ट ? नसेल तर बघ हया तीनशे हिंदुघरांच्या पेटलेल्या आगीच्या उजेडात! एक यःकश्चित डोंबाची मुलगी नि मुलगा हिंदुत्वास मुकला तर तो, जर इतका हाहाकार उडवू शकतो तर हे हिंदू जाती, मी किंकाळून, किंचाळून, खिंकाळून तुला विचारिते की, "तुझ्या अशा हजारो मुले नि मुली तुझ्या घरातून पळवून वा हिसडून नेल्या जात असता तू अजूनही असेच म्हणत बसणार काय की "मला काय त्याचे ?" माझ्या आईने सांगितलेली कथा तिचीच केवळ नसून ती हे हिंदू जाती ! तुझ्या कथेचे एक प्रतिबिब आहे."

असे अगदी कर्कश किकाळत ती बिबिअम्मा, ती कृत्या, ओरडली. पुन्हा क्षणभर थांबली. त्या क्षणात सर्व एकदम स्तब्ध झालेले होते. लगेच ती म्हणाली, "बैस वा ऊठ ! मी माझा सूड उगवला. माझे वेड गेले. माझी मशालही विझली. केवळ मागे उरला माझा-अंधक्कार; तोही विझविते आता ! असे म्हणून ती एकाएकी उठली; ज्यांनी मला वेड लावले तो अंधःकार तो तूं ! तूं वीझ !" असे एकदम ओरडली नि एखाद्या वाघिणीसारखी ताडकन उडी मारून त्या मौलवीच्या नरड्यापाशी भिडली !

'हां ! हां !' म्हणून लोक शुद्धीवर येऊन तिला धरतात तो मौलवीच्या छातीत सुरी खुपसून, ती बाहेर काढून त्या कृत्येने ती आपल्या उरात खुपसलेली होती-मौलवी नि ती कृत्या गतप्राण होऊन एकाच रक्ताच्या डबक्यात कोसळली होती.

८. ती विहीर नि ही सभा !

तोच उंच उंच आव्हान देत भयप्रद बिगुल नि बँड इत्यादी रणवाद्ये वाजू लागली. हजारो तुर्क लोक घेऊन अनवरपाशा, हजारो हत्यारे घेऊन अरबी नौका, हजारो पठाण घेऊन अमीर, हिंदुस्थानातील मुसलमानांचे साम्राज्य स्थापन करण्यासाठी वा अली मुसेलियरच्या मोपला खिलाफती राज्याच्या साह्यार्थ धावत येण्यापूर्वीच गुरख्यांची सेना हर हर महादेव करीत धावत आली. थंगलने पाहिलेले ते देवतांचे थवेच्या थवे, किंवा किरीटास तीन चांद घातलेला तो देव सेनापती जेब्रियल किंवा सुरतुल मुजादिल हया अध्यायातील मुसलमानच विजयी होतील हे मोगलांच्या मौलवीनी सांगितलेले आश्वासन हयातील कोणीही त्या गुरख्यांच्या तलवारीस धरू शकले नाही- मग बिचाऱ्या मोपल्यांची कथा काय ? थंगलच्या स्वर्गातील दारू नि स्त्रिया, ज्या मेल्यानंतर मिळणार होत्या त्याच्या लोभाने, न दिसणारे देवदूत आपणास साहाय्य देत आहेत अशा पवित्र भ्रमाच्या बळावर दहा-बारा मोपले लढत मेले. पण शेकडो मोपले मरण्याच्या आधी जी मिळाली तेवढ्याच दारूचा नि त्याच स्त्रीचा लोभ धरून गुरख्यांच्या पुढे जीव घेऊन पळत सुटले. संध्याकाळच्या आत कुट्टममध्ये मोपला म्हणून दिसेनासा झाला. काही मारले गेले, काही दडले, काही पळाले. हर हर महादेवाच्या त्या तलवारीने खिलाफतीची खिरापत झाली.

रात्र झाली. अंधेर पडला. ज्या विहिरीत शेकडो हिंदूंस थंगल नि मौलवी यांनी कत्तल करून फरफटत फेकलेले होते ती विहीर त्या अंधाराच्या वासलेल्या तोंडासारखी आ करून आकाशाकडे बघत होती. अंधार वाढत गेला. मध्यरात्र झाली. तोंड वासून कोणी कोणी झोपी जातात तसा त्या विहिरीचा जबडा उघडून अंधःकार गाढ झोपी गेल्यासारखा घोरू लागला. त्याच्या पोटातील भयंकर पचनक्रिया चालूच होती. त्या विहिरीतील अर्धजीवित वा आसन्नमरण हिंदूंचे कण्हणे नि किकाळ्या मधूनमधून, अंधाराच्या पोटातील गुरगुरण्यासारख्या ऐकू येत होत्या.

ती विहीर, तीत ढकललेल्या प्रेतांनी, धडांनी, धडाविरहीत शिरांनी, तुटलेल्या हातांच्या तुकड्यांनी, मांसाच्या कातडे सोलून कापलेल्या गोळ्यांनी काठोकाठ भरलेली होती. काही झाडे त्या जुनाट विहिरीच्या भितीतूनच फुटलेली होती- तीही तिच्यामध्ये हया वरतून फेकल्या जाणाऱ्या हिंदूंच्या रक्त, मांस, नसा, देह हयांच्या ढिगाऱ्यांच्या भाराखाली बहुतेक दडपून मोडून गेली होती. जी काही दडपली नव्हती; त्यांच्यातील, एका झुडुपाची एक फांदी तिरपी होऊन उभी होती. तिच्या आधारावर एक घायाळ हिंदू विहिरीत ढकलला गेला असता अर्ध्याच खोलीत टांगून पडला होता. त्याच्या खालीच एक आसन्नमृत्यू हिंदू वायू होऊन बरळत होता. त्याला वाटले; की, श्रीरंगाचे मंदिर कोसळून त्याचा दगड त्याच्या उरावर पडला आहे. तो विव्हळत होता, “अरे, हा दगड उचला! माझी छाती दडपून गेली. हा दगड उचला !” थोड्याच वेळात त्या दगडाच्या भाराखाली त्याची कल्पना चुरून मरून गेली. तोही निश्चेष्ट होऊन गतप्राण झाला. दुसऱ्या कुठून तरी त्या ढिगांच्या आतून, “भाऊ ! तू कोठे आहेस ! हात दे ! मला भय वाटते,” म्हणून एक कोमल आवाज येत होता. त्या अटकलेल्या अर्धशुद्ध घायाळास इतके देखील वाटले की तो कोण्या तरी

बहिणीचा स्वर असावा. मारतांना तिला तिच्या भावाचे काय झाले असावे अशी चिंता उत्पन्न होऊन ती विव्हळत असावी- किंवा जेव्हा ती हिंदू धर्म सोडीत नाही; म्हणून, मोपल्यांनी कापाकाप चालविली; तेव्हा, तिच्याचबरोबर तिचा भाऊही त्याच कापाकापीत कापला जाऊन, त्या विहिरीत शेवटी जेव्हा सगळ्या जणांस ढकलले; तेव्हा, त्या भयंकर ढकलाढकलीत ते दोघेही ढकलले जात असता, क्वचित निर्दय दयेने त्यास एका शेजारी एक असे पाडलेले असावे नि ती बहीण खरोखरच त्या भावाचा हात मागत असावी. त्या घायाळ-अर्धशुद्ध टांगलेल्या तरुणाच्यावरच त्या विहिरीच्या भींतीस आणखी एक झुडुप होते. त्यावर एक मांडीपासून कापून फेकलेला पाय लटकत होता. त्यातून रक्ताचे थेंब नि मधूनमधून चिळकांड्या खाली गळत होत्या. हया अर्धशुद्ध घायाळास तोंड हालविण्याचेही सामर्थ्य प्रथम नसल्याने ते रक्ताचे थेंब एकसारखे त्याच्या तोंडावर गळत होते. केव्हा केव्हा तर गुदमरून जाताना बळेच आ करून त्याचे तोंड वासले जाई; नि त्या साचलेल्या रक्ताचे घोटच घोट त्याच्या घशात उतरून पिऊन टाकिले जात. प्रथम तो अर्धशुद्ध स्थितीत असल्याने त्यास हया वेदनांचे फारसे भान नव्हते. पण त्या आहतांच्या नि प्रेतांच्या ढिगांतून प्राण जाताना कोणीसे एकदम पाय इतके जोराने झाडले की, त्याच्या अंगावर पडलेले मास, प्रेते, नसा, हयांचे थर भेदून जाऊन त्याच्या त्या लाथा ताडताड त्या घायाळ तरुणाच्या नाकावर बसल्याने तो एकदम तडफडून शुद्धीवर आला. ती भयंकर शुद्धी ! मृत्यूच्या बेशुद्धीहूनही अधिक भयंकर! अंधेरात, मध्यरात्री, त्या जुनाट विहिरीच्या पोटात, अर्ध्याच खोलीवर, प्रेते, मांस, नसा, रक्त, कण्ह, किकाळ्या, भीषण स्मृती, भीषण विस्मृती यांनी लडबडलेला तो तरुण शुद्धीवर आला नि त्याच्या अंगावर नि खांद्यावर लागलेल्या घावाच्या असह्य तिडिका उठल्याने मोठ्याने ओरडला. त्याच्या त्या ओरडण्याने भेदरून आणखी कोणी अर्धमृत किकाळून धडपडू लागला.

मलबारमध्ये ह्या विहिरीसारखी त्या रात्री ही एकच विहीर अशी आ करून कण्हत नव्हती. मलाबारमधल्या मध्याहन रात्रीचा तो अंधःकार हे ह्या विहिरीचे एकच भयानक भोकाड वासून झोपी गेलेला नव्हता; तर अशी दहा रौद्र विहिरींची दहा बीभत्स भयंकर भोकाडे वासून एखाद्या रावणासारखा घोरत पडलेला होता.

त्याच वेळेस, त्याच रात्री कानपूरजवळ एका भव्य बंगल्यात ‘प्रेमवर्धक’ महामंडळाची सभा भरली होती. खुदाबक्ष, कडकखान इत्यादी प्रख्यात मुसलमान पुढारी नि भोळचंद, गयाळशेठ, मिटगय्या इत्यादी हिंदू पुढारी त्या महासभेच्या महत्त्वाच्या कार्याकरिता भरविलेल्या हया विशिष्ट अधिवेशनास आलेले होते. कडकखान यांनी उठून सांगितले की, मुसलमानांमधील एकी ज्या देशशत्रूंस पाहावत नाही त्यांनी मलबारच्या हिंदू-मुसलमानांमध्ये दंगे झाल्याच्या खोट्या बातम्या छापण्याचा सपाटा चालविला आहे; त्याचा ही सभा तीव्र निषेध करीत आहे. सभेने स्वतः ह्या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता खुदाबक्ष यांस मलबारात धाडले होते. त्यांनी प्रत्यक्ष सर्व स्थिती पाहून जे प्रतिवेदन (रिपोर्ट) केले आहे, त्यावरून ही सभा सर्व हिंदुस्थानाच्या वतीने असा ठराव

करीत आहे की, मलबारमध्ये हिंदू-मुसलमानांची एकी बिघडण्यासारखी काही एक घटना झालेली नाही."

गयाळशेठ म्हणाले, "सर्व हिंदूंच्या वतीने मी हया ठरावास अनुमोदन देतो. मलबारमधील हिंदू लोक नि मुसलमान सुखासमाधानाने नांदत आहेत. मलबारमध्ये काहीएक झालेले नाही."

"काहीएक झालेले नाही," सभेतील सर्व हिंदू ओरडले.

"छे! छे ! ! काहीएक झालेले नाही असे म्हणता ? या अल्ला ! अजून पण आमच्या हिंदू बंधूस मुसलमानांविषयी वाटावी तितकी सहानुभूती वाटत नाही. मलबारात आमचे शूर मोपले जे वीरोचित युद्ध करीत आहेत ते काय काही नाही ?" कडकखान म्हणाले.

तेव्हा अध्यक्ष भोळचंद उठून म्हणाले, "क्षमा करावी ! कडकखान, त्या तुमच्या त्या शूर बंधूंचे- त्या मोपल्या वीरांचे नि त्यांच्या धैर्याचे ही सभा अभिनंदन करीत आहे. मोपले आम्हा हिंदूंचे भाऊ आहेत."

"हिंदू-मुसलमान भाऊ आहोत." सर्व सभा गर्जली.

"हिंदू मुसलमानच आहेत," मूढाप्पा, बावळेशास्त्री उत्साहाने ओरडू लागले.

"आणि हिंदू जरी मुसलमान नसतील; तरी, मोपले त्यांना मुसलमान करतील; जिवंतपणे करितील; ठार मारीत करतील; ठार मेल्यावर करितील;" तुसड्या आवाजात एक गृहस्थ उठून म्हणाला. तेव्हा बावळे, गवाळे, भोळचंद इत्यादी हिंदू पुढारी ओरडून म्हणाले, "खोटे बोलतोस ! खाली बैस ! तू कोण ! पुरावा काय ! देशभक्त आहेस तू ?"

हा देशशत्रू आहे. हिंदू-मुसलमानांची एकी हा बिघडवितो," सर्व सभा ओरडली. पण त्यास न भिता तो गृहस्थ म्हणाला, "शांत व्हा. मी म्हणतो ते अक्षरशः खरे आहे. मी एक हिंदू होतो. माझा पुरावा प्रत्यक्ष ! मला मोपल्यांनी भयंकर छळ करून नि बलात्काराने सुंता करून मुसलमान केलेले आहे, आणि माझ्याहून लक्षपट अधिक भयंकर बलात्कार इतरांवर गुजरले आहेत."

"पण तू आता मुसलमान आहेस ना ? मग तू मुसलमानांच्या विरुद्ध कसे बोलतोस ?" मौलवी करीमुद्दीन विचारते झाले.

"मी हिंदू होतो ! मोपल्यांनी बलात्काराने मला मुसलमान केले. पण मला माझ्या इच्छेनुरूप आर्यसमाजाने संस्काराने शुद्ध करून घेतले. मी हिंदूचा हिंदूच आहे."

"या अल्ला ! तर मग हा काफर मरणास योग्य आहे;" चिडून जाऊन भयंकर गर्जना करीत कडकखान म्हणाला, "मुसलमानांच्या शरियतप्रमाणे जो मनुष्य मुसलमानांनी त्याला मुसलमान म्हटल्यानंतर पुनः हिंदू होईल तो मरणाच्या दंडास पात्र होतो. हा काफर आहे. हयाला ठार मारले पाहिजे!" असे म्हणत कडकखान त्या गृहस्थावर तुटून पडले.

तेव्हा अध्यक्ष भोळचंद मध्ये पडून म्हणाले, "खानसाहेब, खानसाहेब, क्षमा करावी. अपराध हया गृहस्थाचा आहे. ज्या अर्थी हा त्या भांडखोर आर्य समाजाचा अनुयायी आहे त्या अर्थी त्याचे बोलणे अग्राह्य नि बातमी अविश्वासार्ह आहे हे उघड आहे."

“आर्यसमाज मोठी भांडखोर संस्था आहे. हा आर्यसमाजी आहे, म्हणून हयाची साक्ष विचारात घेता येत नाही,” सभा एकमुखाने गर्जली.

“परंतु मलबारमधील हिंदूंचा भयंकर छळ चाललेला आहे; नि त्यांच्या कत्तली उडत आहेत, हे मी आर्यसमाजी म्हणत नसून श्रीयुत देवधर देखील तसेच म्हणत आहेत. हे पहा त्यांचे पत्र !”

“श्रीयुत देवधर मवाळ आहेत,” सभा गर्जली.

“श्रीयुत देवधर मवाळ आहेत म्हणून आम्हा असहकारी देशभक्तास त्यांचे म्हणणे अग्राह्य वाटत आहे.” भोळचंदांनी निर्णय दिला. “तथापिही मलबारमधील मोपल्यांनी केलेल्या हिंदूंच्या छळाची कहाणी तुम्हांस सत्यच वाटली पाहिजे ! कारण देवधरच नव्हेत तर डॉ. मुंजेही ती सत्य आहे म्हणून साक्ष देण्यास सिद्ध आहेत.”

“डॉ. मुंजे जहाल आहेत. म्हणून त्यांची साक्ष अग्राह्य आहे !” सभा गर्जली.

“डॉ. मुंजे जहाल आहेत म्हणून आम्हा अनत्याचारी देशभक्तांपुढे त्यांचा साक्षीपुरावा होऊ शकत नाही.” अध्यक्ष भोळचंद यांनी निर्णय केला.

“परंतु ज्या ज्या हिंदूंवर हे भयंकर प्रसंग कोसळले त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरांत त्यांनी ती कहाणी लिहून माझ्या मित्राच्या स्वाधीन केल्याची तारही आताच माझ्या हाती पडली आहे. कुट्टम येथे कालपरवाच भयंकर दंगा होऊन मुसलमानांनी हिंदूंची मृगया चालविली आहे, म्हणून आताच आलेली ही दुसरी तार तरी थोडीशी वाचून पहावी.”

“अरे, तारा काय ? काल्पनिक दंग्यांच्या अशा तारा मजकडे रोज शेकडो येताहेत. पण मलबारच्या हिंदूंच्या हया तारा, मी सर्व ह्या बघ आपल्या खुर्चीवर रचून त्यांची एक मऊ गादी करून तीवर बसलो आहे. त्यातून आलेली तार खरी कशी असेल ?” भोळचंद शांतपणे पण निर्धाराने म्हणाले, “तारांवर मी विश्वसत नाही.”

“आताच मला कोचीनच्या खिलाफत मंडळाच्या अध्यक्षांची ही तार आलेली आहे.” खुदाबक्ष तडजोडीच्या स्वरात म्हणाले, “हया तारेने सर्व प्रश्नांचा निकाल लागतो. खिलाफत सेक्रेटरी, कोचीन लिहितात की, “मलबारमध्ये मुसलमानांनी हिंदूंवर बलात्कार केल्याच्या नि हिंदूंस मुसलमानी धर्माची दीक्षा बळाने दिल्याच्या ज्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत त्या अगदी निराधार आहेत. प्रत्यक्ष चौकशी करून पाहाता असे कळले की, एक किंवा फार तर दीड हिंदू कुठेसा बलात्काराने मुसलमान केल्याचा बोभाटा झाला होता.”

“बस् बस् ! हया तारेने सर्व प्रश्न निकालात निघाला. मलबारातील हिंदूस बलात्काराने बाटवितात इत्यादी बातम्या सब झूट आहेत. एखादा अर्धा हिंदू असेल बाटला तसा. प्रत्यक्ष खुदाबक्षास आलेली तारच असे सांगते; आता शंकाच नको.” भोळचंद निर्णायक स्वराने म्हणाले.

“आता शंकाच नको. मलबारात काही एक झालेले नाही. मलबारात हिंदू-मुसलमान प्रेमाने नांदत आहेत.” सभा गर्जू लागली.

तेव्हा मूळ ठरावात मोपल्यांच्या शौर्याचे अभिनंदन करावे म्हणून खुदाबक्ष यांनी उपसूचना आणिली. उपसूचनेविषयी बोलताना मोपले हे किती दयाळू, सहनशील नि दीन लोक आहेत नि त्यांचे हिंदू बंधूंवर अत्याचार होणे कसे स्वभावतःच अशक्य आहे ह्याचे रसभरित वर्णन जेव्हा ते करीत होते-

त्या वेळेस तिकडे -

त्या भयंकर अंधारात आपला भीषण जबडा वासून निजलेल्या त्या विहिरीच्या पोटात हाडे, रक्त, मांस, प्रेत, कापलेले अवयव, छाटलेली शिरे, ताणलेले पाय, कण्ह हे सर्व अन्न पचविले जात होते. नि त्या अन्नाच्या चावलेल्या, पिसाळलेल्या, दळलेल्या लगद्यात एखाद्या रत्नासारखा तो हिंदू तरुण- तो लटकलेला घायाळ - रुतून पडला होता. त्याच्या खालच्या मरणाऱ्या हया लाथा लागून नि घोळणा फुटून तो शुद्धीवर आल्यानंतर एकदम ज्या वेळेस तो बेशुद्ध झाला त्या वेळची शेवटची स्मृती, पहिली आठवण म्हणून त्याच्या डोक्यात उभी राहिली. त्यास वाटले, “हिंदू धर्म सोडतोस की नाही? मुसलमान होतोस ?” असे मोपले त्यास मारीतमारीत विचारीत आहेत. त्या भासासरशी, “होत नाही जा, सोडीत नाही जा ! हिंदू ! मी हिंदू! मारा किती मारता ते !” असे झटपट तो ओरडून गेला. पण थोड्याच वेळात तो कुठे आहे हे त्यास कळू लागले; त्याबरोबर त्याचे निसर्गदत्त धैर्य परत उदय पावू लागले. त्याच्या वर कमरेपासून कापलेला जो कोणा हिंदूचा पाय लटकत होता नि ज्याच्या रक्ताची धार त्याच्या तोंडावर गळत होती तो हिसडून खाली टाकला. पण तो ओढताना मी कोणातरी हिंदू हुतात्म्याच्या देहाची विटंबना तर करीत नाही म्हणून संकोच त्यास टोचीतच होता. तो संकोच तसाच दाबून त्याने हया वरच्या झुडुपास हात घालून विहिरीवर येण्याचा प्रयत्न केला. पण ते झुडुप तुटले. तो धाडकन खाली कोसळला. त्यासरशी विहिरीच्या दुसऱ्या बाजूस तिरपा चढलेला प्रेतांचा ढीग ढासळून त्याच्या छातीवर पडून त्यास गाडूनच टाकावयाचा; पण थोडे चुकून त्याच्या कमरेखालचा भागच तेवढा गाडला गेला. तेथून निघण्याकरिता तो पाय रोवून त्या ढिगावरच उभे रहावे म्हणून उठू लागला; तो त्याच्या पायाखाली मोपल्यांच्या सोट्याने चेचलेले एक पोट येऊन त्याचा तो रोवीत असलेला पाय त्या पोटात, अर्ध्या सुकलेल्या चिखलास फोडून आत रुतावा तसा, ते पोट फुटून त्यातील मांस, नसा, आतडी, अन्न, मळ हयांच्या झालेल्या लगद्यात रुतून बसला. त्यास एकाएकी कुठूनशी भयंकर भीती वाटू लागली. कशीतरी त्याने ती टाळली. त्याने पाय हिसकून काढला. त्याने त्या ढिगातील एक शिर छाटलेले धड उपसून भितीस पक्के टेकेल असे केले नि त्याच्या कमरेवर एक पाय रोवून तो उसळून पुनः त्या झुडुपास धरिता झाला. मनात मध्ये कोणीसे ओरडतच होते की, तो शीर काटलेला हिंदू हुतात्मा कोण असेल? त्याची योग्यता-हिंदूच राहीन म्हणून मरणी मेलेल्या प्रत्येक हिंदूची योग्यता-तुझ्या इतकीच थोर आहे ! मग त्या शीर छाटलेल्या हिंदू हुतात्म्याच्या कमरेवर नि खांद्यावर पाय ठेवून तू शीर असलेला मनुष्य, वाचण्यासाठी एवढी धडपड जी करितो आहेस त्याची तुला लाज नाही वाटत ?

पण शीर छाटलेल्या हुतात्म्याच्या खांद्यावर चढूनच शीर असलेले राष्ट्र खोल गर्तेतून वर येत असते ! शीर असलेल्यांनी खोल गर्तेतून मरणाच्या अंधक्कारातून, पुनरुज्जीवनाच्या उदयाचलावर चढावे म्हणूनच शीर छाटलेले हौतात्म्य आपल्या प्रेताचे ढीग रचित असते.

म्हणून लाजू नकोस ! हे हुतात्मा हिंदू तरुणा ! लाजू नकोस ! चढ त्या ढिगावर, धर त्या झुडुपाला, उचल ते तुझे हात आणि त्या विहिरीच्या काठास धरून एका उसळीसरशी ये त्या मृत्यूमुखातून बाहेर. त्या मरणाच्या पोटासारख्या भयंकर विहिरीतही तू पचला नाहीस. कलमलून मरणाने तुला ओकून टाकिले. पायाखाली केवळ हिंदू म्हणून मारल्या गेलेल्या वीरांचे मांस, रक्त नसा, कण्ह, केस, मज्जा नि जीव हयांच्या लगद्यांच्या ढिगावर तो हिंदू तरुण चढून त्या मृत्यूच्या पोटाबाहेर धडपड करीत असता-

तिकडे त्या सभेत खुदाबक्ष, मोपल्यांच्या दीन नि सुशील स्वभावाचे वर्णन करून म्हणत होते की, “असे लोक हिंदूंवर भयंकर अत्याचार नि धार्मिक बलात्कार करतील हे हिंदू बंधूस शक्य तरी कसे वाटते? हिंदू बंधूंनी ध्यानात धरावे की, मोपले मुसलमान आहेत. बस्स ! त्या एकाच शब्दाने हया सगळ्या आक्षेपांचे निरसन होत आहे. मुसलमानी धर्म बळाने दुसऱ्या धर्मास हानी पोचविण्याच्या अगदी विरुद्ध आहे.”

“अगदी विरूद्ध आहे.” लबाडखान म्हणाले; “कुराणातल्या पानापानांवर हे स्पष्ट सांगितले आहे.”

“उदाहरणार्थ आपण दोन पाने तरी या मताची म्हणून सांगाल काय ? त्या वचनाविरुद्ध वचने किती नि मुसलमानी इतिहास हया दोन वचनांपैकी कोणते वचन गृहीत धरीत आला आहे हे कळवाल काय ?” असे तो आर्यसमाजी मध्येच म्हणाला. ते ऐकताच कडकखान एकदम चवताळून मूठ वळून धावला नि ओरडला, “हया आर्यसमाजीला हया सभेतून घालवून द्या; नाहीतर मी हयाला ठार मारीन ! जो कोणी मुसलमान केला गेला- मग तो बळाने का असेना - तो जर पुनः मुसलमानी धर्म सोडील- मग ते कर्म तो स्वेच्छेने का करीना -तर त्यास ठार मारणे ही मुसलमानी धर्माची आज्ञा आहे.”

“जर धर्माविषयी कोणावरही बलात्कार करू नका ही आज्ञा कुराणाच्या पानापानांवर दिलेली आहे, तर अहो खुदाबक्ष, धर्मांतर स्वेच्छेने करणाऱ्यासही ठार मारावे, ही आज्ञा लिहावयास कोणते पान उरले ? मुखपृष्ठ की काय ?”

“हे हरामी ! ए काफर !” असे म्हणत मुसलमानी सभासदांनी त्या हिंदू गृहस्थाच्या डोक्यात काठ्या घातल्या. अध्यक्ष भोळचंद भिऊन गेले. सभा मोडेल की काय हया भयाने त्यांनी त्या आर्यसमाजिस्टास सभेतून धक्के मारून बाहेर घालवा म्हणून सांगितले. तेव्हा धक्के मारुन बाहेर घालविला जात असता तो आर्यसमाजी मागे वळून म्हणाला, “हे हिंदूंनो ! तुम्ही तरी मला धक्के मारू नका. तुम्ही अनत्याचारवादी आहात ना !”

"चूप बैस ! गाढव कुठला !" श्रीयुत झकमार घोष संतापून म्हणाले, "आमचे अनत्याचारित्व केवळ परकीयांविषयी आहे. स्वकीयांविरुद्धही आम्ही बळाचा उपयोग करणार नाही, असा का अनत्याचारवादाचा अर्थ होतो? गाढव कुठला !"

तो आर्यसमाजी बाहेर घालविला जाताच सभेत शांतता स्थापित झाली. स्वतः भोळचंदांनी ठराव मांडून एकमताने मान्य करून घेतला की, "मुसलमानी धर्माचा प्रसार हा बलात्काराने कधीच झालेला नाही. त्यातही मलबारमध्ये तर नाहीच नाही. मोपले हे शूर, वीर नि आमच्या हिंदूंचे सख्खे भाऊ आहेत. त्यांनी हिंदूलोकांचा कोणत्याही प्रकारचा धार्मिक छळ केलेला नाही. उलट, अनेक हिंदूंस मोपल्यांनी आश्रय देऊन उभ्या हिंदू जनतेस उपकृत केले आहे. ज्या लोकांनी धार्मिक बलात्कार हिंदूंवर झाले म्हणून बातम्या उठविल्या ते सर्व देश-शत्रू आहेत. एक किंवा फार तर दीड हिंदू कुठेसा बळाने मुसलमान करण्यात आला म्हणून भूमका आहे इतकेच ! ह्याहून मलबारमध्ये काहीएक चिंताजनक झालेले नाही !"

"काहीएक झालेले नाही ! मलबारमध्ये हिंदू-मुसलमानांची एकी अभेद्य आहे. मलबारमध्ये काहीएक चिंताजनक झालेले नाही." बावळे, झकमार घोष, मूढाप्पा इत्यादी सर्व हिंदू एकमुखाने गर्जना करिते झाले. त्या विजेच्या दिव्यांनी प्रकाशमान झालेल्या, अत्तरांनी सुगंधित नि आरामखुर्च्या नि कोच यांनी सुशोभित आणि सुखकारक झालेल्या भव्य बंगल्यात ते हिंदू लोक "मलबारमध्ये काहीएक चिंताजनक झालेले नाही," म्हणून गर्जना करीत असता-
तिकडे -

त्या विहिरीच्या काठावर तो हिंदू युवक चढून आला. त्याचे अंग नखशिखांत कोणाच्या नसेत, तर कोणाच्या रक्तात, तर कोणाच्या मज्जारसात भरलेले, लिडबिडलेले होते. मुसलमानांनी शेवटच्या कत्तलीत नि त्यापूर्वी केलेल्या वारांनी त्याच्या खांद्यावर नि मांडीवर मोठाले घाव होऊन त्यातून रक्त ठिपकत होते. वेदना असह्य होत होत्या. पण विहिरीच्या काठावर येताच, तो मोकळा वायू श्वासोच्छवास केला गेल्याने त्या तरुणास किचित हलके वाटले. पण घोर अंधार ! ती घोर विहीर ! ती घोर स्मृती ! ती घोर विस्मृती ! तो दचकला. त्याला वाटले, शेजारी एका झाडापाशी कोणी उभे आहे. बांगड्या स्पष्ट ऐकू आल्या. तो भ्याला. ही मोपला स्त्री तर येथे पाळतीवर ठेविलेली नसेल ? तो दबून पाहू लागला.

इतक्यात श्रीरंगम् देवालयाच्या बाजूस 'हर हर महादेव !' म्हणून मोठाच घोष झाला. काय ? हर हर महादेवाचा हा एवढा घोष करण्यास धजावे इतके हिंदू तर मग अजून जगावर जिवंत आहेत ? त्या तरुणाच्या अंगावर प्रेमाचे नि आनंदाचे रोमांच उभे राहिले. तो एकदम बेभान होऊन त्या प्रिय नि पूज्य ध्वनीच्या श्रवणात तल्लीन झाला नि नकळत ओरडला, "हर हर महादेव."

गुरखे लोकांचे सैन्य रातोरात कुट्टमहून निघून पळून गेलेल्या मोपल्यांचा पाठलाग करून त्यास दे माय धरणी ठाय करीत पुढे जाण्यास निघाले होते. तो त्यांचा ध्वनी होता.

त्या तरुणाच्या तोंडातून तो ध्वनी नकळत निघताच ती झाडाशी उभी दिसलेली आकृती चलन पावली. तिने आपल्या पदरात झाकलेला चोर कंदील बाहेर काढून त्याच्या उजेडाची लकेर त्या जयध्वनी करणाऱ्या मनुष्याकडे पाडली नि एकदम, “दामू ! हे वीरवरा !” असे संबोधून ती स्त्री त्याच्याकडे धावली. आश्चर्य, आनंद, आभार नि अभिमान हयांची भावना एकाएकी उत्कटतेने दाटून तिचे शरीर नि स्वर थरथर कापू लागले. तिचा कंदील तिच्या हातून पडला. त्या कंदिलाबरोबरच तसेच बारीक दोरी लावून कसेबसे इतका वेळ धरलेले धैर्यही तिच्या हातातून गळून गेले; नि “दामू, ओळखलेस का ? वीरवरा, तू मुक्त केलेली मी लक्ष्मी !” असे एका स्वरात म्हणून ती तरुणी त्याच्या गळ्यात पडली. दामूच्या अंगावर शहारे आले. तो तरुण त्या मुलीहूनही क्षणभर गांगरला; परंतु तिने त्याच्या छातीशी लगटून म्हटले, “मला घे. दामू, मला छातीशी घे. इतका वेळ मी हया स्मशानात अंधेरात उभी होते. पण मला भीती वाटली नाही. आता मला क्षणभरही उभे रहावत नाही. तुला पहाताच धैर्य यावे, ते उलट झाले. दामू, मला घे- घे- घे.”

असे म्हणत ती तरुण पोर त्याच्या बाहुपाशात घुसून स्वस्थ पडली. कुट्टमच्या त्या भयंकर रात्रीत चिंतामणशास्त्रांच्या शांतिकुटिरात ती स्वस्थ निजली असता तिला मोपल्यांनी सुमती समजून पकडली तेव्हा पासून कोण भयंकर ताप-अपमान-भीती-बलात्कार-छळ-मार-उपास आशा नि निराशा त्या अल्लड निरपराध हिंदू पोरीस सोसाव्या लागल्या ! त्यांच्या आघाताखाली जीवनाची फांदी अगदी तुटत आली होती. गुरख्यांचा जय होताच त्यांनी, मोपल्यांनी बंदीत टाकिलेल्या सर्व हिंदू कुमारिका नि स्त्रिया मुक्त केल्या. त्यातच हीही मुक्त झाली. इतक्या दुःखाच्या आघातातही तुटत आली तरी न तुटलेल्या जीवनाच्या फांदीस लोंबकळत ती तेथे उभी होती, तों, दामू भेटला.

इतक्या दिवसांत ममत्वाचा मनुष्य भेटला. ती वेडी स्त्री-जात ! संकटात उसने आणलेले सर्व अवसान सुखात एकदम मावळले. संकटाच्या आघातात जी तुटली नाही त्या जीवनाच्या कोमल फांदीस तो सुखाचा आघात सहन करवला नाही. त्या तरुण थिय्या वीराच्या अंगावर पडून,”दामू, मला घे!” असे म्हणून ती पडली ती पुनः हलेना. दामूने त्या कन्यकेस घट्ट घेतले. गुरखे आल्याचे वृत्त तेवढे तिच्या तोंडून तुटक ऐकले. “भिऊ नका ! लक्ष्मीबाई ! आता हिंदूंचा दिवस उगवत आहे; भिऊ नका !” असे तो तिला कुरवाळीत म्हणाला. कुरवाळणे ! संकटाच्या आघाताने

पिचलेल्या तिच्या हृदयास, इतक्या भयंकर संकटानंतर कुरवाळणाऱ्या ममत्वाचा तो स्पर्श- ते प्रेमळ कुरवाळणे-सहन झाले नाही. वेडी ती स्त्रियांची जात ! तिने आपले तोंड वर केले. “दामू ! माझ्या दामू ! माझा” ती लाजली. पण शब्द सोडलेली वाक्ये वाचण्यास प्रेमाचा पुरातन अभ्यास आहे. दामूने तिची हनुवटी वर केली. “लक्ष्मीबाई! भिऊ नका, मी तुमचाच आहे.” असे म्हणत त्या हिंदू वीर युवकाने त्या हिंदू कन्यकेचा मुका घेतला.

- आणि त्या मुक्याबरोबरच तिचे जीवनही चोखून टाकिले ! दुःखाच्या भयंकर आघाताखाली तुटत आलेली पण न तुटलेली जीवनाची फांदी त्या सुखाच्या आघाताने तुटली नि लक्ष्मी तीवरून कोसळली. त्या वीर युवकाच्या प्रेमळ नि परम विश्वस्त हृदयावर निर्भयपणे लक्ष्मी निजली- ती पुनः काही जागी झाली नाही.

तिने प्रेमभराने आपण होऊन दिलेला तो पहिलाच प्रीतीचा मुका- हाय हाय ! त्या सुंदर कन्येचा शेवटचाच मुका झाला ! त्या मुक्याच्या सुखाची वीज थरथरत तिच्या हृदयात शिरली नि तेथील रक्तात विझून गेली !

तरीही ती तशीच निजलेली होती. तो अत्यंत थकलेला घायाळ थिय्या कुट्टमला निर्भयतेने हिंदू जगू शकावा अशी व्यवस्था गुरख्यांच्या सेनेने केली आहे हे कळल्याने, नि त्या निजलेल्या मुलीस निजलेलीच समजून तिची झोपमोड होऊ नये म्हणून, तसाच झाडास टेकून बसल्याने, थोडक्याच काळात, डोहात पाय निसरून एकदम बुडावे तसा झोपेत बुडून गेला.

सकाळ झाली. शीतल वारा सुटला. पक्षी किलबिल करू लागले. एक साळुंकी किलबिल करीत आजूबाजूस थोडा वेळ फिरली नि मग धिटाऊन त्या निजलेल्या जोडप्यावरून अगदी लागून उडत लक्ष्मीच्या विखुरलेल्या केसांतून एक केस हिसडून निघून गेली. पण ती जागी झाली नाही, त्या वीर युवकाच्या गळ्यात हात टाकून ती तशीच पडलेली होती. त्याच्या घावातील रक्त तिच्या अंगावरही वाहात होते. थोड्याच वेळात एक हिंदू लहान मुलगा एका भव्य संन्याशाला घेऊन त्या बाजूने आला. “हीच ती विहीर ! महाराज, हीच ती विहीर!” तो मुलगा म्हणाला. संन्यासी स्तंभित होऊन उभा राहिला.

“पण हे कोण?” तो मुलगा दामूस नि त्या मुलीस तसे तिथे निजलेले नि रक्तात न्हालेले पाहून म्हणाला, “अहो, हाच तो दामू ! थिय्या ! कम्बूचा साहाय्यक नि वीर शिष्य, आणि ही? ही ती

चिंतामणशास्त्री हयांची कन्या- लक्ष्मी ! हो! ही तीच ही." आणि तो हिंदू मुलगा गहिवरून आला नि "अहो ह्या पवित्र ब्राह्मण कन्येचे नख देखील आम्हांस दिसत नसे ! आज तिची ही स्थिती !" असे म्हणत स्फुंदू लागला.

संन्यासी अत्यंत करुण दृष्टीने त्या दृश्यास पाहू लागला. लगेच त्याला हया मुलीच्या जीवनाची शंका येऊन त्याने तिला हळूच हालविले. पण ती निचेष्ट पडली होती. तो तरुण मात्र एकदम दचकला. त्याला वाटले लक्ष्मीला कोणी शत्रूने हात लावला. तो उसळून उठू लागला, पण पहातो ता समोर दयार्द्र नि परम स्निग्ध मुद्रेने आशीर्वाद नि निर्भयता देणारे हात आपल्या शिरावर धरून कोणी भव्य संन्यासी एखाद्या वरदान देण्यास सिद्ध असलेल्या देवासारखा उभा आहे !

दामू झडझडून उभा राहिला नि भक्तिभराने दूर सरकून त्या संन्याशास दंडवत घालता झाला. संन्याशाने त्याच्या मस्तकावर प्रेमाने पुनः हात ठेवण्याचा प्रयत्न करिताच दामू म्हणाला "भगवान, मी थिय्या आहे. आपणांस विटाळ होईल !"

"वेड्या ! अधोगतीचा झालेला विटाळ जाईल !" संन्यासी म्हणाला, "तुझे वीरवृत्त मी लोकांच्या तोंडून ऐकिले आहे. तू कत्तलीत मारला गेलास म्हणून कळले. तेव्हा तुझ्या नि तुझा गुरू कम्बू हयांच्यासह हिंदू धर्माच्या सन्मानाच्या वेदीवर ज्यांनी ज्यांनी आपले देह आनंदाने बळी दिले त्या त्या हुतात्म्यांच्या वध-क्षेत्राचे दर्शन घ्यावे म्हणून मी इकडे आलो, तो त्या हुतात्म्यांपैकी तुझ्यासारख्या एकाचे प्रत्यक्ष दर्शन झाले. जो थिय्या हिंदू धर्मासाठी आपला आत्मा हवन करितो तो ब्राह्मणाहून ब्राह्मण आहे. जो महार हिंदू धर्मासाठी आपले शीर छाटून टाकतो तो महार हा क्षत्रियाहून क्षत्रिय आहे. त्याच्या स्पर्शाने हिंदुत्वास लागलेल्या षंढपणाचा विटाळ जातो-होत नाही ! चल ! प्रथम हया सुंदर ब्राह्मण कन्येच्या प्रेतास त्या विहिरीत टाक. रडू नकोस. हजारो म्हातारे नि तरुण, बाल नि बालिका, स्त्रिया नि पुरुष हिंदू धर्मासाठी मोपल्यांच्या तलवारीने छाटले जात असता नि मुसलमानी धर्मवेडाने छळले जात असता जेव्हा एकाच व्यक्तीसाठी आपणास रडू कोसळते तेव्हा तेथे आपला अहंकार आपल्या जातिप्रेमाच्या मागे दडलेला असतो. आपला प्रत्येक अश्रू आता हिंदू जातीच्या छळाप्रीत्यर्थ, हिताप्रीत्यर्थ गळला पाहिजे. व्यक्तीसाठी गाळण्यास आता डोळ्यात अश्रू राहिला नाही !"

त्या दोघांनी ते त्या निरपराध, पण म्हणूनच, अत्यंत पीडित पोरीचे प्रेत उचलून त्या विहिरीत फेकले. तो संन्यासी नि दामू त्या विहिरीच्या काठावर बराच वेळ उभे राहिले. मधूनमधून संन्यासी

काही वृत्त विचारी नि दामू ते सांगे. हरिहरशास्त्री हयांचा, कम्बूचा, स्वतः दामूचा वृत्तान्त संन्याशाने ऐकिला. त्या विहिरीच्या काठावर दूरपर्यंत शेकडो बाटविलेल्या नि बलात्काराने सुंता केलेल्या हिंदूंच्या नि शिखांच्या जटांच्या केसांचे काढून टाकलेले झुबके, कापलेली कातडी, सोललेली चामडी, सांडलेल्या रक्ताची डबकी नि ओघळ विखुरलेले होते. विहिरीत प्रेतांचे थरांवर थर रक्ताच्या नि मांसाच्या चिखलात रुतून बसलेले होते. ती विहीर हिंदूंच्या रक्तामांसाच्या चुन्यात तुटलेल्या हात, पाय नाक, शिरे, बोटे हाडे, धडे, नि प्रेते यांच्या चिऱ्यांनी मलबारातील मुसलमान कारागिरांनी अक्षरशः चिणून भरून काढिली होती. संन्यासी ते दृश्य वारंवार निरखून म्हणाला, "आग्र्यास मुसलमानांनी प्रेमाचा ताजमहाल बांधिला तो एकच आहे. पण मुसलमान कारागिरांनी हया विहिरीसारखे द्वेषाचे ताजमहाल हिंदुस्थानात पदोपदी बांधिले आहेत ! ईश्वरा, त्यांना क्षमा कर नि हयापुढे तरी सुबुद्धि दे !"

"सुबुद्धी दे !" म्हणून आणखी एक ध्वनी उठला. संन्यासी परतून पहातो तो एक मोपला मुसलमान म्हातारा काठी टेकीत त्या संन्याशाच्या मागेच उभा असलेला त्यांनी पाहिला. तो मुसलमान म्हणाला, "महाराज चमकू नका. मी मोपला मुसलमान आहे."

"असेनास !" संन्यासी म्हणाला, "जर तू इतर मोपला मुसलमानांप्रमाणेच आमची हिंदू म्हणून हत्या करावयास आला असशील तरीही मी चमकणार नाही. ह्या विहिरीत बघ ! चवदा-चवदा वर्षांच्या अल्लड हिंदू मुलीनी देखील हिंदुधर्मसंरक्षणासाठी प्राण देण्यास मागेपुढे पाहिले नाही; मग मीतर संन्यासी आहे. संन्याशाचे प्राण आधीच गेलेले असतात. बरे जर तू मोपला असूनही हिंदूंचा द्वेष करीत नसशील नि त्यांच्यावर चाललेल्या हया भयंकर अन्याय्य अत्याचाराविषयी तुला खरोखरच पश्चात्ताप वाटत असेल- तरीही मी चमकत नाही. कारण मोपला काय- मुसलमान काय ख्रिश्चन काय ! कोणतीही जातची जातच दुष्ट असते असे आम्ही मानीत नाही. ती तरी माणसेच आहेत. त्यांच्यातही साधू, सत्वशील नि दयामय पुरुष नि स्त्रिया असतातच ! आम्ही, कोणत्याही जातीतील लोकांनी केलेल्या कृत्यांचा जो निषेध करितो तो त्या कृत्ये करणारांचा असून त्यांच्या जातीचा किंवा धर्माचा नसतो."

डोळ्यांत आसवे येऊन तो म्हणाला, "महाराज, हिंदू लोकांतील साधुसंतांत मी पुष्कळ हिडलो आहे- आणि म्हणूनच मला माहीत आहे की, जे न्यायाचे, सत्य नि दैवी विचार प्रदर्शित केलेत ते जितके हिंदू लोकांत रुजलेले आहेत, तितके दुर्दैवाने आमच्या मुसलमानात अजून रुजलेले नाहीत.

कुराणासारख्या ग्रंथाचा त्याचे लाखो अनुयायी भयंकर अर्थ करितात हे मला नि माझ्या पंथाच्या अनुयायांस आवडत नाही. मुसलमान- आम्ही मुसलमान असताही- आमचा फार द्वेष करितात. कारण आम्ही कुराणातील वचनांचा अर्थ त्या त्या परिस्थितीपुरता लावतो, जी वचने त्रिकाल सत्य नि मानवजातीच्या हितास अनुकूल दिसतात ती आम्ही त्रिकालाबाधित मानितो. नि म्हणूनच माझ्या हिंदू बंधूंवर झालेल्या हया मुसलमानी अत्याचारांचा आमचा पंथ तीव्र निषेध करीत आहे. आम्ही प्रार्थना करितो की, "हे रहिम ! हे राम ! मुसलमानांस सुबुद्धी दे. हिंदूंस सुबुद्धी दे. मनुष्य जातीस सुबुद्धि दे, की ज्या योगे मनुष्य देवासाठी नि देवाच्या नावाने मनुष्यांचे बळी घेणार नाहीत ! ज्या कुराणांनी अरब जातीला आपल्या मुली मारू नका म्हणून शिकविलें तेच कुराण अल्लाचे नावांने मनुष्य जातीस आपल्या मुली मारा म्हणून कसे शिकवील? शिकवीत असेल तर ते ईश्वरी पुस्तकच नव्हे."

"ईश्वरी पुस्तके ?" संन्यासी म्हणाला, "जातीवर गुदरलेल्या भयंकर संकटातील अर्धीअधिक संकटे हया ईश्वरी पुस्तकावरील मनुष्यांनी केलेल्या सैतानी टीकांपायी गुदरलेली आहेत. जर मनुष्य मनुष्यजातीस जे जे प्रत्यक्ष उपकारक आहे; असे, तेच तेच आचरण करील, नि जे जे राक्षसी नि अहितकारक प्रत्यक्ष दिसत आहे, ते ते केवळ अमक्या पुस्तकात ते सांगितले आहे म्हणूनच करीत असल्याचे सोडून देईल तर मनुष्य मनुष्यावर केवढा उपकार करील ? ईश्वरी पुस्तकाच्या नावाने इतके अनर्थ कोसळले आहेत की, त्यापेक्षा मनुष्यकृत पुस्तकेच अधिक आदरणीय नि नैतिक होत, असे स्पष्ट म्हणण्याची पाळी आली आहे ! परंतु ही स्थिती केव्हा येईल तेव्हा येवो ! तोपर्यंत अत्याचार नि बलात्कार हयांची नांगी जे ढिली करते ते धर्मवीरत्व मनुष्यमात्रास सदोदितच वंदनीय असणार ! ही विहीर पहा : लहान लहान मुली, कोवळे तरुण एकामागून एक मारेकऱ्यांपुढे आणण्यात आले. त्यांस विचारले गेले, "मुसलमान होतोस की मरतोस?" मुलींनी आपली आई आपली वाट पाहात बसेल म्हणून चिंता केली नाही. आयांनी आपल्या तान्हुल्याना संध्याकाळी कोण पाजील म्हणून खेद केला नाही. कोवळ्या तरुणांनी, कालच जिने हसत त्यास भेटावयास बोलाविले त्या प्रिय पोरीस एकही आलिगन देता येणार नाही म्हणून तळमळ लागू दिली नाही. तिथल्या तिथे हजार आशांनी विणलेला आयुष्याचा पडदा ताडकन् फाडून एकदम त्यांनी मृत्यूस तोंड दिले नि मरणाऱ्यांच्या रांगेत पाय टाकिला, उभे राहिले नि कचाकच तलवारी पडून त्यांचे तुकडे उडाले ! ही हुतात्मते, हे धर्मवीरत्व धन्य आहे ! अत्याचाराची धारही ज्या

ढालीवर बोथट होते, अशी ढाल-अशी ही हुतात्मेची ढाल- हे हिंदू जाती, तुझ्या हाती अजूनही आहे. तू भिऊ नकोस."

एक बाबा बंदा बहाद्दर मारिला गेला. एक संभाजी मारिला गेला- ते थोर म्हणून त्यांच्या बलिदानास आम्ही त्यांची नावे घेऊन वंदन करितो. परंतु हुतात्मतेच्या पावित्र्यात त्यांच्याहून लेशमात्र न्यून नसलेल्या-परंतु ज्यांची नावे माहीत असणे अशक्य आहे अशा हया शेकडो आबालवृद्ध, आबाल-बालिका, अब्राहमण, चांडाल हिंदू धर्मवीरांच्या अत्युग्र बलिदानास आम्ही नुसती ही विहीर हया नावानेच संबोधितो. हिंदू जातीच्या अवनत स्थितीतही प्रकाशमान होणाऱ्या तिच्या दिव्य बलिदान-शक्तीचे नाव ही विहीर! ह्याच दिव्य बलिदान-शक्तीच्या बळावर हिंदू जाती पुनरपि समर्थ, सुंदर नि देवप्रिय होईल अशी जी आशा या हृदयात स्पंदन पावत आहे, त्या आशेचे नाव ही विहीर."

संन्याशाने भक्तिरसाने त्या विहीरीस तीन प्रदक्षिणा घातल्या. त्यांच्या मागोमाग दामू नि तो मुसलमानी वृद्धही तितक्याच भक्तीने चालत होते. नंतर त्या तिघांनी त्या विहिरीस साष्टांग दंडवत घातले. बाहू उभारून तो संन्यासी म्हणाला, "दामू, मी मेलो तरी तू तो भाग्याचा दिवस पहावयास जिवंत राहशील. तर तू हा माझा निरोप त्या दिवसाला दे की, जेव्हा केव्हा हिंदू जाती पुनः होती तशी नि त्याहून, आपल्या स्वातंत्र्याने, आपल्या सामर्थ्याने नि आपल्या सौंदर्याने देवांना प्रिय अशी होईल, तेव्हा हया विहिरीस तिने विसरू नये. एक वेळ चंद्रगुप्ताने वा शिवाजीने वा गोविदाने वा भाऊने जिकलेल्या रणांगणावर विजयस्तंभ उभारण्याची विस्मृती झाली तरी क्षणभर चालेल; पण हया विहिरीच्या रक्तांगणावर जयस्तंभ नसला तरी यशस्तंभ उभारण्यास विसरता कामा नये. जातीच्या जीवनाचा आधार जयस्तंभापेक्षा तिच्या यशस्तंभाच्या दृढतेवरच अधिक अवलंबून असतो !"

"पण महाराज ? तो दिवस पाहण्याचे भाग्य ज्याच्या दैवी असेल ते तो दिवस पाहोत; मी हया विहिरीत पुनः उतरणार. माझ्या बरोबर जे धर्मयुद्धात झुंजले नि मारले गेले त्यांना सोडून, त्यांच्याच प्रेतावर अक्षरशः पाय देऊन हया विहिरीच्या वर आपला जीव बचावण्यासाठी चढताना मजवर वीज कोसळून त्या माझ्या कृतघ्न स्वार्थासह मला भस्म का करून टाकती झाली नाही ? ज्या मार्गाने त्या भयंकर पापाच्या शिखरावर चढविले त्याच मार्गाने उतरून हया विहिरीत, मी

होतो तिथे पुनः जाऊन पडणार नि मरणाने माझ्यावर मिळविलेला विजय मी त्याच्या हातून हिसडून घेणार !"

"छे ! छे ! वेडा कुठला ! अरे मरण तरी केव्हा पवित्र होते ? जेव्हा ध्येयाच्या विजयासाठी जीवनाहून ते अधिक उपकारक होते तेव्हाच. मरण हे काही साध्य नव्हे. तुझ्यासारखे वीरयुवक जर आपले जीवन जातीच्या उन्नतीसाठी देतील तर धर्मासाठी मरण्याची कोणावर पाळीच यावयाची नाही. धर्मासाठी धर्म आचारित जगणे हे मुख्य कर्तव्य आहे. ते चुकले म्हणजे धर्मावर संकट गुदरते नि मग त्याचे प्रायश्चित्त म्हणून धर्मासाठी मरावे लागते. परोपकारार्थ मरण हा आपद्धर्म. पहिल्याच्या स्खलिताचे ते दुसरे भयंकर प्रायश्चित्त आहे. म्हणून तू जग; नि अशा रीतीने जग की तुझी जातीही जगावी. हौताम्याइतकेच एक महत्कार्य तुला पाचारित आहे. पण ते पूर्ण केले असता या हुतात्म्यांच्या आत्म्यास तुझ्या प्रायोपवेशनाहून अधिक आनंद होणारा आहे."

"महाराज, ते महत्कार्य कोणते ?"

"शुद्धि!" संन्यासी म्हणाला, "चल, आपण या हुतात्म्यांच्या रक्तामांसांनी चिणून काढलेल्या त्या विहिरीसच साक्ष ठेवून प्रतिज्ञा करू की, मुसलमानांच्या अत्याचारांनी ज्यास बलाने मुसलमान करण्यात आले त्या सर्व हिंदूंना शुद्ध करून आपण पुन्हा हिंदू धर्मात आणू ! हौतात्म्याने, प्राणबलिदानाने जे मेले त्यांनी हिंदुत्वाचे रक्षण केले. आपण जे जिवंत आहोत ते शुद्धीने हिंदू धर्माचे रक्षण करू, इतकेच नव्हे तर प्रसारही करू नि शत्रूंचे दुष्ट हेतू विफल करू. चल !"

९. तरुण पिढीचे काम -

ते गेले. संन्यासी नि दामोदर ह्यांनी गावागावांतून नि झोपडीझोपडीतून हिडून मोपल्यांच्या अत्याचाराने बाटलेल्या हिंदूस शुद्ध करून घेण्याचा धडाका चालविला. मोपल्यांचे बंड जरी आता पार मोडून टाकले गेले होते, नि त्यांचे पुढारी ठार झाले होते; नि त्यांचे लोक दाती तृण धरून शरण आलेले होते; तरी त्यांनी बाटविलेल्या हिंदूस शुद्ध करण्यासाठी संन्यासी नि दामोदर हे प्रयत्न करीत आहेत असे पाहून कित्येक वेळा मोपल्यांतील काही व्यक्तींनी त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यास कमी केले नाही.

एक दिवस तिसऱ्या प्रहराच्या सुमारास एका झोपडीच्या दारापुढे झाडीत असता एक तरुण कन्यका कोणतेसे गाणे सुस्वरात गुणगुणत होती. तो स्वर ऐकताच त्या मार्गाने जाणारा एक संन्यासी थबकला. त्या गाण्याच्या पालुपदात त्याला गोविदाचे नाव अस्पष्ट ऐकू आल्याने तो मार्गास सोडून त्या झोपडीकडे हळूहळू सरकत जाऊन एका झाडाशी उभा राहिला. ती तरुण पोर आपल्याच नादात पुनःपुन्हा घोळीत एक चरण म्हणत होती नि झाडीत होती. होता होता तिचा स्वर उंच होत होत, अति मंजुळ शब्द त्या संन्याशास स्पष्टपणे ऐकू येऊ लागले- “गोविदा ! सुखकंदा !

मन्मन घे तव छंदा ।।”

संन्यासी पुढे झाला, त्याला पाहताच ती पोर चापापली. संन्याशाने विचारले, “मुली ! ही झोपडी कोणाची?” “एका मोपल्याची आहे.” “आणि तू येथे कुठे आलीस ?” परंतु ह्या प्रश्नाबरोबर त्या मुलीचा चेहरा गोरामोरा होऊन तिच्या डोळ्यांतून टपटप आसवे पडू लागली. तथापि आशेची उत्कंठताही तिच्या मुद्रेवर चमकू लागली.

त्या प्रांतातील मोपले लोकांच्या तोंडून तिने ऐकिले होते की, कोणी हिंदू संन्यासी बाटलेल्या हिंदूस शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचे कार्य करीत आहे. मोपले लोक त्यास रागाने सैतान-संन्याशी म्हणत !

त्या पोरीच्या हृदयात एकदम थर्र झाले- हाच तर तो संन्यासी नसेल ? ती नुसती रडू लागली.

“रडू नकोस !” संन्यासी म्हणाला, “मुली, तुझ्या अंगावर मोपला स्त्रियांचे जाकीट आहे. पण तू हे गोविदाचे गाणे गात आहेस; म्हणून विचारले की तू पूर्वी हिंदू होतीस की काय ?”

जरा धिटावून ती पोर म्हणाली, " भगवंत भक्ताची परीक्षा गोविद जाकिटावरून करीत नसून हृदयावरून करतो, असे मला माझे आईबाप शिकवीत असत. मी हिंदू होते हा आपला तर्क खरा आहे. पण मी हिंदू आहेही. माझ्या अंगावर हे मुसलमानी जाकीट चढले; मनावर नाही. क्षमा करा. मी असे ऐकिले आहे की, बाटलेले हिंदू पुन्हा शुद्ध होऊन हिंदू धर्मात नि समाजात परत येऊ शकतात म्हणून. ते खरे का ?"

संन्यासी म्हणाला, "अगदी खरे ! बलात्काराने असो वा मूर्खपणाने असो; जो हिंदू बाटला जातो तो सर्व प्रायश्चित्त घेऊन परत हिंदू होऊ शकतो."

"महाराज, पण मी एक मसकुनी जातीची नीच योनीतील कन्या आहे. त्यातही बलात्काराने एका मुसलमानाने मला येथे आपली बायको करून ठेवलेली आहे. आणि मी अजून जिवंत आहे. अशा मलाही प्रायश्चित्त आहे ?"

"अर्थात आहे ! तुझे चित्त ज्या क्षणी शुद्ध झाले त्याच क्षणी ते प्रायश्चित्त घेतले गेले. तू जिवंत आहेस हे मी भाग्य समजतो. जो उठेल तो जीव देईल तर आपली हिंदू जाती आपण होऊनच नामशेष होईल. मोपल्यांस बाटविण्याचीही तसदी घ्यावी लागणार नाही. धर्मावरील आंतरिक भक्ती जर चलित झाली नसेल तर सर्व क्षम्य आहे- नव्हे त्याची अपराधात गणनाच होत नाही. ध्येयाच्या बंदरास जाण्यासाठी जर वाऱ्यास पाठ द्यावी लागत असेल, तर अशा स्थली नावाड्याचे कर्तव्य वाऱ्यास तोंड देणे नसून पाठ देणेच होय. तू हो म्हण की तू पुन्हा हिंदू होऊ शकशील."

आशेपलीकडील काही चांगले घडले असता मनुष्य जसा क्षणभर स्वतःवरही विश्वास ठेवू शकत नाही, तशी क्षणभर भांबावून ती मुलगी पुन्हा म्हणाली, "तर मग महाराज, मी खरेच का हिंदू समाजात येऊ शकेन ? महाराज, मी मसकुनी शुद्ध होऊ शकेन ?

"अगदी अक्षरशः खरे !"

"तर मग महाराज, त्वरा करा. शेजारच्या गावाहून तो मुसलमान राक्षस लवकरच परत येईल. हया शेतापासून जवळच इतर मोपले राहतात. तेही फार वेळ आपण इथे रहाल तर आपणास पहातील. म्हणून मला, आपण त्वरा करा नि आताच घेऊन चला. हिंदू धर्मात जे बाटविलेले हिंदू परत जातात त्यांस मोपले ठार मारितात. म्हणून लवकर चला. मी येऊ ?"

“अवश्य. पण तू मुसलमानी पेहराव घालून येऊ नकोस. ते जाकीट उतर. तू त्या राक्षसाची भीती बाळगू नकोस. माझे सवंगडी येथून जवळच आहेत. काढ त्या गुंड्या नि दे फेकून ते जाकीट.”

ती अकल्पित सुटकार राक्षसाच्या बंदिशाळेतून ही अकल्पितर एका क्षणापूर्वी काही देखील गंधवार्ता नसता एका क्षणात होणारी ही अकल्पित सुटका ! - ती पोर गुंड्या काढू लागली. पण पुन्हा मी हिंदू होणार हया प्रिय कल्पनेने तिचे स्त्रीजातीय मृदुल ज्ञानतंतू थरथर करून कापू लागले. जाकीटाच्या गुंड्या निघेनात.

हिंदू जातीत- तिच्या माहेरास - परत जाण्याच्या वाटेवर ते एक मोपला जाकिटाचे फाटकच काय ते आडवे उरलेले होते. त्याच्या गुंड्यांच्या कड्या, ती कापरी बोटे लवकर उघडू शकेनात.

पण तितका उशीर देखील तिला सोसवेना. तिने ज्या गुंड्या निघेनात त्या ताडताड तोडून टाकल्या- ते जाकीट फेकून दिले; नि पिजऱ्यातून सुटून भर्रकन उडून वृक्षाचा आश्रय करणाऱ्या पक्षाप्रमाणे ती कन्यका झटकन निसटून त्या संन्याशाच्या दीर्घ नि दृढ बाहुपाशाचा आश्रय करती झाली.

संन्यासी मार्गास लागला. त्या कन्यकेसह थोडे दूर जाताच त्याचे सवंगडी त्यास येऊन मिळाले.

“हे काय ? मालती ?” दामोदर आश्चर्यचकित होऊन म्हणाला, “तर मग भगवन् ! मला माहीत असलेले जितके हिंदू दुष्टांनी भ्रष्ट केलेले होते तितके सर्व आज परत आपल्या हिंदू जातीस लाभले ही केवढी आनंदाची गोष्ट !”

संन्यासी म्हणाला, “आणि माझ्या माहितीतलेही. सहा महिने झाले नसतील- तो मौलवी कुट्ट मला, उभा राहून गर्वगर्जना करीत म्हणाला होता की, ‘आज हिंदू धर्म ठार झाला. हया खिलाफती राज्यात हिंदू तितका बाटवून मुसलमान केलेला आहे.’ आज आम्हीही असे म्हणू शकतो की, मलबारात त्या तुझ्या खिलाफती राज्याचा मागमूसही उरला नाही. बाटविलेला सर्व हिंदू शुद्ध होऊन पुन्हा परत आलेला आहे. तुझे प्रयत्न विफल झाले.”

“स्वामिन् ! शकांच्या नि हूणांच्या तलवारीने आघात झाले ते जसे झालेच नाहीत असे भरून आले, तसाच हाही आघात आपल्या कृपेने भरून आला !”

“हे ठीक झाले !” संन्यासी गंभीरपणे म्हणाला, “झालेले आघात भरून येणे हे हिंदू जातीच्या जीवनशक्तीचा अभिलाषणीय विजय होय ह्या शंका नाही. पण आता आघात मुळी होऊ देऊ नयेत अशी क्रियाशक्ती त्या जीवनशक्तीतून उत्पन्न केली पाहिजे. घाव भरून काढण्यापेक्षा हयापुढे आपल्या हिंदू राष्ट्रावर नि जातीवर घाव घालण्याची कोणाची छातीच होऊ नये, कोणास संधी मिळू नये-असे सामर्थ्य, असे चैतन्य उत्पन्न केले पाहिजे. तो विजय हया विजयाहून अधिक अभिलाषणीय होईल. औरंगजेबाजाचा पराभव करून मोगल बादशाही धुळीस मिळविली हा तर विजय आहेच. पण बाबराला किंवा महंमद गजनवीला किंवा कासमला सिधू नदी उतरण्याचा प्रयत्न करताच तीत बुडवून तुडवून टाकता आले असते तर तो विजय मात्र ह्याहूनही निरपवाद नि परिपूर्ण विजय झाला असता. तुझ्या पिढीने आता असा प्रयत्न करावा की, ह्या हिंदू जातीस संघटित बलाच्या हया हिमालयाला टेकून निर्भयपणे अशी यथार्थ गर्जना करता यावी की, मजवर अन्यायाने आघात करण्याची कोणाची माय व्याली आहे ?”

“असा विजय मिळविणे हे कार्य, दामोदर, तुझ्या नि मालती तुझ्यार तुमच्या पिढीचे आहे” असे म्हणत त्या संन्याशाने दामोदरचा नि मालतीचा हात अन्योन्यांच्या हातात गुंफून दिला नि गंभीर स्वरात म्हणाला, “हे युवका, हे युवती ! हे तुमचे पाणिग्रहण तुम्हांस नि तुमच्या हिंदुजातीस सुखद नि शुभद होवो!”